# हाकारा

वर्ष : तेविसावे • अंक : पहिला

जानेवारी - मार्च २००२










## दिशा २००१
### आदिवासी व उपेक्षित समाज : अस्मिता आणि विकास
### संमेलन वृत्तांत ( भाग २ )

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

## कार्यकारी मंडळ

| | |
|---|---|
| अध्यक्ष | : प्रा. रा. के मुटाटकर |
| उपाध्यक्ष | : डॉ. विजय भानू |
| मुख्य सचिव | : डॉ. सुधाकर मोराणकर |
| सह-सचिव | : पुरूषोत्तम आगाशे |
| खजिनदार | : जयवंत मंत्री |
| सभासद | : ॲड. पद्माकर वळवी (आमदार) |
| | : डॉ. मिलिंद बोकील |
| | : सुधीर जोग |
| | : गणपत पंडित |
| | : आरती कौलगेकर |
| | : सुमेध गुर्जर |

दलित, आदिवासी, भटक्या-विमुक्त जाती, इतर अकिंचन कष्टकरी वर्ग आणि स्त्रिया यांच्या शोषणमुक्तीसाठी जर कुठे लोकशाहीच्या तत्त्वावर चळवळ संघटित होत असेल तर तिला पाठिंबा देणे, तिच्याशी आपल्या विचारांचा अनुबंध राखणे हे मी माझे कर्तव्य समजतो. प्रबोधनाची हीच खरी योग्य दिशा आहे, असे मला वाटते.

– गं. बा. सरदार

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता !


महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक

# हाकारा (त्रैमासिक)

वर्षे : तेविसावे ● जानेवारी-मार्च २००२ ● अंक : पहिला



**संकल्पना व प्रेरणा**
कै. गं. बा. सरदार

**संपादक - मुद्रक - प्रकाशक**
**रामचंद्र मुटाटकर**

**कार्यकारी संपादक**
**ग. शां. पंडित**

**संपादक मंडळ**
मिलिंद बोकील
सुधीर जोग
श्रीनिवास इंदापूरकर
पुरूषोत्तम आगाशे



**अक्षर जुळणी**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे

**मुद्रण स्थळ**
ज्ञानप्रबोधिनी मुद्रण विभाग, पुणे ३०

**मुखपृष्ठ छायाचित्र**
परिषदेच्या संग्रहातून



**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
**६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७**
**फोन / फॅक्स : (०२०) ५८८७२११**


## अनुक्रम


| | |
|---|---|
| संपादकीय | २ |
| **बोलका अभिप्राय** | ४ |
| **गरज आहे वैचारिक नेतृत्वाची**<br>डॉ. गिरीश सोहनी | ५ |
| **रेलां गीत** | १० |
| **आदिवासी अस्मिता (चर्चा)**<br>वाहरू, काळुराम, डॉ. गारे | ११ |
| **आदिवासी साहित्य व कला (चर्चा)**<br>वाहरू, भुजंग, कोडापे, चांदेकर, उषाकिरण | २५ |
| **आदिवासी व आरोग्य (चर्चा)**<br>डॉ. काटे व डॉ. शिरोळे | ३७ |
| **आदिवासी स्त्री व आरोग्य**<br>नॅन्सी गायकवाड | ४५ |
| **भटक्या-विमुक्तांचे प्रश्न (चर्चा)** | ५१ |
| **संमेलनाचा समारोप**<br>मिलिंद बोकील | ५३ |
| **उपस्थितांची यादी** | ५७ |



या अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी किंवा मतांशी संपादक व संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय

१२ ते १४ मे २००१ या काळात परिषदेने 'दिशा २००१' हे राज्यपातळीवरील संमेलन 'आदिवासी व उपेक्षित समाजः अस्मिता आणि विकास' या विषयावर पुण्यात आजोजित केले होते. या संमेलनाला बहुसंख्य आदिवासी व बिगर आदिवासी कार्यकर्ते, अभ्यासक व मान्यवर व्यक्ती उपस्थित होत्या. तीन दिवसांच्या या संमेलनात आदिवासींचे आरोग्य, शिक्षण, अस्मिता, साहित्य व कला, जंगल जमिनीचे प्रश्न, भटक्या विमुक्तांचे प्रश्न या विषयांशी संबंधित तज्ज्ञ व्यक्तींनी आपापले विचार मांडले होते. 'हाकारा' च्या मागील अंकात यातील काही विषयांवरील विचार प्रसिद्ध केले आहेत. उर्वरीत विषयांवरील विचार या अंकात देत आहोत. आदिवासी व इतर उपेक्षितांमध्ये कार्यरत असणाऱ्या कार्यकर्त्यांना हे विचार मार्गदर्शक ठरतील, या हेतुंनीच ते विचार संकलित स्वरूपात देत आहोत.

मागील अंकात आपण सर्वच विषयांतील निवडक विचारांना स्पर्श केलेला आहे व त्यातील कोणते विचार दिशादर्शक ठरणारे आहेत, याचाही ऊहापोह केला आहे. संमेलनाचा विषय 'अस्मिता आणि विकास' ठेवण्याचे मुख्य कारणच आदिवासींच्या अस्मितेचा शोध घेऊन त्याअनुषंगाने त्यांच्या विकासाची दिशा नेमकी काय राहील याचा शोध घेणे हा आहे. सदर अंकात 'अस्मिता' विषयावर स्वतः आदिवासी असलेल्या, आपल्या कार्यक्षेत्रात असणाऱ्या व आदिवासी जीवन, संस्कृती व समस्यांचा अभ्यास असणाऱ्या वाहरू सोनावणे, काळुराम दोधडे व डॉ. गोविंद गारे या मान्यवरांनी आपले अभ्यासपूर्ण विचार मांडले आहेत. आदिवासींच्या अस्मितेची ओळख डॉ. धैर्यशील शिरोळेंनी सुद्धा आपल्या आरोग्यविषयक विवेचनात करून दिली आहे, पण ती वेगळ्या पद्धतीने आपल्या समोर येते. अशीच अस्मिता आणखी वेगळ्या पद्धतीने नॅन्सी गायकवाड यांनी 'आदिवासी स्त्रीचे आरोग्य' या चर्चासत्रातून करून दिली आहे.

या सर्व वक्त्यांच्या विचारांचा धागा एकत्र गुंफला तर आदिवासी जीवनाचे परस्परविरोधी चित्र आपल्या डोळ्यासमोर उभे राहते. 'आदिवासी संस्कृती ही निसर्गाशी एकरूप झालेली आहे. तिला त्यापासून वेगळं करणं म्हणजे तिचं अस्तित्व संपविण्यासारखं आहे. आदिवासींच्या विकासाचा विचार म्हणजेच त्यांच्या जीवन मूल्यांना, त्यांच्या समूहजीवनाला, त्यांच्या अस्मितेला धक्का न लावता केलेला विचार हा खऱ्या अर्थाने विकासाची दिशा दाखविणारा ठरू शकेल. आदिवासीला खऱ्या अर्थाने उभं करण्यासाठी प्रयत्न केले तर त्या विधायक कार्यातून जी दिशा मिळेल ती त्यांच्या पुढच्या पिढीची अस्मिता जागी करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची आहे; पण तसं घडताना दिसत नाही. कारण 'शोषणावर आधारलेल्या समाजव्यवस्थेत हे शक्य नाही' असं वाहरू, दोधडे या कार्यकर्त्यांचं मत आहे. याचं कारण 'आदिवासींची अस्मिता नकारात्मक भूमिकेने पुढे आलेली आहे', असे डॉ. गारेंचे म्हणणे आहे.

डॉ. धैर्यशील शिरोळेंना गडचिरोलीच्या गोंड व माडिया आदिवासींचा डॉ. प्रकाश आमटेंबरोबर

आरोग्याचं काम करीत असताना परिचय झाला. त्यांनी तेथील आदिवासींचं जीवन आपल्या कॅमेऱ्यानं टिपलं आणि नजरेने न्याहाळलं. त्यातून त्यांना गोंड, माडियांच्या स्वच्छंदी, मनमोकळ्या, पापभीरू स्वभावाची ओळख झाली. त्यांचं समूहजीवन, त्यांची स्त्रीला मान व स्वातंत्र्य देण्याची पद्धत या गोष्टींनी त्यांच्या मनाला भुरळ घातली त्यामुळे हे पक्के आदिवासी आहेत, असं त्यांचं मत झालं.

तर याउलट पुण्या-मुंबईच्या मध्ये रायगड जिल्ह्यातल्या कर्जत भागातील कातकरी, ठाकर आदिवासींमध्ये काम करणाऱ्या नॅन्सी गायकवाड यांना याच आदिवासी समाजात मारहाणीचे, क्रूर हत्यांचे प्रकार अनुभवास आले आहेत. एकेकाळी कातकरी समाजात स्त्री-पुरूष समानता होती. पण आज त्यांच्याच कुटुंबात महिलांच्या अत्यंत क्रूरपणे हत्या होऊ लागल्या आहेत. ठाकर, कातकऱ्यांची जातपंचायतही पुरूष प्रधानतेकडे झुकणारी आहे. ती सुद्धा प्रत्येक बाबतीत स्त्रीलाच दोषी ठरवते. त्यात दारू आणि अंधश्रद्धा यांचा पगडा या समाज मनावर खूपच जास्त, त्यामुळे होणाऱ्या हिंसाचं प्रमाणही वाढलेलं आहे.

अशा या परस्परविरोधी गोष्टींचा विचार केला तर काहींना प्रश्न पडेल की 'आदिवासी संस्कृती' ही खऱ्या अर्थाने प्रगत मानली जात असताना, जिचे गुणगान आपण गातो; तिच्यात असे प्रकार कसे घडू लगले? या प्रश्नाचं उत्तरही याच अनुभवांमध्ये आहे. आदिवासी संस्कृती ही मूळची मातृसत्ताक व्यवस्था मान्य करणारी. परंतु पितृप्रधान व्यवस्थेशी संपर्क येत गेला आणि तिच्यातही बदल होत गेले. जे आदिवासी नागर संस्कृतीच्या जवळ आले, त्यांनी ते बदल लवकर स्वीकारले. पण गडचिरोली सारख्या दूर अरण्यात राहणाऱ्या, निसर्गात रमणाऱ्या आदिवासींना याची चाहूल लागली नाही. ते अजूनपर्यंत पानांची वल्कले नेसून वावरत. आता आता कुठे ते कपडे घालू लागलेत. त्यामुळे त्यांच्यात त्यांच्या मूळ संस्कृतीचे, जीवनमूल्यांचे काही अंश शिल्लक आहेत.

आणि म्हणूनच पुण्या-मुंबई जवळचे आदिवासी आणि गडचिरोलीतले आदिवासी यांच्यामध्ये परस्पर विरोधी गोष्टी दिसतात. शिवाय प्रत्येक आदिवासी जमातीचे जीवन व्यवहार हे पुन्हा वेगवेगळे आहेत. एकाचे दुसऱ्याशी फारसे साम्य दिसणार नाही. कातकरी, ठाकर किंवा महादेव कोळी या जमाती केवळ नावानेच आदिवासी म्हणाव्या लागतील; नाहीतर त्यांचे पूर्णपणे नागरीकरण झालेले आहे. साहजिकच इथल्या संस्कृतीच्या वळणावर न जातील तरच नवल. आणि म्हणूनच वाहरू सोनावणे, दोधडे व डॉ. गारे यांचे विचार येथे लक्षात घेणे आवश्यक आहे. अजूनही आदिवासी समाजात टिकून असलेली जीवनमूल्ये तशीच टिकवून ठेवायची असतील, ती कर्जतच्या आदिवासींच्या वळणावर जाऊ नयेत असे वाटत असेल तर आदिवासी तरूण कार्यकर्ते, अभ्यासक व या क्षेत्रात विधायक कार्य करणाऱ्या बिगर आदिवासींनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे, हीच या विचारांची योग्य दिशा ठरू शकेल, असे आम्हाला वाटते.

– रा. के. मुटाटकर, ग. शां. पंडित

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अंशतः अनुदान दिले असले तरी नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

# बोलका अभिप्राय

प्रिय श्री. मुटाटकर
सप्रेम नमस्कार,

श्री. शरद कुलकर्णी यांच्या बरोबरच्या स्नेहामुळे महाराष्ट्र मानव परिषदेस हजर राहण्याची संधी मला मिळाली, याचा मला फार आनंद झाला. त्याबद्दल मी आपल्या व आपल्या सहकारी बंधू- भगिनींचे आभार मानतो.

संमेलनामधील सर्वच चर्चा फार वरच्या दर्जाची झाली.

मला सर्वात आवडलेली गोष्ट म्हणजे संमेलनाचे एकूण संयोजन. सर्व नियोजनात एक प्रकारचा रेखीवपणा होता. आदिवासींच्या प्रश्नांची सर्व अंगाने चर्चा करण्याचा तुमचा प्रयत्न फार महत्त्वाचा होता. विशेषत: स्त्री आणि आरोग्य व साहित्य आणि कला यांचाही तुम्ही समावेश केलात ही गोष्ट मला तुमच्या तळमळीची निदर्शक वाटली. आदिवासीतील कार्यकर्ते तर तरुण होतेच; परंतु म.मा.वि.परिषदेसाठी तुम्ही पुढची पिढीही नेतृत्व घेण्यासाठी तयार केली आहे, हे विशेष! असे दृश्य क्वचितच पाहावयास मिळते.

सरकारकडून पूर्णत: दुर्लक्ष केल्या जाणाऱ्या एका उपेक्षित वर्गाकडे (आदिवासी) तुम्ही एवढ्या आपुलकीने लक्ष पुरवित आहात, याबद्दल सारी मराठी जनता, तुमची कृतज्ञ राहील.

सोबत माझी छोटी भेट म्हणून आणखी रु. ५०० चा चेक मी सोबत पाठवित आहे. तो कृपया स्वीकारावा.

'हाकारा' मी कधी पाहिलेला नाही. तरी त्याची एक वर्षाची वर्गणी वरील रकमेतून जरूर तर वळती करून घ्यावी. आणि आता माझ्या पत्त्यावर पत्रोत्तर व अंक कृपया पाठवावे.

आपल्या कार्यास मी सुयश चिंतितो.

मुकुंदराव किर्लोस्कर

# आदिवासी अस्मिता व विकासासाठी गरज आहे वैचारिक नेतृत्वाची?

डॉ. गिरीश सोहनी

**मा**झा नि आदिवासी समाजाचा परिचय झाला तो बालपणी, केवळ हौसेखातर, सह्याद्रीच्या दऱ्या-खोऱ्यांमध्ये भटकताना. जेव्हा डोंगरमाथ्यावर पाण्याने तहानलेलो एखाद्या झोपडीत पाणी मागण्याची वेळ यायची तेव्हाच तोंडओळख झाली. नंतर जेव्हा याची जाणीव झाली की, आपण पाणी मागतो, पण ते पाणी त्या बाईने २-४ मैल फिरून आणले असणार. जसजसा काळ बदलत गेला तशी परिस्थिती बदलत गेली.

मात्र एक काळ असा होता की, जंगलामधून जे मिळायचं त्याच्यावर भागत होतं. उपासमार होत नव्हती. त्याच्यानंतर पुढचा टप्पा आला तो उपासमारीमुळे आदिवासी समाज ग्रासला. आणि प्रगती पुढे अशी झाली की जेव्हा तलासरीला, डहाणूला, वापीला, भिवंडीला, गुलमोऱ्याला उद्योग वाढले तेव्हा उपासमार कमी झाली, पण स्थलांतर (मायग्रेशन) वाढलं. म्हणजे एवढीच एक समाधानाची बाब की सहा महिने उपाशी राहायचा तो दुसरीकडे जाऊन पोट भरू लागला. पण जीवन उद्‌ध्वस्त होत गेलं. आणि ही आदिवासींची जी तोंडओळख झाली ती पुढे मणीभाईंबरोबर काम सुरू केलं तेव्हा अधिक परिपक्व झाली.

साधारण वीसवर्षांपूर्वी. पण जवळून परिचय झाला. या परिस्थितीत बदल घडविण्यासाठी काही प्रयत्न सुरू केले आणि या प्रयत्नातून समाधानाची बाब अशी की, तेथे जे कार्यक्रम राबवले ते बाहेरून विचार करून राबवले नव्हते, तर आदिवासींबरोबर बसून, त्यांचे प्रश्न समजावून घेऊन, त्यांच्याबरोबर नवीन दिशा शोधायचा प्रयत्न करून राबवले गेले. पुढे त्या कार्यक्रमाला काहीतरी दिशा मिळत गेली. त्यातूनच एक कार्यक्रम उभा राहिला.

अशा या दुष्टचक्रामध्ये सापडलेल्या आदिवासी समाजामध्ये, ज्यांना अस्तित्वाचा प्रश्न समोर आहे, त्यांच्या विकासाचं पुढचं आणि अस्मितेचं तर त्याच्याही पुढचं. त्यांच्यासाठी अस्मितेचं स्वरूप काय आहे? काय असणार आहे? अस्मिता ही काही आम्ही आदिवासी आहोत आणि तुम्ही बिगर आदिवासी आहात या भावनेतून येत नाही. त्या भावनेतून टिकत नाही. गुजरातमधल्या आदिवासींमध्ये एक प्रथा आहे की ते लहान मुलाच्या कानात सांगतात, पांढरपेशा माणसावर विश्वास ठेवू नको. ही जी आदिवासी-बिगर आदिवासींमधील दरी तयार झाली शोषणामधून, त्याच्यामुळे काही अस्मितेचं स्वरूप येत नाही.

आज जी परिस्थिती आहे, विकास करायचा प्रयत्न चाललेला आहे आणि त्याचे काही अंशी चांगले तर काही प्रश्नार्थक परिणाम दिसताहेत. आश्रमशाळांमुळे शिक्षणाचा चांगला प्रसार झाला. नवीन पिढीला अक्षर ओळख झाली. थोडा जगाबरोबर व्यवहार करण्याचा आत्मविश्वास वाढेल इतपत ज्ञान झालं. आपण मुस्लिमांचा, ब्रिटीशांचा इतिहास या शाळांमधून शिकलो. पण आमच्या गावाचा इतिहास मात्र या शाळांमधून शिकविला गेला नाही. तेव्हा हा जो शिक्षणाचा खेळखंडोबा चाललेला आहे, त्याच्याबद्दल आज देशासाठीच विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. आदिवासी संस्कृतीचं जागतिक पातळीवर इतर समाजाकडून जे शोषण होत चाललेलं आहे, मग हा प्रश्न येतो की ही अस्मिता आजच्या

शिक्षणामध्ये कशी टिकणार आहे. गुजरातमधला आदिवासी आज सहजपणे गरबा नाचायला लागला आहे. मग आदिवासी नृत्य लोप पावले जाऊ नयेत म्हणून अस्मितेचं हे स्वरूप होऊ शकत नाही. त्यामुळे ही केवळ आम्ही आदिवासी आहोत एवढ्या जाणीवेपुरती मर्यादीत नाही किंवा अनुसूचित नाव आहे म्हणून निर्माण होत नाही, तर अस्मिता ही एक जिवंत वारसा या स्वरूपातच राहू शकते.

जी काही आमची जगाकडे पाहण्याची दृष्टी आहे. आमची भाषा आहे, भले ती बोलीभाषा असेल. जे काही आमचं पारंपारिक ज्ञान आहे, जी काही आमची कला आहे, जे काही कसब आहे. हा सगळा जिवंत वारसा जर टिकला नाही किंवा त्याच्याबद्दलचं भान आम्हाला राहिलं नाही तर ती अस्मिता केवळ पुस्तकी स्वरूपातच राहील. आणि बदलत्या काळामध्ये हा जो जुना वारसा आहे तो कदाचित उदरनिर्वाहाला, उपजिविकेला योग्य असल्यामुळे जो टिकून राहिल वर्षानुवर्षे, शतकानुशतके; ते स्वरूप जरी त्याचं नसलं तरी आजही आपण ह्या गोष्टींकडे परत एकदा पाहण्याची गरज आहे की या वारशाला वेगळ्या स्वरूपाचं महत्त्व यायला सुरूवात झाली नाही का? या सर्व प्रक्रियेतून आणि बाहेरून आलेल्या नवीन विचारांमधून आदिवासी समाज जातो आहे. त्यामध्ये सुद्धा फार पिढ्यान्‌पिढ्या, शतकानुशतके त्यांच्यामध्ये असलेल्या ज्या काही खुबी आहेत, त्या आजही वेगवेगळ्या स्वरूपात बघायला मिळतात. एक आहे त्यांचा निसर्गाविषयीचा बारकावा. दुसरं त्यांच्यामध्ये असलेली संशोधकवृत्ती, जीवसृष्टीच्या वैविध्याचं ज्ञान.

आम्ही ज्या वेळेला शेती विकासाच्या दृष्टीने त्यांच्यामधून फिरलो तेव्हा कल्पना करता येणार नाही अशा गोष्टी निदर्शनाला आल्या. डांग जिल्ह्यातील एका गावामध्ये जात असताना मी पाहिलं की एका आठ वर्षाच्या मुलाने टोमॅटोच्या रोपावर वांग्याचं कलम केलं होतं. आणि आश्चर्य म्हणजे त्या रोपाला वांगं सुद्धा लागलं होतं आणि टोमॅटो सुद्धा लागलं होतं. नंतर माझ्या लक्षात आलं की ते एकच 'जिनसूट' आहेत. आणि त्यात नवल काही नसलं तरी एका आठ वर्षाच्या मुलानं केलेलं ते संशोधन होतं. त्याचं मोल फार मोठं आहे. ग्लिरीसिया सारखी झाडं आदिवासी विभागात मोठ्या प्रमाणात लावली गेली आहेत. त्याचे बरेच उपयोग आहेत.

पण एक मजेशीर उपयोग भंडारदऱ्याजवळच्या एका आदिवासीने मला सांगितला की, त्याची फुलं वापरून उंदीर मारायची क्लृप्ती त्याने काढली होती. त्याचा अनुभव असा होता की, त्या फुलांच्या वासाने छोटे उंदीर लागलीच मरतात आणि मोठे उंदीर भोवळ येऊन बाहेर येतात, मग त्यांना सहजपणे मारता येतं. म्हणजे उंदीर मारण्यावर त्याने शोधून काढलेला उतारा कुठल्याही पुस्तकामध्ये लिहिलेला नव्हता. पण नंतर मला कोणीतरी सांगितलं की, 'ग्लिरी' याचा अर्थ 'रोडंट' आहे लॅटिनमध्ये आणि 'सायगो' म्हणजे ते झाड 'रोडंट किलर' आहे. हा प्रचलित उपयोग नाही, तरी सुद्धा तो त्यांच्या संशोधनातून आला आहे. तिथलेच लोक मला सांगत होते की 'ठाकर' जमातीतले लोक जनावरांवर प्रयोग करून औषधाच्या मात्रा ठरवतात.

या सर्व गोष्टी चालू आहेत. म्हणजे अस्मिता आणि वारसा या काही भूतकाळाच्या गोष्टी नाहीत. तो एक जिवंत वारसा असतो. संशोधनाची वृत्ती ही जिवंत वृत्ती असते. निसर्गाबरोबरचा दुवा जिवंत दुवा असतो आणि हा एक सतत चालू असलेला प्रवाह आहे. आणि त्याच समजून न घेता म्हणजे त्याच्यासाठी पोषक असं आमच्या कार्यक्रमामध्ये अंगिकारलं नाही, विचार आणि दिशा, तर अस्मितेच्या प्रश्नाल ठोस स्वरूप येणार नाही.

केरळमधल्या 'जीवनी' च्या बद्दल बऱ्याच लोकांना माहीतच असेल. आदिवासींच्या ज्ञानाच्या आधारावर एक नवीन औषध घेतलं गेलं. त्याला पेटंट केलं गेलं, असं बरंच काही झालं. ते बऱ्याच वादंगामध्ये अडकलेलं प्रकरण आहे. थोडासा काहीतरी निर्णय झालाय व आदिवासींना इंटिलेक्च्युअल प्रॉपर्टी (Intelectual--property) मधून रॉयल्टी मिळावी अशी तरतूद झाली आहे. पण मूळ मुद्दा असा आहे की, ते जे पारंपरिक ज्ञान होतं त्याचा वापर करून एक इंटरनॅशनल पेटंट घेण्याएवढा सायंटिफिक रिसर्च त्याच्यावर होऊ शकला. जैववैविध्याची (बायोडायव्हर्सिटीची) गोष्ट अशीच आहे. ती आज केवळ आदिवासी भाग त्यामानाने दुर्गम असल्यामुळे, दूर असल्यामुळे आदिवासींचा जंगलाशी जास्त संबंध असतो, म्हणून कदाचित टिकून आहे. आम्ही वाजद्यामध्ये पाहात होतो आणि महाराष्ट्राच्या इतर भागातही पाहात होतो.

वाजद्यामध्ये एका कुटुंबाकडे एका वर्षात म्हणजे पावसाळ्यामध्ये ३० ते ३२ प्रकारची पिके घेतली जातात. थोडी थोडी असतील पण संख्या मात्र जास्त. हीच संख्या महाराष्ट्रात पाहिली तर ती २ किंवा ३ असते. म्हणजे हे केवळ पिकांमधलं वैविध्य झालं. जे आजूबाजूला जंगल आहे, वनस्पती आहेत. असाच एकदा एका भगताबरोबर उभा होतो एका जंगलात. तिथे त्याने स्वतः भोवतीच फिरत १५ ते २० औषधी वनस्पतींची ओळख मला करून दिली. मला दोन वनस्पतींमधला फरक सुद्धा लक्षात येत नव्हता.

हा जो ठेवा किंवा वारसा आहे, हे आमच्या आदिवासींच्या अस्मितेचं एक स्वरूप आहे. आणि आज आपण पाहिलं की गेल्या ५० वर्षातली विकासाची जी काही दिशा राहिलेली आहे, त्या दिशेबद्दलच मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झालेलं आहे. शाश्वत विकासाची संकल्पना जसजशी परिपक्व होत गेली तसतशी आज परिस्थिती अशी आहे की आम्ही गेली ५०-१०० वर्षे जी विकासाची दिशा मांडतो आहोत तो खरोखर विकास आहे का? हे प्रश्न आज विचारले जाताहेत. आणि अशा परिस्थितीत जैववैविध्य (बायो डायव्हर्सिटी) या संकल्पनेमध्ये वनस्पतीशास्त्राच्या दृष्टिकोनातून त्यांचं जे महत्त्व आहे, तोच ह्यूमन एक्सिस्टंटच्या दृष्टिकोनातून सांस्कृतिक जैववैधिध्याचं (Cultural Bio-Diversity) आहे. आणि ही cultural diversity Pluralism between cultures हे एकच मूल्य होईल की ज्याच्या आधारावर आदिवासींची अस्मिता एक नवीन रूप धारण करू शकते.

या गोष्टी विकासाला विरोधी नाहीत. तर विकास हे एकसूत्री नाही, ते एक थप्प्याचं बनावं असं नाही. त्याच्यात Pluralism ला महत्त्व आहे, त्याच्यात नवीन दिशांना महत्त्व आहे, local Diversity ला, focal cultures ना महत्त्व आहे. या सर्व गोष्टी ध्यानामध्ये घेऊन जेव्हा अस्मिता आणि विकास या दोन्हींचा एकत्रित विचार करतो तेव्हा एक वेगळा दृष्टिकोन समोर निर्माण होतो. आणि मला असं वाटतं की, एक महत्त्वाची दिशा, यापुढे खासकरून आदिवासींमध्ये आज हा परंपरेचा ठेवा फार मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे, त्याच्यात अजून भेसळ झालेली नाही. पण व्हायला लागली आहे. आजही आदिवासी भागात फिरताना जाणवतं की पुढच्या पिढीला यापैकी किती ज्ञान असेल याबद्दल मला शंका आहे.

कारण आजही इंजेक्शनची सुई मारून घेणं आजच्या नवीन पिढीला आरोग्याची दिशा वाटते. भगतांना जे औषधी वनस्पतींबद्दलचं ज्ञान आहे ते त्यांना दुसऱ्याला देण्यासाठी तरूण पिढीमध्ये लोक मिळत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. काही भागांत, जे विशेषतः दुर्गम आहेत तिथे हे ज्ञान कमी असेल पण ज्या भागाचा बाहेरच्या जगाशी जास्त संपर्क, संबंध आलेला आहे

तिथे तरी ही परिस्थिती निर्माण झालेली आहे. तेव्हा या दोहोंचा समन्वय कसा साधायचा ही महत्त्वाची गोष्ट आहे. आणि मला तरी असं वाटतं की यापुढे आदिवासी अस्मिता आणि विकास यांची एकत्रित सांगड घालून आणि या सर्व वेगवेगळ्या अंगाचा त्यादृष्टीने विचार करून एक वैचारिक दिशा देण्याचं महत्त्वाचं काम महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेला करणं अनिवार्य आहे. ही सांगड तर घातली पाहिजेच आणि एक वैचारिक नेतृत्व, केवळ तोंडाची वाफ नव्हे, तर त्याला एक ठोस कार्यक्रमाचा बेस '(पाया) निर्माण करणं हे आज म.मा.वि.प. करू शकेल, अशा परिस्थितीमध्ये आहे. २५ वर्षांचा एक फार मोठा इतिहास या परिषदेच्या कामगिरीला आहे.

मला पाच महत्त्वाची सूत्रे वाटतात, ज्याच्यावर या परिषदेमार्फत, जे आदिवासी या परिषदेच्या कामात सहभागी झालेत त्यांच्यामार्फत आणि आमच्यासारखे छोटेमोठे कार्यकर्ते कुठे कुठे काम करण्याचा प्रयत्न करताहेत त्यांच्यामार्फत विचार केला जावा.

या पाच सूत्रांपैकी पहिलं सूत्र आहे 'जीवननिर्वाहाचं'. जीवननिर्वाहाची दिशा, जी आज ज्या भागाला संयुक्तिक, तिथल्या स्त्रोतांना अनुरूप व तिथल्या लोकांच्या जाणीवेवर व कसबावर आधारीत अशी कशी निर्माण करता येईल, ही एक महत्त्वाची दिशा. आणि हे होऊ शकतं हे आम्ही गेल्या १०-१५ वर्षांच्या अनुभवातून पाहिलं आहे.

वाजद्यामध्ये गुजरातला जो कार्यक्रम सुरू झाला, जो आज बऱ्याच ठिकाणी पसरला आहे. त्याच्यामध्ये 'वाडी' ही संकल्पना आहे. पण 'वाडी' म्हणजे केवळ फळझाडांची लागवड नाही, तर त्या फळझाडाच्या लागवडीच्या भोवती एक समग्र विकासाचा कार्यक्रम उभा करावा, अशी कल्पना आहे. आणि त्या विकासाच्या कार्यक्रमामध्ये काय असावं हे तिथल्या आदिवासींमध्ये बसून त्यांच्या जाणिवा, त्यांचे कसब यावर आधारीत ते ठरवलं जातं. अशा तऱ्हेने त्या समाजामध्ये (कम्युनिटीबरोबर) बसून तयार झालेला कार्यक्रम असावा अशी एक नवीन दिशा विकासाच्या कार्यक्रमाला द्यायची गरज आहे.

दुसरा महत्त्वाचा एक पैलू आहे, तो आरोग्याचा आहे. आणि आज इतरही संस्था याच्याबद्दल बरंच काम करताहेत. पण आदिवासी भागात औषधी वनस्पतींचं जे काही ज्ञान आहे, एकतर त्याचं डॉक्युमेन्टेशन बाहेरच्यांनी येऊन करायचं नाहीये, ती जाणीव, ते भान त्या समाजामध्येच उत्तम तऱ्हेने निर्माण झालं पाहिजे आणि ते रेकॉर्ड झालं पाहिजे. ते रेकॉर्ड करण्याची पद्धत त्यांनी आत्मसात केली पाहिजे की, हा जो ठेवा आहे (औषधी वनस्पतींचा) तो आमचा ठेवा आहे, हे एक अस्मितेचं स्वरूप त्यांच्यात निर्माण झालं पाहिजे. आणि ही केवळ वैचारिक समाधान मिळविण्यापुरतीची गोष्ट नाही. कारण अर्थशात्रीयदृष्ट्या पाहिलं तर अजून वीस वर्षांनंतर हा जो ठेवा आहे आणि याच्या आधारीत जर त्यांनी लागवडी केल्या तर कदाचित अख्ख्या जगामध्ये गरज पडेल, ज्या कुठेही मिळणार नाहीत अशा वनस्पती आदिवासी जतन करू शकतील. २० वर्षानंतर त्याचे मूल्य एवढे वाढेल की कदाचित त्यांच्या पुढच्या पिढीला उपजिविकेचे मार्ग शोधावे देखील लागणार नाहीत. हे वैचारिक समाधानाकरिता बोलत नाही.

तिसरा जो महत्त्वाचा पैलू आहे तो ललित कलांबद्दलचा. मग यात आदिवासी बोलीसुद्धा आली. अशा बोलींमध्ये काही प्रकाशने सुद्धा झाली आहेत. बडोद्याला भाषा संशोधन केंद्र करत आहे. नर्मदा बचाव आंदोलनाने त्यांच्या शाळांमधून आदिवासी बोलींतून पुस्तके वापरायला सुरुवात केली आहे. पण हे जास्त विस्ताराने व्हायची गरज आहे. आदिवासींमध्ये सुद्धा लिहिलं जाऊ शकतं. त्यांचं जे साहित्य आहे, ते त्या

पद्धतीने मुलांपर्यंत पोहोचू शकतं आणि त्यांची गाणी सुद्धा मुलं गुणगुणत राहतील. हिंदी सिनेमातली गाणी त्यांनी म्हटली तरी त्याचबरोबर त्यांची गाणी सुद्धा विसरली जाऊ नयेत, संगीत विसरलं जाऊ नये. आज परिस्थितींचा फेरा असा बदललेला आहे की, अशा तऱ्हेचं लोकसंगीत, लोककला इंटरनेटवर देखील विकलं जात आहे. म्हणजे निव्वळ त्याला बाजारी स्वरूप द्यायचं असंही नाही. पण ज्यावेळेला उदरनिर्वाहाशी एखाद्या गोष्टीचा संबंध असतो, त्यावेळेला ती गोष्ट टिकून राहाते आणि ती टिकून राहणे यातही एक स्वत्व आहे.

तेव्हा जे आदिवासी संगीत, नृत्यकला, गाणी, हस्तकला या सर्व गोष्टी जीवनाचं एक अंग म्हणून, आश्रमशाळेमधल्या शिक्षणाचं एक अंग म्हणून आमच्या उत्सवाचं अंग / बाजू आहे हे साऱ्या जगाला कळणे गरजेचे आहे. हा इंटरफेस व्हायचा तर 'आमचं हे असं आहे' या शेअरिंगच्या भूमिकेतून होऊ देत. तेव्हा ही एक तिसरी दिशा आदिवासी नृत्य, संगीत कलेची आहे.

चौथा महत्त्वाचा पैलू म्हणजे जे पारंपरिक ज्ञान आहे, जैववैविध्याबद्दलचं असेल, इतर पारंपरिक ज्ञान असेल उदाहरणार्थ, आदिवासी बांबूचा उपयोग करून ३-४ किलोमीटरवरून पाटाचं पाणी आपल्या शेतात घेऊन जातात. त्याला लेव्हलिंगचं ज्ञान नसतं, पण तो बरोबर ते पाणी पळवत नेत असतो. ही कला आहे आणि ते केवळ निसर्गामधल्या नात्यातून आलेलं ज्ञान आहे. अशाच एका आदिवासीला त्याने त्याचे घर अमूक ठिकाणीच का बांधलं हे विचारल्यावर, त्याने सांगितले की इथे शेजारी कातळ आहे. ते उन्हात तापले की हिवाळ्यात थंडी वाजत नाही. असे बारकावे असतात. हे पारंपरिक ज्ञान आहे, ते जैववैविध्याचं ज्ञान आहे, औषधी वनस्पतींबद्दलचं ज्ञान आहे. एक प्रयोगक्षम वृत्ती यांच्यामध्ये असते. या सर्वाला देखील एक कार्यक्रमाचं स्वरूप देता येईल. त्याचं रेकॉर्ड आदिवासींनी ठेवावं, त्या समाजामध्येच ते असावं आणि ते नवीन पिढीला देण्याची प्रक्रिया सुद्धा चालू राहावी, असा हा चौथा पैलू आहे.

आणि पाचवा जो पैलू आहे - शिक्षणाचा. याचा देशाच्या पातळीवरही विचार करावासा वाटतो. पण निदान आदिवासी समाजामध्ये तरी शिक्षण अनुरूप कसं असावं, त्यामध्ये काय पैलू असावेत, याची दिशा शोधणे गरजेचे आहे.

या पाच पैलूंवर म.मा.वि.प. ने जर काही कार्यक्रमाच्या स्वरूपात, वैचारिक नेतृत्वाच्या स्वरूपात काही दिशा देता आली आणि आदिवासी समाजातील ठिकठिकाणच्या कार्यकर्त्यांचे, अनुभवी व्यक्तींचे जर गट स्थापन झाले की जे एकमेकांबरोबर याच्यावर संवाद चालू ठेवतील. या कार्यकर्त्यांमधलेच तयार झालेले अभ्यासगट महाराष्ट्राच्या पातळीवर पाच दिशांना कसे कार्यक्रम बनवता येईल, कसं एका नवीन दिशेने प्रवास करता येईल यावर विचार करत राहतील व त्याप्रमाणे कार्यक्रम होत राहतील तर, त्यातून आदिवासी समाजातली जाणीव त्यात ओतली जाईल.

या परिषदेतल्या अभ्यासकांचं पाठबळ त्याला मिळत राहील आणि एक नवीन केवळ आदिवासी समाजासाठी नाही, आजच्या परिस्थितीत विकासाच्या कामात वैचारिक नेतृत्वाचा फार मोठा अभाव निर्माण झाला आहे, त्यामुळे एक वैचारिक नेतृत्व याच्यातून उभं राहू शकेल, अशी एक प्रचंड ताकद अशा तऱ्हेच्या कामामधून निघू शकेल. आणि असं काम झालं तर आम्ही सर्वजण नक्कीच यात जीव ओतून काम करायला तयार आहोत. ■■■

*डॉ. गिरीश सोहनी हे 'बाएफ' संस्थेचे संचालक*

# रेलाऽऽगीत

जंगल माता की जय बोलो माँ । माता जंगल की
जय बोलो माँ ।।
हराहरा जंगल होगा । खाने को कम ना होगा ।
धाने जब घर आये तो खुशिया मनायेंगे । जंगल माता की
जय बोलो माँ।

जंगलों से, पर्बतों से बहती है ये नदीयाँ ।
पत्थरों से टकराकर के बहती है ये नदियाँ । हरी हरयाली देखी,
झर-झर झरना देखो ।
नदीयां, झरना पेड पहाडों की आदिवासी जन्मभूमी देखो ।
रेलाऽऽ रेलाऽऽ रेलाऽऽ रेलाऽऽ रेलाऽऽ रेलाऽऽ रे ऽऽऽ

कुहू कुहू कोयल की मीठा मीठे राग सुनो । प्रितीसे बोले
तोता मैना की बात सुनो ।
सापों का चलना देखो । मोरों का नाच देखो ।
हिरनों का कुदना देखो । मानव पशु पक्षीयों की
जंगल की जिंदगी देखो ।
रेलाऽऽ रेलाऽऽ रेलाऽऽ रेलाऽऽ रेलाऽऽ रेलाऽऽ रे ऽऽऽ

पर्बतों के आँचल मे छोटे-मोठे गाव देखो । आदिवासी संस्कृती की
उँची महानता देखो ।
हमारा तारपा देखो । तारपा का नाच देखो ।
नाचों में एकता देखो । एकता में शक्ती देखो ।
बिरसामुंडा के वारस है हम, वीरों मे वीर देखो ।
रेलाऽऽ रेलाऽऽ रेलाऽऽ रेलाऽऽ रेलाऽऽ रेलाऽऽ रे ऽऽऽ

सर झुका कर जिते नही जिते नही । डर डर कर मरते नही मरते नही ।
जिना है तो मरना सिखो, कदम कदम पे लढना सिखो ।
रेलाऽऽ रेलाऽऽ रेलाऽऽ रेलाऽऽ रेलाऽऽ रेलाऽऽ रे ऽऽऽ

# आदिवासी अस्मिता

**या सत्राचे अध्यक्षस्थान भारतीय प्रशासकीय सेवेत व विशेष करून शासनाच्या आदिवासी विकास विभागात अनेक वर्षे उच्च पदस्थ कार्यभार सांभाळणारे डॉ. गोविंद गारे यांनी स्वीकारले होते, तर आपल्या आदिवासी बांधवांच्या कल्याणासाठी अहोरात्र झटणारे कार्यकर्ते श्री. वाहरू सोनावणे व श्री. काळुराम दोधडे यांनी या विषयावर आपल्या विचारांची मांडणी केली.**

## वाहरू सोनवणे

अस्मिता आणि विकास यामध्ये अस्मितेचा भाग आहे, हा विचार करत असताना आदिवासीच नव्हे तर इतर जे काही दबलेले गट असतील त्यांच्या अस्मितेचे प्रश्न आणि विकास यासंदर्भात हा विषय आहे. मला असे वाटते की, आदिवासी अस्मिता म्हणजे ओळख. बहुतेक अस्मितेचा अर्थ स्वाभिमानी ओळख असा मी घेतो. पण आदिवासींची अस्मिता तर सोडा, आदिवासींच्या अस्तित्वालाही नकार आहे. आणि हा नकार फक्त भारतात नाही, तर जगाच्या पातळीवर सुरू झालेला आहे. शरद कुलकर्णी यांच्या भाषणात जे सांगितलं की, १९८५ साली युनोमध्ये गेले असताना भारताचे शासकीय प्रतिनिधींनी तिथं मांडलं की भारतात आदिवासी नावाचे प्राणी नाहीत. म्हणजे जगाच्या पातळीवर भारतातील आदिवासींना नाकारले जात आहे.

जर आदिवासी म्हणून आस्तित्वच नाही तर त्याच्या माणूसपणाचा, त्याच्या अस्मितेचा, त्याच्या स्वाभिमानाचा, त्याच्या आत्मसन्मानांचा प्रश्नच उद्‌भवत नाही, अशा तऱ्हेची स्थिती आजच्या घटकाला आहे. आदिवासीची ओळख आत्तापर्यंत जी नोंदविली गेली ती अशा तऱ्हेने आपल्याला दिसते. आदिवासी इतिहासात जरी आपण गेलो तरी इतिहासात आदिवासी जंगली, रानटी, राक्षस अशा तऱ्हेने आपल्याला त्यांची नोंद दिसते. पुढे आले तरी सुद्धा तो चोर, दरोडेखोर अशी त्याची ओळख वाढते. आत्ताच्या जगात तर जुगारी, दारूडे, अंधविश्वासू अशातऱ्हेने नकारात्मक त्याची ओळख आहे. त्याच्याही पुढे नकारात्मक म्हणजे 'अरेरे बिचारा'. म्हणजे कसं तर त्यावर कीव करणार ! हा समाज नाही. हा समाज तर कसा आहे? एक तर लुच्च्या, लफंगा, दरोडेखोर, चोर, डाकू आहे; नाहीतर मग दया करण्यासारखा आहे. 'अरेरे बिचारा'. अशा तऱ्हेची त्याची प्रतिमा आहे, त्याची ओळख आहे. आम्ही इथं असा विचार करायचा आहे, अस्मितेच्या संदर्भात की, हा समाज, या समाज-घटकातले काही लोक, असं काही नाहीच आहे का त्याच्यामध्ये? ह्या समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोन जर आपण पाहिला तर असे दिसते की, त्याच्या चेहऱ्यावरून, त्याच्या कपड्यांवरून, त्याच्या राहणीमानावरून त्याची ओळख ही नोंदवली गेलेली आहे. कधी दैनंदिन जीवन जगता येत. सकाळपासून ते संध्याकाळपर्यंत जीवन जगत आहे, तर त्याची व्यवहाराची मूल्ये कोणती आहेत? कोणती दिशा दाखवतात? एवढेच नाही, तर जन्मापासून मरणापर्यंत जो जीवन व्यवहार आहे. या जीवन व्यवहारातून ते कोणती मूल्ये जपत असतात. कोणत्या मूल्यांच्या आधारावर ते आपले जीवन जगत असतात आणि जीवनाला कोणती दिशा देत असतात, हे बघायला पाहिजे.

जीवनाच्या खोलाईमध्ये गेले पाहिजे असं मला वाटतं. या आदिवासींच्या संदर्भात, समाजाच्या संदर्भात सांगायचे म्हटले तर पूर्वीपासूनचा आदिवासी, धरतीवरचा पहिला माणूस जो असेल तर हा आदिवासी आहे. आणि धरतीवरचा हा पहिला माणूस सर्वात मागे कसा? मग त्याला मागासलेला म्हणायचं. त्याला विकसित करायचं, त्याचं कल्याण करायचं. मग हे विकसित करणारे कोण आहेत? त्याला विकसित करायचं म्हणजे नेमकं काय करायचं? अशा तऱ्हेचा प्रश्न निर्माण होतो. आदिवासींच्या संदर्भात त्याचा विकास आणि कल्याणाची गोष्ट करीत असताना असं म्हटलं जातं की, त्याला मुख्य प्रवाहात आणलं पाहिजे. तर हा मुख्य प्रवाह नेमका काय आहे, कशाला म्हणायचं मुख्य प्रवाह? जणू काय आम्ही सगळे इतर लोक, जे मुख्य प्रवाहात आहेत, जे जणू काही पावन आहेत, शुद्ध आहेत. आमचे जीवनमान विकसित आहे आणि आम्हाला काही कमी नाही.

आणि हा आदिवासी समाज असा आहे, जन्मापासून बिघडलेला. त्याच्यात दोष आहेत आणि त्याला एक प्रकारच्या दोषातून मुक्त करण्यासाठी सगळ्यांची धडपड आहे. अशा तऱ्हेने समाजाकडे बघितलं जातं. मुख्य प्रवाहात आणणं म्हणजे नेमकं काय करणं, त्याचा काय विचार आहे हे बघायला पाहिजे. आणि तो आत्तापर्यंत त्या प्रवाहात का नाही गेला याचीही कारणं बघायला पाहिजे. जीवन म्हणजे नुसता पैसा, बिल्डिंगी, रेडिओ, टी. व्ही., एवढ जीवन नसतं. जीवनात माणसामाणसांचे जे संबंध, नाते-गोते असतात, तो व्यवहार काय असतो, ह्याला 'जीवन' म्हणतात. माणसा-माणसांबरोबर जर भेदभावाचे जीवन असेल, उच्च-नीचतेचे जीवन असेल, विषमतापूर्वक जीवन असेल हे मानवी जीवन शोषणावर आधारीत जीवन असेल.

हा विकास आहे असं म्हणणार नाही. जर मुख्य प्रवाहामध्ये विषमता, उच्च-नीचता, भेदभाव असेल, वर्चस्ववाद असेल तर मी असं म्हणेन की अशा बरबटलेल्या प्रवाहात आदिवासींनी जाऊ नये. नाव सांगायला पाहिजे मुख्य प्रवाहाचे तर, कशाला म्हणता 'मुख्य प्रवाह' तुम्ही? ज्यामध्ये रोज माणसं हुंड्याच्या नावाखाली बायका मारतात, हा प्रवाह? ज्या समाजव्यवस्थेत म्हणजे नेमकं अस ठरवलं पाहिजे की माणुसकी जपली जाईल. नाव न सांगता जे मुख्यप्रवाह चालतात त्याचा उलगडा व विचार व्हायला पाहिजे. आणि विकासाच्या संदर्भात सुद्धा विचार केला पाहिजे, केवळ विकास विकास म्हणून विकास होत नाही. नेमका विकास म्हणजे काय करायला पाहिजे? फक्त आर्थिक प्रश्न सुधारायचे म्हणजेच विकास का? जीवनाची जी विविध अंगं आहेत, सामाजिक अंग आहे, आर्थिक अंग आहे, राजनितिक अंग आहे, सांस्कृतिक अंग आहे. शैक्षणिक अंग आहे.

अशा तऱ्हेने या सर्वांगांमध्ये हा इतर मानव समुहांबरोबर बरोबरीने कसा उभा राहील आणि तो उभा करण्यासाठी कोण किती प्रयत्न करतो, तो विकास आपण समजायला पाहिजे. आता मी एकदा असं म्हटलं होतं की, आदिवासींचे शेती-शास्त्र आर्थिक काय आहे? तर खूप लोक असे म्हणतात की, आदिवासी मागासलेल्या पद्धतीने शेती करतात. ते जंगल जाळून देतात. मग काही वर्षांनी ते शेती करतात आणि नंतर सोडून जातात. दुसरीकडे शेती करतात. पण त्यांचा जो दृष्टिकोन असतो तो असा असतो की, जमीनीचे आपण जास्त शोषण करता कामा नये. दरवर्षी शेती करून त्यांचे शोषण करतात. तसं न होता त्यालाही एक विश्रांतीची गरज आहे.

जसं माणसाला माणूस म्हणून विश्रांतीची गरज आहे, त्या दृष्टिकोनातून आदिवासी समाज शेतीला सुद्धा विश्रांती असावी अशा तऱ्हेने शेती करतो. जी विकसित पद्धत आहे, तिच्यात भरमसाठ शेती करायची,

उत्पन्न घ्यायचं म्हणजे तिथं सुद्धा शोषण करायचं. जे खत टाकायचं त्यामधून भरपूर उत्पन्न काढायचं; पण शेतीच्या जमिनीचं आयुष्य रासायनिक खतांमुळे कमी होतं. हा दृष्टिकोन नफा काढण्याच्या, व्यापारीकरणाच्या शेतीतंत्रामुळे येतो. शोषण करण्याच्या दृष्टिकोनातून शेतीकडे बघितलं जातं आणि त्यामुळे शेतीचं आयुष्य कमी होतं. शेती पुढे बाद होते. तर या सगळ्या विकासाच्या प्रक्रियेमध्ये आदिवासींचं कसं आहे ते ही बघायला पाहिजे. माझे वडील शेती करत होते. तर ज्वार म्हणजे मानीज्वार होती, त्यामध्ये उडिदाचे दाणे टाकून द्यायचे. काहीतरी आणखीन दुसरे दाणे अशी मिश्रशेती करत होते. तेव्हा काही लोकं त्यांना वेड्यात काढायचे, पण ती शेती ते अशा तऱ्हेने करीत होते की, त्यांचा केंद्रबिंदू माणूस होता. म्हणजे आमच्या घरात एवढी माणसं आहेत. खायला किती लागेल? मग उडदाची डाळ एवढी लागेल खायला, ज्वारी एवढी लागेल, गहू एवढा लागेल, किंवा पैसा असेल तर कपडे-लत्ते आणि बाजाराचे करायला एवढा पैसा लागेल.

हे सर्व लक्षात घेऊन शेतीत काय पेरायचं, कुठलं उत्पादन घ्यायचं हे ते ठरवत होते. त्यांचा केंद्रबिंदू माणूस होता. पण आजच्या तंत्रात ते नाही बसत. माणसं बघून शेती केली जात नाही, तर नफा, पैसा कोण देईल आणि जास्त नफा कोणते पीक देईल यादृष्टीने शेती केली जाते. आणि त्यातून शेतीचे किती शोषण झाले तरी चालेल अशा तऱ्हेने शेती पद्धत असते. आणि दुसरं असं की आदिवासींचा विकासाचा समज आहे की, कुठलाही अंगाचा विकास करताना अशा पद्धतीने विकासपद्धती अवलंबिली जाते की, आर्थिक, सामाजिक, राजकिय, सांस्कृतिक या सर्व जीवनाच्या अंगांतून आर्थिक विकास होईल. म्हणजे त्याच वेळेस सांस्कृतिक विकास व्हायला पाहिजे. त्याचवेळेस राजनैतिक विकास व्हायला पाहिजे. म्हणजे कोणत्याही विकासाचे शोषण होता कामा नये. नाहीतर आताच्या पद्धतीत आर्थिक विकास होतो आणि दुसरीकडे सामाजिक दबाव आणला जातो. किंवा सांस्कृतिक पातळीवर त्याला कुचललं जातं. अशा तऱ्हेने दुसऱ्या अंगाची दडपणूक होते. आणि आर्थिक अंगाचा विकास केला जातो. तर मग अशा तऱ्हेने एकाच अंगाच्या विकासाबद्दल पाहिलं जातं. सामाजिक विकास करताना तर आर्थिक विकास दाबला जातो. सांस्कृतिक अंगाच्या बाबतीतही असंच शोषण होतं.

आदिवासींच्या विकासाचा संदर्भ असा असतो की, एका अंगाचा विकास करत असतो, त्यावेळेस बाकीच्या अंगाचा विकास सुद्धा फुलायला पाहिजे. त्याचं कुठेही शोषण होता कामा नये. असं जिथं होईल तेव्हाच आदिवासींचा किंवा मानवी जीवनाचा विकास होईल. अशातऱ्हेने त्या अंगांकडे बघितलं पाहिजे. विकासाच्या संदर्भात असाही विचार करणे गरजेचे आहे, की हा जो विकास आहे तो खरं म्हणजे सर्वांनी मिळून, सर्वांच्या सहभागाने केला गेलेला विकास आहे की लादलेला विकास आहे, यासंदर्भात विकास सुद्धा विचार केला आहे.

हा शासनानी लादलेला विकास आहे का? सगळीकडे लादलेला विकास आहे. अरे घरबांधणीच्या संदर्भात सुद्धा आम्हाला सवलती देतात. पण घर कसं बांधायचं ते आम्हाला विचारा ना! जे तुम्ही अठ्ठावीस साडे अठ्ठावीस हजार रूपये देता ते घर कसं बांधायचं? आमच्याकडे कोणी पाहूणे आले तर त्याला राहायला खोली पाहिजे. बकरी, कोंबडी असतात त्यांना ठेवायला जागा पाहिजे. चूल पाहिजे. त्याची रचना कशी करायची हे नाही विचारत कुणी. जे देतो ते चुपचाप घ्यावं, बाकीच नाही विचारायचं. प्रत्येक बाबतीत असं आमच्यावर लादलेलं आहे. त्यात सहभागाचा विचार अजिबात केला जात नाही.

इथे आम्ही 'रेलाँ रेलॉ ' चे किंवा 'नाही भुलिजे'

गीत म्हटले, त्यात निसर्ग आणि मानव यांचं संतुलन राहिले पाहिजे, अशा तऱ्हेने समाजाने जीवनाची वाटचाल केली पाहिजे. ते बिघडलं तर 'विकृती' आली असं समजावे. विषमता निर्माण होते. आणि विषमतेमुळे दमन, शोषण होते आणि संघर्ष, लढाया सुरू होतात. तेव्हा या सर्व अंगांचे संतुलन पाहून वाटचाल केली पाहिजे.

आता मला एक सांगावेसे वाटते की, आदिवासी विकासाच्या संदर्भात चर्चा झाली, प्रश्नांच्या संदर्भात चर्चा होत आहे, आणखीन होणार आहे. आदिवासींच्या प्रश्नांच्या बाबतीत बघितले तर कोणत्या पातळीवर, कोणत्या क्षेत्राच्या बाबतीत आदिवासींचे प्रश्न आहेत. धरणाचे प्रश्न आहेत. जंगल जमिनीचे प्रश्न आहे. वनस्पतीचा प्रश्न असेल. कुटीर उद्योग म्हणजे लहान उद्योग लहान जंगलात काढायचे असेल किंवा गवत काढायचे असेल, अन्याय अत्याचार याच्याविरूद्ध लढण्याचे प्रश्न असतील. वेगळ्या पातळीवरचे विकासाचे प्रश्न असतील. ह्या संदर्भात आरोग्याचे प्रश्न असतील तर हे प्रश्न सुटे-सुटे सोडविण्यापेक्षा एक अशी दिशा देता येईल समाजाला की प्रश्नच निर्माण होणार नाही.

या प्रश्नांना उत्पन्न करणारी काहीतरी रचना आहे काय या समाजामध्ये, ते बघायला पाहिजे. असे प्रश्न तुकड्या - तुकड्यांनी नडत राहतील आणि हा संघर्ष असाच चालत राहिल आणि हितसंबंधी लोक आपले हित आबाधित राखून खुशाल आणखीन प्रश्न निर्माण करत राहतील. याच्यामध्ये मी असं एक उदा. देतो, मलेरियाचा रोग. मलेरिया झाला की त्याच्यावर एक इलाज करायचा. ठीक आहे, आजारी पडला तर त्याला इलाज केला पाहिजे पण मलेरिया कशामुळे होतो, जर डास चावून होत असेल आणि डास कुठे होतात, तर गटारीमध्ये होतात; तर मग ती गटारे नाहिशी करायला पाहिजेत. जर गटारे नाहीशी झाली तर मच्छर/डास नाहीशे होतील. मलेरियाचा रोग नाहिसा होईल.अशा तऱ्हेने मुलभूतरित्या हे प्रश्न कसे निर्माण होणार नाहीत, त्यांचा कसा खात्मा करता येईल यासंदर्भात विचार केला पाहिजे. म्हणतात ना 'ना रहेंगा बास न बजेगी बांसरी' अशातऱ्हेनेही विचार आपल्याला करावा लागेल. आणि हे फक्त आदिवासींचेच प्रश्न आहेत का? हे प्रश्न इतर समाजाशीसुद्धा जोडलेले आहेत. इतर उपेक्षित समाजामध्ये भटके-विमुक्त, दलित, कष्टकरी असे अनेक आहेत. अनेक अंगांनी ते दबलेले आहेत. मग त्यांचे नि आपले प्रश्न जोडून कसे पुढे जाणार आहोत यासंदर्भात देखील विचार केला पाहिजे. या महाराष्ट्रात ज्यांनी आयुष्य दिले त्यांचेही योगदान आम्ही मानतो. आम्ही त्यांना नाकारत नाही.

मध्यप्रदेश, गुजरात, राजस्थानमध्ये आदिवासींमध्ये इतरांनी जाऊन काम केलेले आहे. जीवन, आयुष्य घातलेले आहे. त्यांचे योगदान आम्ही मानतो. पण एक लक्षात ठेवायला पाहिजे की याच्यातून आपण उभं केलं का त्यांना, त्या समाजाला, स्वतःच्या पायावर? तसं दिसत नाही. जे नेतृत्व उभं करायला पाहिजे ते का उभं करू शकलो नाही आम्ही? जर इतरांचे ऐकून प्रश्न सोडवायचे असतील तर हे किती वर्षे चालत राहणार आहे. स्वतःच्या पायावर उभं राहण्याचं बळ आपण का देऊ शकलेलो नाही. म्हणजे कुठेतरी कैवार दिसतो तिथे. 'अरेरे बिच्चारे' हा कैवार दिसतो. त्याच्यापेक्षा त्याने स्वतःच आपल्या प्रश्नांच्या संदर्भात विचार करायला पाहिजे. तो स्वावलंबी पाहिजे. आणि स्वतःचे प्रश्न सोडवायला पाहिजे.

शिक्षणामधून सुद्धा परावलंबी जीवनव्यवहार येतो. शासन सवलती देतं, त्याच्यातूनही परावलंबित्व दिसून येतं. अशातून माणूस स्वावलंबी होतच नाही. या शिक्षणव्यवस्थेने हात पसरवण्याच्या पलिकडे आणखी काय दिलेलं आहे. इतर संस्था, संघटना, पक्ष यांनी

सुद्धा एकप्रकारचा आत्मविश्वास द्यायला पाहिजे होता तो ते देऊ शकलेले नाहीत. आदिवासीला त्याच्याच पायावर उभे राहण्याचा आत्मविश्वास जोपर्यंत आम्ही प्रामाणिकपणे देऊ शकत नाही, तोपर्यंत या समाजाच्या भाग्यामध्ये असंच राहणार की जो शिट्टी मारेल त्याच्या हाकेकडे ते जो दैनंदिन गरजांकरिता अडलेला आहे तो जाणारच. त्याला हे माहीत नाही की, हा भाजपवाला आहे, कॉंग्रेसवाला, कम्युनिस्टवाला आहे. माझा प्रश्न हा सोडवतो ना मग तिथे विचारसरणीची बांधीलकी येत नाही. आज हा समाज त्यामुळे वेगवेगळ्या पक्षांच्या दावणीला बांधला गेलेला आहे, वैचारिक पातळीवर. आम्ही विचार करतो की, या समाजाला पुढे घेऊन जाणारे एक नेतृत्व उभं राहिलं पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी असं सांगितलेलं आहे, 'शिक्षण हे वाघिणीचं दूध आहे. जो पिईल तो डरकाळी फोडल्याशिवाय राहणार नाही.' पण हा अर्थ लक्षात घेतला गेलेला नाही. जेव्हा मी चिंतन करतो तेव्हा असं दिसतं की, आदिवासींमध्ये खूप शिकलेली मंडळी आहेत. पण ती तर शेपूट हलवत बसलीत. कशामुळं झालं हे असं? ते डरकाळी का फोडत नाहीत. त्याचं कारण एकच आहे की जे शिक्षण आपण घेतो ते समाजाशी नाळ जोडलेलं पाहिजे. जर समाजाशी नाळ तोडून शिक्षण घेतलेलं असेल तर त्यातून फक्त वैयक्तिक जीवन जगायचं, माझं कुटुंब पोसायचंय, समाजाशी मला काही देणंघेणं नाही.

कितीही शिकलं, कितीही पदवीधर झालं तरी अशा तऱ्हेने मूळ समाजाशी नाळ तोडून घेऊन ते शिक्षण घेतले असेल तर आपली नोकरी संभाळण्यासाठी तो डरकाळी फोडणार नाही. म्हणून प्रसंगी तो शेपूटही हलवतो. आणि म्हणून असे नेतृत्व निर्माण व्हायला पाहिजे की त्याची समाजाशी नाळ जुळली पाहिजे. आणि ती फक्त दैनंदिन प्रश्नांसाठी नाही, तर लांब टप्प्यापर्यंत मी लढत राहणार हा आत्मविश्वास त्याच्यामध्ये निर्माण व्हायला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला घटनात्मक, राजकीय बळ दिलेलं आहे, पण आर्थिक समानता नाही. मग ही जी विषमता आहे समाजात आणि देशात, विशेषतः आदिवासींमध्ये आणि आदिवासी सोडून इतर समाजात ही जी विषमता आहे, यामुळे जे प्रश्न निर्माण होतात, हे सगळे प्रश्न आपण कशाप्रकारे आपण सोडवणार आहोत, यासंदर्भात सुद्धा आदिवासींनी विचार करायचाय. नेतृत्वाच्या संदर्भात बोलायचं झालं तर आदिवासींच्या शिवाय इतर लोक आदिवासींना फक्त फसवतात असं आमचं मत नाही, जे आम्हाला पुढे जायला मदत करणार आहेत, त्यांची मदत आम्हाला हवी आहे. पण ते अशा तऱ्हेने नको पाहिजे की 'अरेरे बिचारा' करून तिथल्या तिथेच पिळवणारी आहे. आणि कैवार दाखवणारी आहे. आम्हाला आमचे पाय बळकट करणारे पाहिजे. अशी मदत की, आम्हाला बळ देणारी आहे, ती मदत आम्ही स्वीकारू.

जग हे चंद्रमावर गेलेलं आहे. उत्पादन अमूक तमूक झालेलं आहे. शेतीयंत्र निर्माण झाल आहे मुख्य म्हणजे जागतिकीकरण झालेलं आहे. मग यात आदिवासी संस्कृती कशी टिकून राहणार? मूल्ये कशी टिकवणार? आणि जागतिक पातळीवर जे शोषण चाललेलं आहे ते कोणत्या मूल्यांच्या आधारावर? ते व्यक्तीधिष्ठित मूल्ये आहेत. मानवी मूल्ये त्यात नाहीत. मानवी मूल्यं ही फक्त आदिवासी जीवनात आहेत, ती आपण ओळखायला पाहिजे. असे स्वप्न आपण कुठून बघतो ते समाज जगतो ते बघूनच आपण बहुतेक हे करत असतो.

गांधीजींनी ग्रामस्वराज्याची हाक का दिली, कारण ते स्वतः ते जीवन जगत होते. म्हणूनच समाजातली जीवनमूल्ये शोधली पाहिजेत. ती नाकारून चालणार नाही. चंद्राला डाग आहे, हे न बघता त्याला प्रकाश

सुद्धा आहे हे पाहायला शिकलं पाहिजे. आदिवासी अंधश्रद्धाळू आहेत, त्यांनी ते सोडलं पाहिजे. पण आदिवासींमध्ये इतर अनेक चांगले गुण आहेत ते पाहा. माणूसपणाची जीवन मूल्ये त्याच्यात आहेत. पं. नेहरूंनी सांगितलेली पंचशील तत्त्वे कुठे आहेत आज, जी त्यांनी आदिवासींनाही दिली होती.

डॉ. एल्विनने आयुष्य घालवले आदिवासींमध्ये. पण अजूनही आदिवासींची प्रत्येक गोष्ट नाकारली जाते. लग्नपद्धती सुद्धा नाकारली जाते. 'जंगली पद्धतीची लग्ने' असं हिणवलं जातं. खरंतर आदिवासींमध्ये लोकशाही असते. बाकीच्या बामणी पद्धतीला मी नेहमी नाकारतो, कारण आदिवासींमध्ये सर्वांनी मान्य केल्यानंतर लग्न लावले जाते, ही लोकशाही असते. ब्राह्मण काय करतो, तर तो संस्कृतमधल्या न समजणाऱ्या गोष्टी (कदाचित त्यालाही त्यातलं समजत नसेल) करत असतो. त्यातून फक्त तांदूळ टाक, पैसे टाक एवढंच कळतं. यावरून तो ब्राह्मण हा हुकुमशहाच म्हणायला पाहिजे. आमचा परधान हा लोकशहा असतो. आम्ही अशी लोकशाहीवादी मूल्ये आमच्या व्यवहारात जपत असतो. आमचा विरोध ब्राह्मणाला नाही, तर त्याच्या व्यवहाराला, प्रवृत्तीला आहे. देव मुद्रामाता ही देवी आहे. कोणतं असं कर्तृत्व केलं आहे तिला की लाखो लोकं स्वीकारतात, देवी म्हणून. बाकीच्याचे चमत्कार पण त्यांनी त्याच्या काळात जे कर्तृत्व केले आहे त्यांचा भाग म्हणून त्याला लोक आज देव मानतात. पण त्याचं-ही आता अतिक्रमण होत आहे की, देवमुद्रामाता म्हणजे जगदंबा. याचं कारण एवढेच की, या मातेची आदिवासी पद्धतीने पूजा होते.

जगदंबा म्हटले तर आदिवासी पद्धतीने पूजा नाही होणार, तर ते कुणाच्या पद्धतीने पूजा होणार? हिंदू धर्माच्या पद्धतीने होणार? आणि मग संपूर्ण पुढचं आयुष्य कसं जगायचं, काय खायचं? कारण तशी पूजा केल्यावर हे खायचं नाही, ते प्यायचं नाही अशी बंधने येतात. म्हणजे त्यांच्या हिंदूंच्या नीतीमूल्यांच्या नुसार चालायचं. तुमची जी नीतीमूल्ये आहे तुमचे जे जीवन आहे, ते सोडून द्यायचं? आमच्याकडे इंदल होतं. इंदल सोडून द्या सत्यनारायण करा अशा तऱ्हेने होतं. म्हणजे इंदलमध्ये काय असतं? झाडांच्या फांद्यांची पूजा केली जाते. रात्रभर ढोल वाजवून नाचतात. गाव सुखी समाधानी शेतीमध्ये भरपूर पिकायला पाहिजे अशी मानसिकता असते म्हणून इंदल पूजले जातात.

तेव्हा असं म्हटलं जातं की इंदलाच्या बदल्यात तुम्ही सत्य नारायण पूजा करा. इंदल एक असेल तर आमचं असं म्हणणं आहे, 'सत्यनारायण सोडून द्या आणि तुम्हीपण इंदल करा ना ! तुम्ही गळ्यात ढोल घ्या, वाजवा. धरती मातेची पूजा करा. हे का करत नाही तुम्ही?' कारण त्यांना माहीत आहे, जर असं केलं तर आपली सांस्कृतिक मूल्ये नष्ट होतील. आदिवासी संस्कृतीची मूल्ये पुढे जातील, ही भीती त्यांना आहे. ही जीवन मूल्ये दुर्गामाता सांगण्यामागेही तेच आहे. सगळ्यात तेच आहे. तेव्हा आदिवासींनी एवढं लक्षात ठेवलं पाहिजे की हे सगळे लोक आपल्याला कोणत्या दिशेने वळवायचा प्रयत्न करताहेत, सावध रहायचं. पूर्वी एकलव्याचा अंगठा तोडून घेतला; पण आत्ताच्या आदिवासींची अवस्था अशी आहे की तेव्हा तर अंगठा तोडून घेतला, आता नजरच काढून घेणारहेत. आंब्याचा कलम करून दुसऱ्या आंब्याला लावला तर तो आंबा लागतो. तशाप्रकारे आदिवासींना कलमी आदिवासी करायचं, अशा प्रयत्नात आहेत.

तेव्हा आपण हे लक्षात ठेवलं पाहिजे, आपण पुढे जात असताना, नेतृत्वाचा विकास करत असताना आपण सुद्धा तो अभ्यास करण्याची गरज आहे की, कोणती जीवनमूल्ये आपली आहेत. आज प्रत्येक आदिवासी साहित्यिक एका इझम मध्ये, वादामध्ये अडकलेला आहे. याबाबत आम्हाला काही म्हणायचं नाही. पण आमच्या

जीवनातल्या बेड्या तोडणारा जो विचार असेल तो विचार आदिवासींनी स्वीकारायला पाहिजे. केवळ आदिवासीने नाही, तर सर्व समाजाने स्वीकारला पाहिजे. आणि इथे आदिवासी एकजूट करून कुठल्यातरी टप्प्यामध्ये विकास करायचा असाही भाग नाही. आणि एकूणच समाजाला दूर ढकलणार, असेही नाही.

आमची अस्मिता जेव्हा फुलत असेल तेव्हा इतरांची दबलेली अस्मिता सुद्धा फुलवली पाहिजे हा दृष्टिकोन आम्ही स्वीकारतो. आणि तसं पुढं जायला मी सांगतो. आमचे अस्तित्व दुसऱ्यांनी नष्ट करायचा प्रयत्न चालू आहे म्हणून आम्ही दुसऱ्याचं अस्तित्व नष्ट करणार, अशी आमची भूमिका नाही. आम्ही कुणाचेही अस्तित्व नष्ट करणार नाही. जीवनातली वैविध्यता आणि अशातऱ्हेने जीवनाकडे जातो की कोणीही खालचा राहणार नाही, कोणी वरचा राहणार नाही. कोणी श्रेष्ठ-कनिष्ठ राहणार नाही. आम्ही सगळे खांद्याला खांदा लावून उभे राहू.

अशा तऱ्हेचे विचार, समाजबांधणी आणि आपलं नेतृत्व आपण उभे करून पुढे गेलं पाहिजे. आणि जे आदिवासी कर्मचारी, अधिकारी आणि विचारवंत आहेत, त्यांना मी एवढेच सांगतो की, जे बरेच शिकले आहेत ते सर्व बदमाश आहेत. अधिकारी झालेत ते बदमाश आहेत, असं अजिबात माझं मत नाही. पण समाजात त्यांचा जो प्रभाव पडलेला आहे, जे वैयक्तीक जीवन त्यांनी स्वीकारलेलं आहे. समाजाशी नातं तोडून टाकलेलं आहे. तर असं त्यांनी करू नये. असंच जर तुम्ही करणार असाल तर त्या बिचाऱ्या समाजाचं काय होणार? कोण वाली आहे त्यांचा? तुम्ही जर लाथ मारणार असाल, तर त्यांना कोण वाली आहे? इतर कितीही कुरवाळतील.

आणि म्हणून बलिदान देण्याची तयारी ठेवून, आपण समाजाशी नातं ठेवून आपण त्यांचा विकास आणि त्यांचा आत्मसन्मान जपला पाहिजे. त्यासाठी लढाई केली पाहिजे आणि कुठेही आपल्या समाजात काही झालं असेल तर प्रत्यक्ष त्यांच्याशी चर्चा आपण केली पाहिजे. आमची ओळख इतकी विद्रूप, बदनामकारक करून टाकलेली आहे. आमच्या इतिहासातल्या बिरसा मुंडा, खाजा नाईक अशा सारख्यांवर कोणी काही लिहिलं असेल तर ते पुढं आणलं पाहिजे आणि त्याच्यावर नजर ठेवली पाहिजे. मी नुकतंच ३०० पानाचं असलेल्या पुस्तकाची १२५ पानं वाचलेली आहेत.

'तंट्या' हे बाबा भांड यांचं पुस्तक. त्याच्यामध्ये खूप माहिती मिळवलेली दिसते. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन. चांगली गोष्ट आहे, पण ती भूमिका मांडत असताना एके ठिकाणी तंट्याची आई त्याच्या दारू पिऊन आलेल्या बापाकडून मार खाते. पण मार खात असताना ती सुखावते, असे लिहिले आहे. म्हणजे कुठेतरी आदिवासी स्त्री मार खाते, दारू पिलेल्या नवऱ्याचा मार खाते आणि ते समर्थनीय आहे, अशातऱ्हेचा भाव त्यातून आलेला आहे. तो मला बरोबर वाटत नाही. म्हणजे आदिवासी समाजात जी गोष्ट नाही ती विकृत रूपात मांडणं योग्य नाही. हा विकृती करणारा भाग आहे. आदिवासी कार्यकर्त्यांनी अशा विकृती करणा कडे लक्ष द्यावे आणि आपली चळवळ पुढे न्यावी. आपले प्रश्न आपणच कसे सोडविण्यासाठी सक्षम होऊ याकडे पाहिले पाहिजे. ■

## काळुराम दोधडे

आदिवासी संस्कृती आणि विकास याबाबत मला वाटतं की, आदिवासी संस्कृतीमधली जी वैशिष्ट्ये आहेत ती समतेवर आधारित, विषमता तोडणारी आहेत; पण असे जे जे आदिवासीतले गुण अन्य समाजाने स्वीकारायला पाहिजेत ते मला कुठे दिसत नाही. हे कसं आहे की, वाहरूजींनी जे मांडले की, आमच्यामध्ये

लोकशाही पद्धतीची लग्नपद्धती असते. नवरा बायकोचं जर पटलं नाही, एखादा न्यायनिवाडा असेल तर जो शिकलेला नाही, पण प्रामाणिक असेल तो माणूस न्याय देतो. आणि त्या न्यायदरबारात उभा राहणारा, जो दोषी आहे, तो घाबरतो. म्हणजे आदिवासींच्या कोर्टात तो निर्दोष होऊ शकत नाही, तो दोषीच राहू शकतो. आपल्या कोर्टाप्रमाणे खऱ्याचं खोटं या आदिवासी कोर्टात होत नाही. हजारो वर्षांपासूनची जी परंपरा आदिवासींमध्ये होती, ती परंपरा जर राहिली असती आणि इतर समाजाने ती स्वीकारली असती, तर आज आपल्याला जी विषमतेची दरी फार मोठ्या प्रमाणात दिसते, ती दिसली नसती. माणूस म्हणून बघण्याची जी रीत होती, म्हणजे एका शब्दावर विश्वास ठेवणारी संस्कृती आणि कागदावर विश्वास ठेवणारी संस्कृती. आम्ही माणसावर विश्वास ठेवतो आणि म्हणूनच आम्ही माणसाला महत्त्व देतो.

इतर समाजातला माणूस माणसावरचा विश्वास नाकारतो. वाहरूजींनी दुसरी एक गोष्ट सांगितली की शिकलेला माणूस हा समाजाची नाळ का तोडतो. आजच्या शिक्षण पद्धतीमध्ये तो समाजापासून दूर करण्याची मूल्ये आहेत आणि त्यामुळे कळत नकळत तो नोकरीच्या अनुषंगाने समाजापासून वेगळा होतो शिकलेला माणूस समाजापासून दूर जातो. पूर्वीपासून आम्ही कितीही कर्तृत्ववान, चांगलं काम केलं तरी आम्हाला नाकारण्याची भूमिका घेतली गेली. या देशातले आम्ही मूळ आदिवासी असून सुद्धा आमचा विकास झाला नाही, हे सगळं राज्यकर्ते, पुढारी, जे चिंतन करणारे लेखक सगळे कबूल करतात.

आम्ही एवढा करोडो रूपये खर्च केला आणि करोडो रूपये खर्च करून आदिवासींचा विकास झाला नाही असं चित्र रंगवलं जातं. पण त्यांची विकास नीती काय आहे? म्हणजे विकासावर किती खर्च झाला? आता तुम्ही जर विकास योजनांवर खर्च करतात तर यामध्ये सबंध देशाभराचा खर्च आहे. हा खर्च आदिवासी भागात १० ते १५टक्क्यांपेक्षा जास्त केलेला नाही व ९०टक्के खर्च अक्षरशः नोकरशाही, जीपगाडी, मोटारगाडी, विमानाचे तिकिट यावर खर्च झाला असेल. तर अशाने विकास होणार नाही. आणि म्हणून आता यातून आपल्याला काहीतरी साधलं पाहिजे. म्हणजे सर्व आदिवासी समाज आज संपण्याच्या मार्गावर आहे. हा समाज जर वाचवायचा असेल तर जे काही थोडेफार ७९टक्के समाजाला उपयोगी पडतील असे जे गुण आहेत जे आदिवासी समाजाने हजारो वर्षांपासून राखून ठेवले आहेत.

आजचं सरकार म्हणतंय लोकन्यायालय. आता आदिवासींपासून लोक न्यायालयाची सुरूवात केली, असं म्हणायला त्यांना लाज वाटते. आदिवासींमध्ये हजारो वर्षांपासून ही प्रथा होती; पण आदिवासींचे नाव न घेता आम्ही लोक न्यायालय सुरू केलेले आहे, असं म्हटलं जातं. दुसरी गोष्ट आदिवासी समाजात एखादी बाई प्रसूत होताना मेली तर ते मूल गावाचं समजलं जातं. कुठल्या धर्मात, समाजात आहे का, त्याला फुकट दूध पुरवण्याची प्रथा? मग ती बकरी असेल, शेळी असेल, ती आजही समाजामध्ये आहे. आज समाजात चांगलं असेल तर ते स्वीकारलं पाहिजे.

दुसरी गोष्ट अशी आहे, माझ्या घरात भरपूर धान्य असेल, तर मी असा व्यापाराचा धंदा करणार नाही, तर माझ्या बाजूला कोण उपाशी मरतो आहे, त्याला सांगेल "पोरांना उपाशी मारू नको, माझ्या घरातील धान्य घेवून जा." पण वरचा समाज काय सांगेल, 'मी तुला धान्य देतो त्याबदल्यात तुझं घर, तुझा बैल, तुझा नांगर लिहून दे.' ही पद्धती आदिवासी समाजात नाही. एक दुसऱ्याला मदत करण्याचे जे त्यांच्यात गुण आहेत ते स्वीकारले गेले तर आपलं

बरेचसे काम ७९टक्के लोकांच्या विकासाला उपयोगी पडेल. पण आदिवासींचं आहे म्हणून ते स्वीकारायचं नाही. दुसरं असं आहे की अंधश्रद्धांमध्ये सुद्धा आम्हाला बदनाम केलं जातं. हे रोज सत्यनारायण करतील आणि अगदी डॉक्टर झाला तरी सत्यनारायण करतील. पण ती अंधश्रद्धा होत नाही. आम्ही मात्र अंधश्रद्धाळू. सरकार म्हणतं, सर्वजण म्हणतात, अगदी पुढारी सुद्धा सांगतात 'दुर्बलांकडे लक्ष द्या.' आज मी असं सांगतो की, आदिवासींमध्ये आंधळी, पांगळी असली तरी त्यांना भीक मागू दिली जात नाही. त्यांना कुटुंबात सामावून घेण्याची जी पद्धती आहे ती इतर कुठल्याही समाजात नाही. आजपर्यंत आमचा माणूस भिकारी नव्हता, पण सरकारने त्याला योजनांची भीक, घराची भीक, धान्याची भीक अशी आमीषे दाखवून त्याला भिकारी बनवत चालवला आहे.

पूर्वी एक-दुसऱ्याला मदत करून आपलं घर उभं करण्याचं काम ते करत होते, पण आता आमच्यामध्ये विकासाच्या नावाने भांडणं लावून आमचा समाज साफ करून टाकला आहे. अशा पद्धतीचा विकास आम्ही नाकारतो. आज सगळीकडे जर बघितलं तर असा तिटकारा येतो. खरं नाही, हे ज्यांच्या करता विकासाच्या गोष्टी आहेत, त्यांना काही मिळणार नाही. तुमचा पुणे जिल्हा घ्या, नाहीतर देशातला कुठलाही जिल्हा घ्या जो दुर्बल घटक आहे, त्या दुर्बल घटकाला कुठलीही अजून सवलत मिळालेली नाही. जो साधारण बरा आहे त्याच्यापर्यंतच ते गेलेलं आहे.

म्हणजे आता आपल्या आदिवासींची जी नीती होती की जो सगळ्यात खालच्या थरातला आहे, त्याच्याकडे बघितलं पाहिजे. पण सरकारी पातळीवरील जे लोक आहेत हे जास्तीत जास्त वरच्या टगे लोकांना कशी मदत देता येईल आणि आम्हाला त्याच्यातून काही दान मिळेल का? या अपेक्षेने हा विकास चालला आहे. हा असल्या पद्धतीचा सरकारी विकास मला तरी आणि एकूण समाजातल्या ८०टक्के लोकांना तो हितावह नाही. आणि त्यासाठी आदिवासींच्याकडे शेवटची दृष्टी टाकण्याची वेळ आली आहे. म्हणजे समाजाच्या ताब्यात दिल्याशिवाय, वर्चस्ववादी संस्कृतीकडून विकास होईल, असं मला कदापी वाटत नाही. तिसरी गोष्ट अशी आहे की, आता आर्थिक समता आली, म्हणजे वाहरूने जो मुद्दा मांडला तोच मुद्दा मी पण मांडतो, की सगळीकडे आज विकासाच्या नावाने विनाश चालू आहे. म्हणजे आज तुम्ही जर बघितलं तर ठाणे जिल्हा हा आदिवासी जिल्हा, धुळे जिल्हा हा आदिवासी जिल्हा. या ठाणे जिल्ह्यात तुम्ही जाऊन तपासा, त्यात कोणाला स्थान आहे.

आज मुंबईत तुम्ही तर बघितलं तर ७०टक्के खोट्या आदिवासींची भरती आहे. जो खरा आहे, त्याला कुठलाही दाखला मिळू शकत नाही. अशा परिस्थितीत हे चाललेलं आहे. आणि त्यातून आपला विकास होईल असं वाटत नाही. तर गावाला अधिकार दिला पाहिजे. जे कलेक्टर, मामलेदार दाखले देतात त्यांना आमची संस्कृती काय माहिती आहे? त्यांना आमच्या संस्कृतीबद्दल काही माहीत नाही. ते आमचे दाखले देतात. हे दाखले देताना सुद्धा त्या समाजानीच दाखले दिले पाहिजे असं मला स्वतःला वाटतं. या सगळ्या गोष्टींचा परिपाक म्हणजे आदिवासी संस्कृतीचं वैशिष्ट्य जे आहे ते वैशिष्ट्ये, चांगले जे गुण आहेत ते स्वीकारले गेले पाहिजेत.

आज आपल्या आश्रम शाळा, ज्यांना आदिवासी विकासाकडे नेणाऱ्या गोष्टी करता येत, त्या आश्रम शाळेत जे पूर्वी नाच करत होते, जी निसर्गाची आराधना करणारी मंडळी होती ती आज गरबा नाचायला लागलीत म्हणजे आमची संस्कृती पुसून टाकायला लागलेत. म्हणजे आज सगळ्या भागात हे सगळं चालले आहे. त्यामुळे

आमच्या संस्कृतीतल्या देवदेवतांचे अस्तित्व नष्ट व्हायला लागलं आहे. रामायण काळात आदिवासींना वानर म्हटलेलं आहे. म्हणजे तुम्ही माणसं नाही असं सरळ सांगितलं आहे. तरीपण आम्ही रामदेव पूजायला लागलो. पण हे कोणी पूजायला लावलं. वर्चस्ववादी संस्कृतीने आमचा इतिहास पुसून टाकण्यासाठी रामायण आम्हाला वाचायला लावलं. ते आम्हाला वाचलंच पाहिजे, नाहीतर आम्हाला शिक्षक नापास करतील. म्हणजे तो चुकीचा इतिहास आम्ही वाचला.

शिवाजीच्या काळात सुद्धा आम्ही शिवाजीला मदत केली. आदिवासींची ओळख म्हणजे तेव्हा आम्हाला मावळे केले, म्हणजे आम्ही आदिवासी नाही. आता वनवासी म्हणायला लागलेत. डोंगरी, जंगली म्हणायला लागलेत. जगाच्या नकाशामध्ये आमचं नाव कट करायचा मार्ग सुरू केला आहे. जी माणसात जमा नाही ती आदिवासी. पण आदिवासी म्हणालात तर त्याची अस्मिता वाढते म्हणून वनवासी. अशा पद्धतीने जे चाललेलं आहे आणि त्यांना आम्ही थारा देतो. आज सगळीकडे वनवासी कल्याण आश्रम आहेत. तर तुमच्यात खरोखरच चळवळीचा जर रेटा असेल तर तुम्ही त्यांना सांगितलं पाहिजे की, खबरदार आम्हाला वनवासी म्हणालात तर. तुम्ही इथून चालते व्हा, असं म्हणायची वेळ आली आहे. कुठेतरी आपली नाळ तुटलेली आहे. ती नाळ आपल्याला कशी जोडता येईल आणि समाजाला ताकद कशी देता येईल हे पाहिले पाहिजे.

तुम्हाला लढता नाही आलं तर लढणारी लोकं खूप आहेत, पण तुमची आर्थिक मदत ही खेड्यातला माणूस जेव्हा उत्सव करतो तेव्हा त्याच्याकडे काही पैसा नसतो. तेव्हा ती मदत कशी देता येईल हे पाहिले पाहिजे. आता हे केलं पाहिजे, नाहीतर आपल्याला एकंदरीत सगळीकडून नष्ट करण्याची भूमिका घेतलेली दिसते. आदिवासींच्या भोळेपणाची या लोकांनी चांगली लूट केली आहे. आदिवासी भोळा आहे त्याचा फायदा कसा घ्यायचा तो या लोकांनी बरोबर घेतला आहे. तेव्हा आदिवासींनी आता विचार करायला पाहिजे, आम्ही या संस्कृतीला का स्वीकारायचं, तर या संस्कृतीमध्ये न्यायाची व्यवस्था आहे, लोकशाही आहे. या संस्कृतीमध्ये अंधश्रद्धा जर तुम्ही म्हणत असाल तर बकरा कापला तर सगळ्यांना सारखी कुळी जाते.

पण इथे दगडूशेठचा गणपती मी बघतो, डेकोरेशन दोन-पाच मैल असते. गणपतीपुढे एखादी काकडीची फोड आणि बाकी बियर पार्ट्या चालू असतात, तसं आदिवासींमध्ये नसतं. आदिवासींमध्ये जे काही असेल ते सगळ्यांनी सारखं वाटून घ्यायचं, ही पद्धत आहे. आम्ही जरी शिकार केली तर मला काही मोठा वाटा नाही, तर समान सगळ्यांना वाटा असतो. ही संस्कृती भाजप व आरएसएस पुसून टाकण्याच्या मार्गावर आहे. आज आमचं जगणं संपलेलं आहे. आणि बाकीचा जो ८०टक्के समाज आहे तोही त्याच लाईनवर उभा आहे. त्याचीही केव्हातरी कत्तल होणार आहे. आणि त्यासाठी आदिवासींत काही गुण आहेत ते स्वीकारले पाहिजेत.

तुम्हाला सांगायचं झालं तर, बलात्कार आज आपण बघतो. सगळया समाजात बाईवर बलात्कार होतो. तिला मारून टाकलं जातं. परंतु ही घटना तुम्हाला आदिवासी समाजात मिळणार नाही. हे चांगलं असेल तर इतर समाजांनीही ते स्वीकारलं पाहिजे. 'हुंडा' सारखी अनिष्ट प्रथा आदिवासी समाजात नाही. 'हुंडा' आज ही जर प्रथा आदिवासी समाजात सुरू झाली तर आमच्या सुद्धा आया बहिणी मरायला सुरूवात होईल. 'देवदासी' प्रथा आमच्यात नाही. काही आदिवासीत 'भुताटकी' सारखे दोषही आहेत. पण एकूण मानव मुक्तीच्या लढाईत आदिवासींचे गुण स्वीकारले तर ८० टक्के समाजाला एक मानव मुक्तीच्या लढाईकडे जाता

येईल. आणि म्हणून मी असाही विचार करतो की, आदिवासी समाजात पूर्वी कोणी शिकलेले नव्हते, नोकरीला नव्हते. आता बरेच जण नोकरीवर गेले. पण समाजापासून त्यांची नाळ तुटली आहे. केव्हातरी गावाला येऊन सांगणार की, मी इथलाचं आहे. इथलाच आहे तर, इथं कधी बघितलाच नाही.

त्यांना विनंती आहे की जरी तुम्ही पुण्या-मुंबईसारख्या सुखी जीवनात राहात असला तरी आपल्या समाजाकडेही त्यांनी लक्ष दिलं पाहिजे. नाहीतर नव्या पिढीला तुमची ओळख राहणार नाही. समाज पद्धती टिकवली पाहिजे. भोगवादी, वर्चस्ववादी संस्कृतीपासून दूर राहिलं पाहिजे. आता पर्यावरणाचा धोका वाढला आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यापुढे जंगले नष्ट होऊ लागलीत. चुकीच्या मार्गाने चाललेला विकास हा विनाशाकडेच नेणारा आहे, तो आम्हाला मुळीच नको. संपूर्ण समाजाचाच विकास कसा होईल याकडे आपण लक्ष दिलं तर या भोगवादी संस्कृतीला आपण रोखू शकू. आमचा इतिहास आता आम्हालाच मांडावा लागणार आहे. दुसऱ्याचं फुकटचं घ्यायचं नाही ही आमची भूमिका आहे. जरी आम्ही शिकलो नसलो तरी आणि आम्ही अडाणी असलो तरी आमच्यात माणुसकी आहे. आणि आम्ही खरं बोलतो, हाच आमचा गुन्हा आहे. या दृष्टीने विकासाची दिशा काय असली पाहिजे हे ठरवलं पाहिजे.

आजच्या परिस्थितीत एक भयानक परिस्थिती अशी की, आजचा कुठलाही माणूस त्याचा आत्मविश्वास गमावून बसला आहे. कुठल्याही संघटनांनी आदिवासीला स्वतःच्या पायावर उभं केलेलं दिसत नाही. म्हणजे आम्हाला एकसंध कुठे होऊ दिलेलं नाही. आदिवासी नेतृत्वस्थानी येऊ दिलेलं नाही. म्हणजे वर्चस्ववादी संस्कृतीने आम्हाला दाबून ठेवलं. 'तुम्ही विकास करा पण आम्ही सांगू तसा. चुकीचा असला तरी तो तुम्ही स्वीकारला पाहिजे.' आणि त्यामुळेच आमचा विकास होऊ शकलेला नाही. हे लक्षात घेऊन आदिवासींना स्वतःच्या पायावर कसे उभे करता येईल आणि आपण सारे लोक आदिवासींबद्दल जे चुकीचं लिहितात ते कसं पुसून टाकता येईल त्या दृष्टीने जे चळवळीत काम करतात, लेखक आहेत, पुढारी आहेत, त्यांनी यावर आघात केला पाहिजे. आदिवासीचा विकास संस्कृतीला धरून व्हायला पाहिजे. त्यावर खूप चर्चा केली पाहिजे. आणि आदिवासींचा इतिहास घेतला पाहिजे. ■

## डॉ. गोविंद गारे

### (अध्यक्षीय भाषण)

अस्मितेची प्रेरणा आपल्याला इतिहासामधून मुख्यतः मिळते आणि इतिहासामध्ये ज्या लढ्यांनी व इतिहासांनी ही प्रेरणा जागी होते त्याचा उल्लेख काही मंडळींनी केलेला आहे; परंतु हा इतिहासच नकारात्मक भूमिकेतून मांडला जात आहे, त्यामुळे आदिवासीची अस्मिता पुसली जात आहे, पुसली गेलेली आहे. अशा प्रकारचा उल्लेखही इथे झालेला आहे आणि ही वस्तुस्थिती आहे. कारण इतिहासामध्ये आदिवासीची मांडणी शैक्षणिक वाटचालीत विशेषतः अस्मितेची मांडणी नकारात्मक भूमिकेने आल्यामुळे ही एक मोठी समस्या आदिवासींपुढे आहे.

म्हणून इतिहासाचं पुनर्लेखन करणे हे खऱ्या अर्थाने अस्मिता शोधण्याचं एक सूत्र आपल्याला सापडू शकेल. त्यात अनेक उल्लेख आहेत- उदा. बिरसा मुंडा वगैरे, आणि नुसतंच पुनर्लेखन नाही, तर आजच्या पाठ्यपुस्तकांपर्यंत इतिहासाचं सकारात्मक पुनर्लेखन करणं आवश्यक आहे. आणि तसं झालं तरच अस्मितेला चालना देता येईल किंवा आदिवासींची अस्मिता प्रखरतेने मांडता येईल. तेव्हा इतिहास हा एक धागा आपल्याला अस्मितेसाठी वापरता येण्यासारखा आहे.

आजच्या आदिवासी तरूणाला आदिवासींमध्ये कार्य करणाऱ्या १० चांगल्या कार्यकर्त्यांची नावे विचारली तर कोणालाही सांगता येत नाही. स्वातंत्र्याच्या ५० वर्षात अनेक कार्यकर्त्यांनी स्वतःला वाहून घेऊन कार्य केलेलं आहे, अशा कार्यकर्त्यांच्या संबंधीचे नाव सुद्धा आजच्या तरूण पिढीला माहीत नाही, ही शोकांतिका आहे. आज आम्ही फक्त मंत्रीपदावर असणाऱ्या माणसांची नावं सांगू शकतो, त्याच्यापलिकडे आम्हाला विधायक कार्य करणाऱ्या माणसांची नावे माहीत नाहीत. खरं म्हणजे याचीही आपण पुनर्मांडणी करण्याची जरूरी आहे, आणि अशा विधायक काम करणाऱ्यांचा आदर्श आपल्या पिढीपुढे ठेवण्याची फार आवश्यकता आहे. त्यामुळे अस्मितेचा काहीतरी भाग त्यातून आपल्याला मिळू शकेल, त्याचाही शोध घेण्याची जरूरी आहे.

मला वाटतं की गिरीश सोहनींनी उल्लेख केला की, आदिवासींची ही जी ललित कला आहे, तिच्यात देखील आदिवासीची अस्मिता आहे. आज तुम्ही 'जय हनुमान' टी.व्ही.वर बघता. पण ती आम्ही आमच्या बोहड्यामध्ये दाखवत होतो. तो बोहडा संपला आणि आता टी.व्ही.वरचा जय हनुमान बघू लागलो. तेव्हा आमच्या ललित कलेमधला जो चांगला भाग होता, तो आता नष्ट होऊ लागलेला आहे. संस्कृतीचा अभिमान बाळगणाऱ्या मंडळींनी याची नोंद घेण्याची आवश्यकता आहे. कारण संस्कृतीतली चांगली मूल्ये, चांगल्या गोष्टी हळूहळू नष्ट होऊ लागलेल्या आहेत. जर समाजाची वेगळी अस्मिता, समाजाचा वेगळा आरसा जर आपल्याला दाखवायचा असेल, समाजाला वेगळा मुखवटा आपल्याला द्यायचा असेल तर या सगळ्या मूल्यांची मांडणी करण्याची आवश्यकता आहे. या ललित कला समाजाच्या पुढे वेगळ्या पद्धतीने मांडण्याची आवश्यकता आहे. अस्मितेचा तो एक महत्त्वाचा भाग आहे, याची आपण नोंद घ्यावी.

दुसरा धागा म्हणजे आदिवासींच्या कार्यासाठी ज्या विधायक आदिवासी चळवळी झाल्या आणि विधायक कार्य ज्यांनी केलेलं आहे, अशा व्यक्तींनाही आपल्याला विसरता येणार नाही. काही वेळेला ही माणसं आदिवासी असतील किंवा बिगर आदिवासी असतील. काही वेळेला या माणसांनी आदिवासीला उभं करण्याचं काम केलं असेल. परंतु या विधायक कार्यामधून जी एक दिशा मिळते, ती आदिवासीला त्याच्या पुढच्या पिढीची अस्मिता जागी करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. त्याची कृती गटाने नोंद घ्यावी आणि चळवळी व विधायक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या कामामधून आपल्याला अस्मितेचा शोध घेता येतो का? आणि पुढच्या पिढीला अस्मितेचा वारसा देता येतो का? हेही आपण तपासून पाहावे.

खरं म्हणजे एक महत्त्वाचा मुद्दा चर्चेतून आला की अस्मिता ही आदर्शामधून मिळत असते. तर आदर्श हे शोधावे लागतात आणि आदर्शा शिवाय माणसाला अस्मिता खऱ्या अर्थाने प्राप्त होत नाही, असा आदर्श आदिवासी समाजापुढे कोणता आहे? जसा दलित समाजापुढे बाबासाहेबांचा आदर्श होता. आणि या आदर्शाला कुठेही, कसल्याही प्रकारचं प्रश्नचिन्ह उपस्थित होऊ शकलेलं नाही. आजही होऊ शकणार नाही आणि पुढच्या काळामध्येही ते होणार नाही, असं हे चिरकाल बाधित आदर्श आहे, ती त्या संपूर्ण समाजाची अस्मिता आहे, खऱ्या अर्थाने ती प्रेरणा आहे. मग आदिवासी समाजाला असा आदर्श, प्रेरणा शोधता येईल का? कदाचित बाबासाहेबांसारखा आदर्श आपल्याला मिळणार नाही. पण जी काही छोटी माणसं आहेत, त्यांच्या चांगल्या कृतीतला आदर्श आपल्याला शोधता येतो का, हे आपण पाहिलं पाहिजे. अशी कित्येक माणसं आहेत की त्या प्रत्येकाच्या कामामध्ये चांगलेपणा आहे. हा चांगलेपणा शोधणे आणि त्याची मांडणी / बांधणी आदर्शासाठी व अस्मितेसाठी करणे महत्त्वाचे आहे.

अस्मितेचा एक महत्त्वाचा धागा म्हणजे भाषा. या बोलीभाषा आहेत त्या अस्मितेचा फार मोठा भाग आहे. आणि मला असं वाटतं की, मी गोंडीतून बोललो तर गोंड लोक मला डोक्यावर उचलून घेतील. उद्या वारली, भिलोरी भाषेतून बोललो तर. म्हणजे भाषेला एवढं मोठे सामर्थ्य आहे, बळ आहे की त्यामुळे तो माणूस त्या समाजाचा पूर्णत्वाचा घटक बनतो आणि खऱ्या अर्थाने त्याची अस्मिता न बोलता वेगळ्या पातळीवर तयार होते. आज दिवसेंदिवस या भाषा मागे पडत चालल्या आहेत. भाषा शिकणं थांबलेलं आहे. नवीन येणारी पिढी आपली भाषा बोलत नाही, गाणं म्हणत नाही. तेव्हा आदिवासी समाजाने आपल्या भाषा न बोलणे म्हणजे आपली अस्मिता गमावण्यासारखं आहे. म्हणून अस्मितेच्या गप्पा मारणाऱ्या मंडळींनी आपली भाषा जिवंत कशी राहील आणि भाषेचा हा ठेवा, संस्कृतीचा गाभा आहे याचं भान ठेवून भाषेचं जतन झालं पाहिजे. तर अस्मिता टिकायला त्याचा फार मोठा उपयोग होईल.

खरं म्हणजे ज्याचा उल्लेख अनेक वक्त्यांनी आतापर्यंत केला की आमची संस्कृती टिकली पाहिजे, आमची चांगली मूल्ये टिकली पाहिजेत. अर्थात गेल्या ५० वर्षात मला वाटतं मी ही अशाप्रकारची विधाने ऐकत आलेलो आहे की संस्कृती, मूल्ये टिकली पाहिजेत, त्याबद्दल कोणाचं दुमत नाही. प्रत्येकालाच वाटतं की चांगलं ते टिकलं पाहिजे. पण चांगलं कोणतं आहे याचा पाठ, याची पुष्टी मात्र कोणीही गिरवलेली नाही. इथे बसलेले अनेक धुरंधर, विचारवंत कार्यकर्ते आहेत; पण त्यांनी असा आम्हाला आरसा दाखवला का? की भिल्ल समाजातल्या या गोष्टी चांगल्या आहेत त्या टिकल्या पाहिजेत. गोंड समाजातल्या या चांगल्या गोष्टी टिकल्या पाहिजेत, याचा पाठपुरावा तुम्ही केला पाहिजे. एकूण महाराष्ट्रातल्या आदिवासी समाजातल्या या गोष्टी चांगल्या आहेत, याचा पाठपुरावा करून संस्कृतीजतनासाठी आणि आदिवासींची अस्मिता वाढविण्यासाठी या गोष्टींची आवश्यकता आहे हे कोणीही सांगत नाही. केवळ आदिवासी संस्कृती, मूल्ये चांगली आहेत असं म्हणून ती टिकणार नाही. आणि असं आणखी ५० वर्षे बोलत राहिलो तर जी मूल्ये नष्ट व्हायचीत ती होत राहणार आहेत. म्हणून समाजातल्या विद्वानांचं हे काम आहे की, त्यांनी आदिवासींच्या चांगल्या मूल्यांचा शोध घेतला पाहिजे. जोपर्यंत शोध घेत नाही व शोध घेऊन त्यातले योग्य / अयोग्य असं ठरवतं नाही तोपर्यंत अस्मितेचं टिकणं अवघड आहे.

कारण संस्कृती हा प्रवाह आहे, तो बदलत आहे. सातत्याने संस्कृती बदलत राहते. आज चांगली वाटणारी मूल्ये १० वर्षांनी बदललेली असतील किंवा ती बाजूला ठेवून आणखीन वेगळी मूल्ये स्वीकारावी लागतील. परंतु आज तिचा शोध घेणं सुरू केलं पाहिजे. केवळ बोलणं उपयोगाचं नाही. अनेक गोष्टींचा उल्लेख इथे केला की सामुदायिकता. आम्ही शिकार केली की सगळ्यांमध्ये वाटून खातो. एखाद्या अडलेल्या माणसाला मदत करतो. आता पुन्हा एकदा आपल्या सगळ्यांचं आत्मनिरीक्षण करण्याची गरज आहे.

आदिवासी खेड्यात तुम्ही गेल्यानंतर एखादा गरीब आदिवासी अडला-नडला असेल तर त्या गावातले लोक किती त्याला मदत करतात, हे आपण त्या गावात जाऊन तपासण्याची आवश्यकता आहे. कारण बोलणं हे लालित्यपूर्ण असतं. लोकांना आकर्षित करतं. पण प्रत्यक्षात वस्तुस्थिती काय आहे याचा शोध घेण्याची आवश्यकता आहे. आता जी आर्थिक मूल्ये येत आहेत की, जी सांगताहेत पूर्वी एका माणसाच्या शेतातले काम अडले असेल तर सगळे मिळून जाऊन त्याच्या शेतातलं काम करत होते आणि फक्त तो त्यांना दुपारचं जेवण देत होता. आज मात्र ५० रूपये मजुरी दिल्याशिवाय

कोणी कोणाच्या शेतावर जात नाही अशी परिस्थिती आहे. कारण मूल्याधारित अर्थव्यवस्था आता आली आहे. तेव्हा आपलं जुनं खूप चांगलं होतं, पण आज अस्तित्त्वात आहे की नाही आणि अस्तित्त्वात असलं तर ते किती प्रमाणात लागू आहे, किती प्रमाणात लोक ते वापरताहेत याचाही बारकाईने अभ्यास करण्याची गरज आहे. केवळ चांगलं म्हणून त्याचा सतत ऊहापोह करणे एवढ्यापुरतं ते मर्यादीत असता कामा नये. त्याकडे विचारपूर्वक, बारकाईने पुन्हा पुन्हा पाहण्याची गरज आहे. तेव्हा संस्कृतीच्या दृष्टीने सर्वांनी हा मुद्दा लक्षात ठेवावा.

आणखी एक महत्त्वाचा मुद्दा, तो म्हणजे आदिवासीची अस्मिता ही आर्थिकदृष्ट्या सबळ होणे याच्यामध्ये देखील आहे, हे आपण विसरता कामा नये. आदिवासी आर्थिकदृष्ट्या सबळ झाला नाही, तर त्याच्या अस्मितेला कोठूनही धोका पोहोचू शकतो. म्हणून तो आर्थिकदृष्ट्या सबळ होणे काळाची गरज आहे.

■■

## 'भुजंग मेश्राम' यांच्या काही अनुवादित कविता

## केंद्र

आमच्या वेळांच्या मध्ये
झाल्यात कित्येक लढाया
किती प्रकारची आक्रमणे
मित्र आणि भाऊ झाले शेत
या आधी कळायला हवं होतं
कुणी मारलं त्यांना?

दूर गेली होती रानावर पोरं
हातांना युद्धघोषणा
अनोळखी शत्रूविरुद्ध
आम्ही गायले होती गाणी
आमच्या पोरांखातर
जगतांना तिन्हीकाळात
गनीमांच्या छुप्या हल्ल्यादरम्यान
पण शराराने व्यक्त होणाऱ्या पीडेने
उपजत नृत्यांमध्ये केली वार्ता
ब्रम्हांडाच्या पोकळीसोबते
तारे, गरुड आणि लांडगे श्वापदांनी
गाईली गाणी
वेळ तुमच्या सोबत आहे
इतिहास आहे तुमच्या पाठी, झाडांनी
दिले बियाणें
आणि पर्वतांनी दिली स्वप्ने

— जिमी डरहम (१९४०)

# आदिवासी साहित्य आणि कला

या सत्राचे अध्यक्षस्थान आदिवासी साहित्याचे अभ्यासक, कवी तसेच आदिवासी साहित्य संमेलनाचे मुख्य प्रवर्तक डॉ. विनायक तुमराम यांनी स्वीकारले होते, तर प्रसिद्ध आदिवासी कार्यकर्ते व कवी सर्वश्री वाहरू सोनावणे, भुजंग मेश्राम, कृष्णकुमार चांदेकर, पितांबर कोडापे, श्रीमती उषाकिरण आत्राम व आदिवासी साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. गोविंद गारे यांनी आदिवासी साहित्य व कला या विषयावर आपल्या विचारांची मांडणी केली.

## पितांबर कोडापे

साहित्य चळवळीची सुरूवात १० व ११ नोव्हेंबर १९७९ रोजी भद्रावतीच्या पहिल्या साहित्य संमेलनापासून झाली. आणि १९९७ च्या साहित्य संमेलनापैकी सहा संमेलने यशस्वीरित्या पार पडलेली आहेत. ह्या आदिवासी साहित्याचा उगम आणि निर्मिती यावर थोडासा प्रकाश टाकतो. तथाकथित मराठी साहित्य, दलित साहित्य, आंबेडकर साहित्य, मार्क्सवादी साहित्य आणि गांधी वादी साहित्य अशा अनेक साहित्यातून डोंगर पहाडात आणि कडेकपारीमध्ये लाखो वर्षांपासून राहणाऱ्या आदिवासींचे व्यथा वेदना दुर्दैवाने शब्दबध्द आल्या नव्हत्या आणि यातूनच स्वतंत्र प्रेरणेने स्वानुभवातून आणि स्वतंत्र बाण्याची वाङ:मय चळवळ मराठीमध्ये आदिवासी साहित्य म्हणून उदयास आली.

तत्पूर्वी आदिवासींच्या जीवनांवर काही अपवादात्मक मोजक्या मान्यवरांनी लेखन केलेलं असेल; परंतु एक स्वतंत्र आदिवासी साहित्य म्हणून त्या लेखनाला मान्यता मिळावी, असं म्हणू शकत नाही. अलीकडे आदिवासी साहित्यावर आंबेडकरी किंवा दलित साहित्याची भ्रष्ट अंधानुकरण किंवा तोच तो पणा अनुकरण आरोप होतो आहे, तो मला मान्य नाही. कारण अर्वाचीन मराठी वाङ:मयाच्या इतिहासाच्या समीक्षेनुसार मी बोलतो की, १९३०-३५ नंतर गांधीवादी साहित्य मराठीमध्ये सुरू झाले. १९३५ मध्ये मार्क्सवादी साहित्य आलं आणि स्वातंत्रोत्तर काळामध्ये १९६० च्या पुढे खऱ्या अर्थाने दलित साहित्य उदयास आले. आता दलित साहित्याचा एक प्रवाह किंवा दलित साहित्यातील त्याची नक्कल आदिवासी साहित्य करतो आहे किंवा लेखक कवी करताहेत. हा जो आरोप आहे हा सबळ पुराव्यानिशी सिद्ध होऊ शकत नाही. कारण असं की, या पृथ्वीवरील माणूस, ज्याची निर्मिती सर्वात प्रथम झाली, त्याला आपण मूळ निवासी म्हणतो.

असे आदिवासी आणि आदिवासी साहित्य हे आदिवासी माणसाच्या उदयाच्या, निर्मीतीसोबतच उदयास आले, असं मला वाटतं. कारण आदिवासी साहित्याचं आणि कलेचं हे जे दालन आहे, ते इतके समृद्ध आणि वैभवशाली आहे की ज्याची तुलना आपण कुठेही करू शकत नाही. ज्याला कुठेही आपण सामावू शकत नाही. त्याला वास्तुसंग्रहालयात किंवा कलादालनात मांडू शकत नाही, इतकी व्यापक आहे. दुर्दैव असं की आमच्याकडे लिपी उपलब्ध नसल्यामुळे फक्त हे सगळं साहित्य आणि कला संस्कृती ही मौखिक स्वरूपात होती, लेखीस्वरूपात नव्हती. त्यामुळे आम्हाला लेखी पुरावा देता आला नाही. ग्रंथ लिहून ठेवता आले नाही आणि त्यामुळे

आपल्यावर अशा प्रकारचे आरोप होत आहेत. परंतु हा जर मुद्दा आपण लक्षात घेतला तर मानवाच्या निर्मिती सोबतच आदिवासी साहित्य आणि कला यांची निर्मिती झाली असं मला वाटतं. दुसरा मुद्दा असा अलीकडे आदिवासी साहित्य आणि आदिवासी साहित्य परिषद हे सर्व असताना बहुतेक पश्चिम महाराष्ट्रात नसेल; परंतु विदर्भामध्ये अलिकडे चंद्रपूरला गोंडी साहित्य संमेलन झालं. मला सांगा आदिवासींमध्ये ४७ जमाती आहेत आणि ४७ जमाती असताना जमातीतला प्रत्येक माणूस जर आपआपल्या जमातीचं साहित्य संमेलन भरवायला लागला, तर ही आदिवासी साहित्य-चळवळ टिकणार आहे का? त्यापेक्षा भारतीय राज्यघटनेनुसार जे ७, ७.५ % आरक्षण आपल्याला मिळालं. उदा. ७ % शेर तांदूळात आपल्याला ४७ लोकांचं जेवण करायचं असेल तर कुणीही या एवढ्याशा जेवणावर संतुष्ट होणार नाही. कारण कुणाचंही पोट भरणार नाही..

आणि हे असं असताना असे आपण विखुरले गेलो क्षुल्लक कारणांमुळे, अशा प्रवाहांमुळे आपण विखुरले गेलो तर हे शक्य नाही. आणि म्हणून एक अशी सर्वस्पर्शी, सर्वव्यापी, ४७ ही जमातींना घेऊन चालणारी एक आदिवासी साहित्य चळवळ यशस्वीरित्या वाटचाल करायला पाहिजे, असं माझं स्पष्ट मत आहे. कलेच्या संदर्भात बोलायचं झाल्यास आता कलेचं जे विश्व आहे, ज्या काही अनेक कला आहेत, एकूण ६४ कला आहेत, त्यांपैकी जवळ जवळ ७५ % कला आहेत ज्यांच्या व्यवहारातून बोलण्यातून-चालण्यातून ही कला डोकावते अशी आदिवासी कला. अलिकडे या कलेची जी विकृती आपल्याला दिसते, ती विकृती इतकी भयानक आहे की आदिवासी माणसाचं जे वाङ:मय आहे, जो मौलिक ठेवा आहे, हे नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. शिकून सावरून काही मोजकेच तरूण समोर आले आणि कुठे त्यांच्या भाषेचा त्यांच्या बोलण्यात कुठे-कुठे थोडासा वेगळेपणा आला तर त्याला हिनवलं जाते. आपण दूरदर्शवरून पाहतो, सिनेमात पाहतो की कमी कपड्यात दिसणाऱ्या नट-नट्या आणि आमची आदिवासी माय-भामरागडच्या कुवा कोडीतल्या किंवा मेळघाटच्या कुठल्याही असो महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात त्या जर कमी कपड्यात वावरत असेल तर आपण तिच्याकडे लैंगिक अश्लिलतेच्या भावनेने पाहत असतो आणि ही भावना, ही स्थिती इतकी विदारक आहे की, त्यामुळे आदिवासी माणूस हा सावरू शकणार नाही. इतकी शिल्प,मूर्त्या, लेणी सर्व असताना मी पहिल्यांदा म्हणालो की, जगातल्या माणसाच्या निर्मितीसंबंधी हे सर्व निर्माण झालं असताना भारत सरकारच्या पुरातत्व विभागाने याकडे इतकं क्षम्य दुर्लक्ष केलं आहे. चंद्रपूरचा प्रसिद्ध असा गोंड राजाचा किल्ला की ज्याला पुरातत्व विभागाने (सरकारकडे कदाचित पैसा नसेल) त्यांनी त्या किल्ल्याला तुरूंग बनवून टाकला आहे. त्यात कैद्यांना, अपराध केलेल्या, गुन्हे केलेल्या गुन्हेगारांना त्या ठिकाणी डांबून ठेवले जाते.

हे जर असं असेल तर आदिवासी माणसाची कला, आदिवासी माणसाचे हे वैभव, हे लेणं संपू शकते आणि म्हणून याकडे लक्ष देणे किंवा अशा प्रकारच्या गोष्टी होऊ नयेत. आज आपल्याला भाषा बोलायला लाज वाटते. कुणी हसेल कुणी काय म्हणेल हे सर्व आपण विसरत चाललो आहे, सुधारणेच्या आणि विकासाच्या प्रवाहामध्ये आपण चाललो असताना आपली संस्कृती काय आहे, हे मागे वळून आपण पाहत नाही. आणि ह्या सुधारणेच्या आणि विकासाच्या प्रवाहामध्ये वाहात चाललो आहोत. त्यामुळे आपल्या या अमूल्य अशा गोष्टींकडे दुर्लक्ष करतो. गडचिरोली जिल्ह्यात कारबापा आणि तुलतुली असे दोन धरण प्रकल्प आहेत. विकासाच्या नावावर त्या ठिकाणी लोकांना विस्थापित

करण्याचा प्रयत्न चालला आहे. अनेक प्रकारच्या समित्या वगैरे झाल्या. हे जे दोन प्रकल्प आहेत ते केंद्रशासनाकडून वीस वर्षानंतर कन्झर्वेशन ॲक्ट (वनसंवर्धन कायदा) नुसार नामंजूर झाले. आणि चंद्रपूरचे खासदार यांनी त्यात लक्ष घालून खासदारांची समिती नेमली वगैरे झाले. एक अतिशय आदिवासी संस्कृतीचे प्रतिक गोटूल आणि त्यांमध्ये होणार रेलॉं नृत्य म्हणजे दिवसभर माणसाला अनेक प्रकारच्या कामांमुळे थकवा येतो, तो घालवण्यासाठी एक मनोरंजन म्हणून ही पद्धत आहे. आदिवासी युवक-युवती त्या गोटूलमध्ये नृत्य करतात. परंतु त्याकडे आपण अश्लिलतेने बघतो.

कारण अलिकडेच आमच्याकडे आदिवासी विकास विभागातर्फे पारंपरिक नृत्यस्पर्धा ठेवण्यात आली होती. त्या कार्यालयात काम करणारे सर्व कर्मचारी, अधिकारी दुर्भाग्याने आदिवासी होते. परंतु त्या स्पर्धांमध्ये बाहेरील लोक आदिवासींच्या समूहात दारू पिऊन त्यांच्या सोबत नाचायला आले. त्यावेळेला त्या स्पर्धेत संयोजकांपैकी आक्षेप घेतला नाही किंवा त्यांना बाहेर काढण्याचं काम केलं नाही. जेव्हा आम्ही त्याठिकाणी बोललो तेव्हा हस्तक्षेप केला म्हणून पोलिस कार्यवाईपर्यंत ते लोक आले. म्हणजे तुम्ही त्या समाजातील माणसं आहात. तुम्ही ते डोळ्यांनी पाहता आणि उलट एखादा माणूस त्या विरोधात जर बोलत असेल तर तुम्ही त्याला अशी कायदेशीर कारवाई करण्याची धमकी दिली, तर आदिवासी साहित्य, कला व संस्कृती कुठे जाईल? याचा विचारवंतांनी गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. धन्यवाद ! ■

## कृष्णकुमार चांदेकर

माझ्या माहितीप्रमाणे सामाजिक, साहित्यिक व धार्मिक या अंगांनी जे काही लेखन आहे त्याला मी साहित्य असे मानतो. विशेषतः आदिवासी साहित्यिक जे आहेत. आता इथे एक वाद होतो की, आदिवासी साहित्यिक कोणाला म्हणायचं? आदिवासींच्या संबंधात लिहिणारे त्यांना आदिवासी साहित्यिक म्हणायचं की जे जातीनं आदिवासी साहित्यिक आहेत त्यांना आदिवासी साहित्यिक म्हणायचं? हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. याठिकाणी जे उपस्थित झाले आहेत, त्यात गोविंद गारे, भुजंग मेश्राम, वाहरू सोनावणे वगैरे हे जातीनं आदिवासी आहेत, जे संस्कृतीने, शासनाने ठरविलेल्या जातीत बसतात, अनुसूचित जमातीत वगैरे म्हणून ते आदिवासी आहेच. याचा अर्थ त्यांना आदिवासी साहित्यिक म्हणायचं का? हा एक प्रश्न याठिकाणी आला. मित्रहो आदिवासींच्या साहित्याच्या अंगाने पुन्हा विविध स्तरातले लोकं सुद्धा लिहित आहेत. अर्थात ते गैरआदिवासी आहेत, यांना आदिवासी साहित्यिक म्हणायचं की नाही हा आमच्या आदिवासी साहित्यिकांच्या, जातीनं आदिवासी असलेल्या साहित्यिकांच्या समोरचा प्रश्न आहे. आदिवासी साहित्य प्रवाहात आता वेगवेगळे साहित्य प्रवाह निर्माण झाले आहेत.

आदिवासी साहित्याला ज्या प्रेरणा मिळालेल्या आहेत त्यावरून त्याचे वेगवेगळे गट-तट पडले आहेत. आदिवासी साहित्य संबंधात तीन चार गट पडतात, असं माझं वैयक्तिक मत आहे. निसर्गाच्या संबंधाने काही निसर्गप्रेमी ललित लेखन करतो वगैरे अशातला एक गट पडतो. ज्यांना काही असा बदल झाला पाहिजे, पुरोगामी विचाराने बदल झाला पाहिजे अशा काही संकल्पना आहेत. त्या संकल्पनेच्या संबंधाने लिहिणारे जे लेखन करणारे लोक आहेत त्यांना आपण आंबेडकरी कवी किंवा साहित्यिक असं म्हणत असतो. काही असं आहे की स्वातंत्र्याची चळवळ म्हणून स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी काही चळवळी राबवण्यात आल्या. त्यात सत्यशोधक चळवळ, यात महात्मा फुले यांचा उल्लेख करता येईल. त्याचवेळी रशियामध्ये मार्क्सवाद्यांची चळवळ / जमात

फोफावली होती. त्या मार्क्सवाद्यांचे विचार सर्व जगात लागू पडत होते. याचं लोन आदिवासींपर्यंत देखील पोचलं होतं. याबाबतीत नेताजी राजगडकर, वाहरू सोनावणे यांची नावे घेता येतील. तर याप्रमाणे निसर्गवादी, आंबेडकरवादी, मार्क्सवादी असे साहित्यिकांचे गट पडले. परंतु माझ्या माहितीप्रमाणे आदिवासींचं जर उत्थान करायचं असेल तर या तिघांनी सांस्कृतिक लढा उभारला गेला पाहिजे, या मताचा मी आहे. काही थोडीफार मंडळी या अंगाने लिहित आहेत. पण हे का महत्त्वाचं आहे, तर याची पर्वा न करता या आदिवासी हे मूळचे कोण? आर्य-अनार्य हा वादाचा मुद्दा याठिकाणी उपस्थित होऊ शकतो.

आपण जर आदिवासी असू तर आपले आदर्श कोण, राजे कोण, आपले शत्रू कोण, आपले मित्र कोण याचा अभ्यास आपण केला पाहिजे. मी याठिकाणी फक्त प्रश्न निर्माण केला आहे, उत्तर आता हे मान्यवर मंडळी शोधणार आहेत. कलेच्या संदर्भात मी असं म्हणेन की कला ही गाणं असेल, संस्कृती, लग्न पद्धती असेल. एखादी कला ही पूर्ण आदिवासींना लागू पडत नाही, असं माझं स्पष्ट मत आहे. तस काही ना काही साम्य जसं भाषेत साम्य नाही, तसं कलेतही नाही. भाषेप्रमाणे तीही काही अंतरावर बदलत असते असं माझं स्पष्ट मत आहे. ■

## उषाकिरण आत्राम

आज याठिकाणी कला आणि साहित्य या विषयांवर परिसंवादाचा सुरूवात करून काही लोकांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. मला सुद्धा संधी दिली आहे आणि यावर मी माझ्या परिने या विषयावर विचार मांडते. आदिवासी साहित्य व कला, साहित्य म्हटलं की कुठलेही स्तरावरचे असो, भाषेत असो, कुठल्याही संस्कृतीचे असो, त्या त्या साहित्यात त्या त्या समाजाच्या लोकजीवनाचे प्रतिबिंब आणि आत्मा हा दडलेला असतो. साहित्य हे लोकजीवनाच्या आत्म्याचे प्रतिबिंब असते आणि लोक जीवनाच्या जगण्याची व वागण्याची जी पद्धती असते, त्यामधून निर्माण झालेला झरा किंवा प्रवाह, हे साहित्य. म्हणूनच साहित्य हा समाजाचं दर्पण किंवा प्रतिबिंब असं म्हटले जाते. आता आदिवासी साहित्य या विषयावर मला बोलायचं आहे. आदिवासी साहित्य म्हटलं की या साहित्याचे सुद्धा दोन प्रवाह आहेत. जर आपण विचार केला तर, अलिकडच्या या पंधरा वीस वर्षात लिहिणारे साहित्यिक हा एक नवा प्रवाह.

परंतु या आधीच जे आदिवासी साहित्य आपण म्हणतो, त्या साहित्याचा जर आपण आपण विचार केला तर ते साहित्य लिखित स्वरूपात जरी नसलं तरी एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत, एका ह्रदयातून दुसऱ्या ह्रदयापर्यंत जाणारा प्रवाह, एका ओठातून निघालेलं गीत दुसऱ्या ओठापर्यंत पोहोचविण्याचं जे मौखिक साहित्यानं काम केलेलं आहे असं मौखिक साहित्य आदिवासी साहित्य म्हणून आहे. ते खरोखरच अतिशय सौंदर्यपूर्ण, उच्च दर्जाचे आणि स्वयंनिर्मित असं आहे. कारण हे जे साहित्य आहे, आदिवासी साहित्य, त्यामध्ये आपण बघतो की विविध प्रकारची गीतं आहेत किंवा विविध प्रकारच्या घटनांनुसार जी जी निर्मिती झाली असेल आणि त्या आदिवासी समाजाने एका पिढीपासून ते दुसऱ्या पिढीपर्यंत ते जतन करून ठेवले आहे, असा जो मौलिक खजाना आहे, अलिखित स्वरूपाचा, हा खजाना निर्माण करताना या पृथ्वीवर जेव्हा पहिला माणूस आदिवासी म्हणून जन्माला आला असेल त्या वेळेपासून झालेलं हे साहित्य आहे. आमच्या बोली भाषेत, जसं गोंडी भाषेत अनेक गीतांतून असं पाहायला मिळतं की 'पहिलन पाटा बोनर लायो। पहिलन पाटा लिंगो लायो।' या गीताचा अर्थ असा होतो की सर्वप्रथम

या पृथ्वीवर जर गीत कोणी म्हटलं असेल तर ते लिंगोनी म्हटलं आणि गीताची व साहित्याची निर्मिती जर कोणी केली असेल तर ती लिंगोनी. असं लोकगीतात ऐकायला मिळते आणि आदिवासी समजामध्ये जो लिंगो नावाचा समाजामधला 'अग्र पुरूष' ज्याला म्हणता येईल, त्या अग्र पुरूषाने शब्द निर्मिती, संगीत निर्मिती, वाद्य निर्मिती आणि विविध प्रकारच्या ६४ कला त्याला एकाच वेळेस येत होत्या असं गीतामध्ये आपल्याला ऐकायला मिळतं. काही कथांतून सुद्धा वाचायला मिळते आणि या लिंगोबाबत जेव्हा तो स्वतः गीत तयार करायचा आणि स्वतःच म्हणायचा त्या वेळेस तो ६४ वाद्ये वाजवायचा आणि सोबतच त्याच्या समुहातील लोकांना म्हणायला लावायचा.

यामध्ये जरी आपल्याला अतिषोयोक्ती वाटत असली, तरी एकाच वेळेस तो याचा अर्थ असा की तो हातात, पायात, कंबरेत, गळ्यात विविध प्रकारचे वाद्य बांधायचा आणि त्यामधून निघणारा प्रत्येकाचा अलग सूर, ताल, राग आणि त्यानुसार जी गीत निर्मिती व्हायची, ती गीत निर्मिती किंवा साहित्य निर्मिती म्हणता येईल. ती साहित्य निर्मिती पूर्णतः निसर्गावर आधारीत आहे. जसं की पाऊस, वारा, ढग, विजांचा आवाज, पशुपक्षांचा आवाज, झाडांची सळसळ आहे, या विविध प्रकारच्या निसर्गातून जेवढ्या प्रकारचे हुंकार आणि आवाज, प्रतिध्वनी त्याच्या कानावर पडले त्यानुसार त्याने शब्द निर्मिती केली आणि त्या शब्द निर्मितीतून गीत तयार केले किंवा भाषा निर्मिती केली, असं गीतामधून ऐकायला मिळते आणि त्यानुसारच काही विविध प्रकारचं मौखिक साहित्य आहे, अलिखित स्वरूपाचं. त्या गीतांमधून वाचल्यावर आपणास असं लक्षात येईल की, गीतामध्ये निसर्गामधले पूर्णतः वर्णन आहे. पान, फुले, झाडे, पशू, पक्षी त्यांचा आवाज, वीज, अग्नी आहे जेवढे काही तो स्वतः स्थान मानतो त्या प्रत्येकापासून आलेला आवाज व हुंकार ध्वनी, प्रतिध्वनी हे बहुतेक आदिवासी लोकगीतात आपल्याला पाहायला मिळेल, वाचायला मिळेल. याप्रमाणे हे मौलिक स्वरूपाच्या अलिखित साहित्यामध्ये विविधता आणि सौंदर्य पाहायला मिळते. जसं लग्नाच्यावेळी वेगळ्या प्रकारचे गीत गायले की त्याचे सौंदर्य वेगळे आहे. कोणाचा मृत्यू झाला असेल तर त्यावेळी शोकगीत गायलं जाईल. एखादा आनंदाचा समारोह असेल त्यावेळची वेगळ्या प्रकारची गीते आहेत. त्याचप्रमाणे झाडाला पान येणे, फूल येणे, पाऊस येणे, शेतात पिक पिकवणे, नवीन पिक निघणे, नवीन भोजन करणे अशा विविधप्रकारे प्रसंगामध्ये म्हणजे जन्मापासून मृत्यूपर्यंत आदिवासी समाजात आनंदोत्सव साजरे होत असतात.

अशी एक म्हण आहे की आदिवासीला एक वेळचं जेवण मिळालं नाही तरी चालेल; पण त्याला नाचायला आणि गायला आवडते. सांगायचं तात्पर्य असं की या साहित्यामध्ये अशी एवढी शक्ती आहे. विविध प्रकारे, विविध प्रसंगी जी जी गीतं आणि साहित्य आहे, त्याचप्रकारे त्याला जोड देणारे संगीत व वाद्य प्रकार सुद्धा आहेत. तुम्ही पाहिलं असेल की प्रत्येक प्रसंगी वापरणारं जे संगीत आहे, वाद्यं आहे ते सुद्धा अलग आहे. आनंद असेल तर ढोल वाजणार, दुःखाचा प्रसंग असेल तर दुसऱ्या प्रकारचा छोटा ढोल वाजवणार. एखादे तरूण गीत गात असेल तर दुसरी सनई वाजवणार. याप्रकारची विविध प्रसंगानुरूप वाद्ये अलग आहेत. त्याचे सूर, बोल सुद्धा अलग आहे. म्हणजे नाचायचे प्रकार सुद्धा विविध आहेत. त्यात जर आपण साहित्याच्या नात्याने कलेच्या नात्याने जर विचार केला तर त्यात विविधता आहे आणि ती अप्रतिम आहे आणि सौंदर्यपूर्ण अशी आहे. याप्रकारे हे झालं साहित्याबाबत. त्याचप्रमाणे जी कला आहे, कलेबाबत सुद्धा आदिवासी समाजामध्ये धातूकला, शिल्पकला, पाषाणकला, नृत्यकला, संगीतकला, रंगकला, चित्रकला,

गोंदनकला या प्रकारच्या विविध कला तुम्हाला पहायला मिळतील, ज्या त्यांनी निसर्गातून घेतल्या आहे. जुन्या काळातील मोहेंजोदडो, हडप्पा किंवा इतर किल्ले, गडात तुम्हाला शिल्पकला पहायला मिळेल. अजूनही दगडावर शिलालेख आहे. तर तो एक कलेचा नमुना आहे. त्यांनी जे शिल्प केले ते पाषाणशिल्प अजूनही अप्रतिम स्वरूपाचे आहे. त्याचप्रमाणे किल्ले, गड त्यावर विविध प्रकारचे त्यांच्या समुहाचे दर्शन घडविणारे प्रातिनिधिक जे निसर्गात आहे तेच त्यांनी त्याठिकाणी कोरले आहे. आणि अप्रतिम स्वरूपाचे हे पाषाण शिल्प कलेच नमुना जर तुम्हाला पहायचा असेल तर पूर्ण गोंडवनामध्ये भारतात तुम्ही कुठेही बघा आणि अजूनही आपल्या चंद्रपूर जिल्ह्यात किंवा बस्तरमध्ये तुम्ही जाल तर तुम्हाला पहायला मिळेल.

आणि अशा या उत्तम शिल्पाची, शिल्पकलेच्या नमुन्याची इतर लोकांकडून चोरी होत आहे आणि भारत सरकार त्याला अजूनही संरक्षण करत नाही. तो आमचा एक दस्तऐवज आहे, एक ऐतिहासिक म्हणून त्याचं संरक्षण व्हावं असं मी माझं मत व्यक्त करते. त्यानंतर आहे संगीत. हे संगीत सुद्धा त्यांनी कोणाकडून उसनवार घेतलेलं नाही. त्यांनी स्वतः तयार केलेलं संगीत आहे. त्यांचं संगीत पाहून अलिकडचे त्याचं अनुकरण करणारे, नूतनीकरण करून वेगवेगळ्या प्रकारचे संगीत सादर होत आहे. खरेतर आदिवासी संगीतापासून किंवा साहित्यापासून ते चोरलं गेलेलं आहे, असे माझं स्पष्ट मत आहे. त्यानंतर भिंतीचित्र, चित्रकला, गोंदनकला आहे. गोंदनकला ही त्या काळातल्या आदिवासी जीवन व कला आणि रसिकता. कारण आदिवासी माणूस हा रसिकतेपोटी जे काही पानं, फुलं, निसर्गाचा ठेवा आहे तो निसर्ग जेव्हा आमच्या सारख्या स्त्रियांनी आपल्या शरीरावर गोंदवून घेतला वेगवेगळ्या प्रकारच्या झाडांपासून पासून काढलेला रस आणि त्याच प्रकारचे पान, फूल, पक्षी, झाड, नाग प्राणी हे सगळ्या प्रकारच्या शरीरावर गोंदून काढणं ही एक कलाच आहे. भित्ती चित्रकला आहे. सारवणामधून, मातीतून त्यानंतर मातीची भांडी आहेत. मोहेंजोदडो, हडप्पामध्ये सुद्धा मातीचं मूर्तीकाम पाहायला मिळेल. त्यानंतर धातू कला आहे. विविध प्रकारची शस्त्रं आहेत. काष्ठकला आहे. हे सर्व आदिवासीने निसर्गातून मिळविलेले आहे. त्याचं अलिकडे काही लोक आदिवासीला पैशाचं आमिष दाखवून शिकून घेत आहेत. आणि त्याचा उपयोग ते बाहेरच्या देशात मॉडेल्स म्हणून करू लागेलत. बाजारपेठेत आदिवासींकडून कमी भावाने घेऊन परदेशात हजारो रूपयांना विकले जाते.

आदिवासी समाजामधले साहित्य अलिखित व अलिकडचं लिखित स्वरूपाचं साहित्य हे देखील लिहिणारे भुजंग मेश्राम, व्यंकटेश आत्राम आहेत, किंवा मोतीराम कंगाली, वाहरू सोनावणे किंवा आम्ही मंडळी आहोत, जी अलिकडे लिहायला लागली, तर हे साहित्य सुद्धा पुन्हा कुणावर उसनवारी किंवा कुणाचा वारसा मिळालेला नाही. ही आमच्या स्वतःच्या वेदनेतून जो आमचा हुंकार आहे तो आम्ही लिहिलेला आहे. आमच्या साहित्यावर कोणाचा प्रभावही नाही किंवा आंबेडकरी साहित्याचा दबावही नाही. लहानपणापासून आम्ही फुले-आंबेडकरी विचारांमध्ये वाढलो, त्यामुळे त्यांच्या पासून प्रेरणा निश्चित मिळालेली आहे. एखादा विचार आदर्श मानणे काही गुन्हा नाही. समाजाच्या कल्याणासाठी जर ते विचार अनुकरणीय असतील तर ते अनुकरण गुन्हा नाही. मग ते हिंदू संस्कृतीतले असोत, बौद्ध संस्कृतीतले असोत किंवा इतर कुठलीही असो. त्यांच्यातले विचार, गुण आपण घ्यायलाच पाहिजे. आणि त्याचा उपयोग समाजासाठी होत असेल तर का नाही करायचा? काळाजी गरज लक्षात घेऊन आपल्या समाजासाठी सर्व मतभेद बाजूला ठेवून एकत्र यायला पाहिजे. एकाच समाजाची आपण लेकरं आहोत. तेव्हा आपापसात

काही मतभेद असतील तर बुद्धीवादी माणसांनी तरी असे विचार ठेवू नयेत, असं माझं प्रांजळ मत आहे. आजच्या प्रसंगी मी माझे विचार इथेच थांबविते.

■

## वाहरू सोनावणे

आदिवासी साहित्य म्हणजे मौखिक साहित्य, लिखित साहित्य आणि लिपीबद्ध साहित्य, जे लिहिले गेले आहेत. आमच्या नाटकातील गीतांमधून आम्हाला दिसतं की, आदिवासींमध्ये बहुपत्नीत्वाची जी चाल आहे की, एकेक जण दोन, तीन ते अकरा बायका करतो. ही चाल समाज जीवनाला घातक आहे. एक भिल्ली गीत याचा अर्थ, 'दोन बायका तुला झेपणार नाहीत' अशा प्रकारचा संघर्ष, विरोध त्या गीतांमधून दाखविला जातो.

म्हणजे आदिवासी जीवन आत्मसात करत, जगत कसे पुढे गेले पाहिजे याची दिशा त्या गीतांमधून सापडते. किंवा पहिल्या गीतामधून असे सांगितले आहे की स्त्रियांनी मदत केली पाहिजे किंवा माणसानं माणसाला मदत केली पाहिजे. तसेच भुकेच्या अन् दुःखाच्या संदर्भात एक गीत आहे (गीत म्हटले जाते). याचा अर्थ असा की, 'सातपुड्याच्या पांगडाला (डोंगराला) आग लागली आहे, हे सारं दुनिया बघते. पण माझ्या पोटात जी आग लागली आहे, त्याला कुणीही बघत नाही.' अशा तऱ्हेची अनेक गीतं आहेत. त्यात जीवनाचे मोठे तत्त्वज्ञान, दर्जा आहे; पण कुणीही त्या गाभाऱ्यात गेलेलं नाही त्याला फक्त हिणवलं आहे. त्याच्या (आदिवासीच्या) पोशाखावरून, त्याच्या भाषेवरून, त्याच्या छोट्याशा घरावरून तो कशाप्रकारे जीवन जगतो, कसं आत्मसात करतो ते जीवन त्यामधून आपण हेरलं पाहिजे. नुसतं त्याला हिणवणं, त्याच्या जीवन व्यवहाराला हिणवणं बरोबर नाही, तर त्याचं जीवनमूल्य पण आपण घेत पुढं गेलं पाहिजे. अशा तऱ्हेने नाटकाचे सुद्धा संदर्भ आहेत. शिकारीला जाणं, मध पाडणे या गोष्टी दाखवताना तो जीवन कसा जगतो आहे, ते जगताना त्याला कोणत्या अडचणी येत आहेत, त्याला तो कसं तोंड देतो, कसे काही संदर्भ किंवा त्यावेळच्या संकल्पनांमधून असे दाखवले जाते की आदिवासी असुरक्षित जीवनाकडून सुरक्षिततेकडे कसं जायचं, जीवनात येणाऱ्या बाधा, अडी-अडचणींना कसं तोंड द्यायचं व पुढे कसं जात राहायचं हे त्या नाटकांमधून व्यक्त केलं गेलेलं आहे.

कलांच्या संदर्भात सांगायचं झालं तर आम्ही लग्नाच्या वेळी भिंतींवर चित्र काढायचो. असंच ठाणे जिल्ह्यात कुणीतरी पेंटिंग पाहिलं आणि त्याचं जीवनात फार मोठं स्थान आहे वगैरे समजून सांगितलं व त्या चित्रकाराला घेऊन ते लोक परदेशात पॅरीसला गेले. त्याच्या सारखे गुणवान, कला-कौशल्याने संपन्न असलेले जे कलाकार आहे त्यांची गुणवत्ता, कला अशा ठिकाणी संपून जाते. असे अनेक कलाकार आहेत. अनेक साहित्यिक आहेत. अशा तऱ्हेने विचार करत असताना आपण लिपीबद्ध साहित्याकडे येतो. लिपीबद्ध साहित्याकडे येत असताना आपल्याला असं दिसतं की, प्रस्थापित साहित्यिकांनी जो पायंडा पाडलेला आहे त्याच्या धर्तीवर किंवा त्या दर्जावर आपण उतरत नाही. मला कविता कर म्हटल्यावर मी कशी करणार? मला असं वाटलं की ते शिकलेले लोक आहेत, मग ते पहिला शब्द अमूक, मग त्याच्या खाली त्याला सारखा दिसणारा दुसरा शब्द आला, म्हणजे यमकं जुळवली की झाली कविता, अशी कल्पना होती. पण काहींनी सांगितलं की नाही रे, तसं काही नाही. जीवनाचा गाभा थोड्या शब्दामध्ये जास्ती आशय मांडणाऱ्या ज्या ओळी असतात, त्याला कविता म्हणणार. अशा तऱ्हेने सांगितल्यानंतर मी मुंबईला आजारी असाताना तशा प्रकारच्या ६ कविता भिल्लोरी भाषेमध्ये लिहिल्या. पण अरे बापरे, माझ्या त्या कवितांचं

फारच कौतुक झालं. या कविता आहेत, हेच नवलाईचं वाटायला लागलं. त्यावेळेस ते सत्यकथा, दिवाळी अंक अशा दर्जेदार साहित्यात, प्रस्थापितांच्या साहित्यात ते छापलं गेलं. संपादकीयमध्ये त्याची नोंद घेतली गेली. मग मी मराठीत सुद्धा काही लिहिलं. आसाच एक दिवस मी काळुराम दोधडे काकांकडे एस. टी. तून जात असताना मला सुचलं ——

"हिवराळ जंगलात गळून पडलेल्या सागाच्या पानासारख्या फाटक्या त्या दिवसा, जंगलातील जंगली माणसं कंदमुळं खाणारी, पण कंद नाहीत, मुळं नाहीत, ती केव्हाच संपून गेली अफाट भुकेच्या सपाट पोटात" अशा तऱ्हेने मी जे सुचेल ते लिहित गेलो आणि त्या लोकांना ते आणखीन आवडत गेलं. कौतुक वाटलं आणि अशा रीतीने कविता करण्याचा मला छंदच लागला. मला सांगितलं गेलं की अमूक ह्यांची पुस्तकं वाच, कविता वाच. मी नारायण सुर्वे, दया पवार यांच्या कविता वाचल्या. त्यामुळे साधारण अंदाज आला की कविता काय असते. आणि त्यामुळे एक दिशा मिळते. आधी मी दोन कथा लिहिल्या होत्या. त्याही प्रकाशित झाल्या आहेत. पण नंतर मी कविताच करायला लागलो. माझा कथासंग्रह सुद्धा प्रसिध्द झाला.

अशा तऱ्हेने माझी ही वाटचाल झाली. पण मला वाटायचं कशासाठी कविता करायच्या? चळवळीला याचा काय फायदा? पण जेव्हा माझा गोधड नावाचा कवितासंग्रह प्रसिध्द झाला तेव्हा मला अनेक पत्रं आली. त्यातून असे समजले की अशा प्रकारचे साहित्य आपल्या समाजावर एक ठसा उमटवून जातं. आणि मग मलाही पटलं की चळवळीसाठी या साहित्याचा उपयोग होऊ शकतो. आता इथे विषय निघाला तो निरनिराळ्या वादांचा, की मार्क्सवादी, आंबेडकरवादी, गांधीवादी साहित्य. याबाबतीत मी एक सांगतो की माझा कवितासंग्रह प्रकाशित झाला तेव्हा मला सगळ्यांचीच पत्रं आली. त्यात काही संघवाले, भाजपवाले सुद्धा होते. काहीजण तर भेटायला सुद्धा आले होते. का आले ते काही मला माहीत नाही. पण एक आपण लक्षात ठेवावं की, जीवनाची दिशा निश्चित करत असताना, जगण्याचं ध्येय ठरवत असताना आपण ज्यांच्या प्रेरणेने आपल्याला योग्य मिळत असेल, त्यांची प्रेरणा आपण स्वीकारलीच पाहिजे. मग ते मार्क्स असो की डॉ. बाबासाहेब आंबेडकर असो.

डॉ. आंबेडकरांचे नाव घेतले जाते उच्च-नीचतेच्या विरोधामध्ये, ते आम्हाला प्रेरणादायी वाटले, जर मार्क्ससारख्या कोणी शेतमजुरांच्या प्रश्नांवर काम केले तर असे वेगवेगळे मार्क्सवादी, फुलेवादी, आंबेडकरवादी म्हणून शिक्के मारून घेतले तर तुमच्या या कृतीला कुंठीतपणा येईल. तसा प्रत्येकाच्या विचारांवर कोणाचातरी ठसा असतोच. कोणाचा तरी चष्मा त्याने चढवलेला असतोच. माणूस जगत असताना असे विचार, तत्त्व आत्मसात करून पुढे जात असतात, जीवन जगत असतात. साहित्य निर्मिती करत असताना ते साहित्य त्या समाजाला न्याय देणारे किती आहे यावरच त्याचं मूल्य ठरेल. असं म्हटलं जातं की आदिवासी प्रतिगामी लिहू शकतात. हो, हे खरं आहे. तसं लिहू शकतात, तसं लिहिलेलं सुद्धा आहे. पण आदिवासी जीवनाला न्याय देणारं साहित्याचं खऱ्या अर्थाने आदिवासी साहित्य म्हणता येईल. मग तो लिहिणारा कोणीही असो. आदिवासीने लिहिले असले तरी त्याच्या साहित्यात आदिवासी जीवनाची नाळ आहे का, त्यांचं जीवनमूल्य आहे का हे तपासून पाहिलं पाहिजे.

या सर्व चळवळीमध्ये एक महत्त्वाचं काम डॉ. तुमराम यांनी केलं आहे की त्यांनी वणी भद्रावतीला आदिवासी साहित्य परिषदेची स्थापना करून सर्व संघटनांना जोडण्याचं काम त्यांनी केललं आहे, हे फार मोठं काम आहे. पण त्याच्यावरच समाधान मानून चालणार नाही. तर २०-२१ वर्षांमध्ये सहा संमेलनं

झालेली आहेत. म्हणजे त्याची गती फार धीमी झालेली आहे. हे सुसंघटित करायचे असेल तर त्या एक वैचारिक दिशा मिळायला पाहिजे. त्यात काही अडचण येत असेल तर मी, डॉ. गारे आम्ही मंडळी प्रयत्न करू की ही दिशा सर्वांना मान्य होणारी व सर्वांना बरोबर नेणारी असली पाहिजे. ही चळवळ गतिमान करण्यासाठी आपण सर्व साहित्य परिषदेच्या कार्यकर्त्यांनी विचार करायला पाहिजे.

आज दलित, आदिवासी, ग्रामीण, प्रस्थापित साहित्य चळवळीत आम्ही स्वतंत्रपणे वाटचाल करू इच्छितो आणि करतो आहोत. उषाताईंनी सांगितल्याप्रमाणे या साहित्याकडून आम्ही प्रेरणा घेतलेली आहे. दलित साहित्याकडून आम्ही प्रेरणा घेतली आहे हे कबूल करतो, पण आता आम्ही आमचा ठसा उमटू पाहतोय. आमचं भान आम्हाला मिळावं म्हणून हा प्रयत्न आम्ही करत आहोत. म्हणूनच या विचारमंचाची आम्हाला निर्मिती करावी लागलेली आहे. याचा अर्थ आम्ही त्यांचे स्पर्धक नाही. वेळ प्रसंग आला तर कुठेतरी आम्ही एकत्र येऊ, एकत्र राहू. पण आमच्या निकषावरचं आमचं जे साहित्य असेल त्याच्यासाठी आम्हाला स्वतंत्र विचारमंचाची गरज पडलेली आहे. तेव्हा ही गोष्ट आमच्यासारख्या समदुःखी साहित्यिकांनी समजून घ्यायला हवी. कोणी कोणाला हिणवायची गरज नाही. आज आम्ही उठू पाहतोय, कारण आम्हाला पिढ्यान् पिढ्या दाबून ठेवलेलं आहे.

सर्व अल्पसंख्यांक, दलित, आदिवासी आपापल्या जीवनाचा ठसा साहित्यात उमटवून मानवमुक्तीच्या प्रवाहाकडे हे साहित्य आम्ही नेणार आहोत. आमचं जीवन समूहजीवन आहे. श्रमावर आधारलेलं आत्मसन्मानाचं जीवन आम्ही जगत आहोत. तेव्हा खरी मूल्य आमच्या साहित्यातून दिसतात की नाहीत हे पाहणारी आमची नजर असली पाहिजे. आमची जीवनमूल्ये बरोबर नेणारे साहित्य निर्माण व्हायला पाहिजे. ■

## भुजंग मेश्राम

आजच्या चर्चासत्राचा विचार करत असताना पूर्वसूरींच्या आपल्या साहित्यावर जे काही बोलणं झालं त्याचा ओझरता उल्लेख करतो आणि आत्ताच्या सद्य:स्थितीत आदिवासी साहित्यासमोरील काय आव्हानं आहेत आणि या साहित्याच्या संबंधानं काही काही अंतर्विरोध सुद्धा आहेत आणि या सर्व पर्यावरणामध्ये, या जागतिक वाङमयात, मराठी साहित्यात आदिवासी साहित्य कुठे आहे? याचा विचार करत असताना मला असं लक्षात आलं की मराठीत जेम-तेम २५-३० आमची पुस्तकं असावीत; परंतु बुकलेट १००-१२५ आहेत. परंतु ज्याला कलाकृती अशी म्हणावी असे २५-३० आहेत. सहा संमेलने झालेली आहेत.

ही आजच्या काळाच्या मानाने तशी रेंगाळलेली कामगिरी असे म्हणता येईल; परंतु वेरिअर एल्विनच्या निकषानुसार असे म्हणता येईल की, आपली गुणवत्ता, आपली कामगिरी विशेषतः आदिवासींच्या संदर्भातील आकडेवारीवरून किंवा संख्या बळावरून न मोजता गुणवत्तेवरून मोजावी असा त्यांचा जो आग्रह आहे तोही इथे लागू पडावा असे वाटते. आदिवासी साहित्य कधी निर्माण झालं? आताही मराठी पुरती आपली चर्चा चाललेली आहे; परंतु जेव्हा आम्हाला शिक्षणाची ओळख झाली. पाठ्यपुस्तकांमधून आम्हाला कविता शिकवल्या जाऊ लागल्या. इतिहास शिकवला जाऊ लागला. विज्ञान शिकवलं जाऊ लागलं. निसर्गाबद्दलचं ज्ञान शिकवलं जाऊ लागलं आणि तथाकथित समाजाबद्दल, समाजातल्या मापदंडांबद्दल, संस्कृतीबद्दल जे शिक्षण मिळू लागलं किंवा औपचारिक शिक्षण मिळू लागलं तेव्हा आमच्या सारख्या सजग असणाऱ्या पिढीला यातील

आदिवासी संस्कृतीची, जीवनाची, आणि पांढरपेशा संस्कृतीमधल्या जीवनाची जी तफावत आहे त्यामध्ये जे काही अंतर आहे ते जाणवू लागलं.

जो परिणाम व्हायचा तो झाला, एकतर आम्ही आमची मातृभाषा सोडून वेगवेगळ्या भाषांमध्ये शिक्षण घेतलं. पूर्वी बोधनकर साहेबांनी अदिलाबाद जिल्ह्यामध्ये आणि मराठवाड्यामध्ये आदिवासींना मातृभाषेतूनच शिक्षण मिळावं म्हणून काही पुस्तिका तयार केल्या होत्या. काही शिक्षकही तयार केले होते, तशी आज परिस्थिती नाही. शिक्षणाचा एक गंड तयार झाल्यानंतर आणि भाषेचा, शिक्षणाचा आणि वास्तवाचा संपूर्णच एक असा विरोधाभासाचा डोंगर उभा राहिल्यानंतर सर्वप्रथम आमच्या तरूण पिढीने आजुबाजूला नजर टाकली. तेव्हा असं लक्षात आलं, इतिहासामध्ये आम्ही नाही, आमचे पूर्वज नाहीत इतिहासामध्ये, उदाहरण घ्या 'स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास' बिपिनचंद्रने लिहिलेला असो किंवा सरकारने लिहिलेला असो किंवा थापर मॅडमने लिहिलेला असो, त्यामध्ये आमच्या आदिवासींचे उल्लेख तोंडी लावण्यापुरते आहेत.

बिरसा मुंडाचे नाव इतिहासात नव्हतं. पण राजीव गांधींना त्याच्या नावाचा पुरस्कार मिळाला आणि बिरसा मुंडाचं नाव एकदम प्रकाश झोतात आलं. आमच्या इतिहासकारांनी घटनादुरूस्ती करावी तशी इतिहासात दुरूस्त्या केल्या. गंमत अशी आहे बघा, आदिवासींनी बिरसामुंडाचे नाव घेतलं तर तो नक्षलवादी ठरतो; परंतु अजित जोगीने किंवा सरकारी पातळीवरून बिरसा मुंडाचं नावं घेतलं गेलं तर तो देशप्रेमी ठरतो ! काय विचित्र योगायोग आहे. असंच एक तंट्या भिल्लाचं उदाहरण घ्या. त्याचंही इतिहासात कुठं साधं नाव नव्हतं. बाहेरून आलेल्या उपऱ्या लोकांनी सर्वात प्रथम आदिवासींच्या वसाहती नष्ट करण्याचा प्रयत्न केला. सुरूवातीला त्यांनी आदिवासींचे संस्कृतीकरण करण्याचे प्रयत्न केले. त्यात सर्वात प्रथम अमेरिकेत ज्या कोलंबसला आपण फार मोठा शोध लावणारा म्हणतो; परंतु त्या कोलंबसने तमाम आमच्या आदिवासींच्या पिढ्यांच्या पिढ्या गारद केल्या आहेत. हे अतिशय खेदाने नमूद करावसं वाटतंय. आणि तो आज आमच्या मानवाच्या इतिहासातला फार मोठा संशोधक ठरतो.

आमच्या आदिवासींना प्रचंड ज्ञान आहे, निसर्गाबद्दल, ज्ञानाबद्दल. विद्यापीठातले ज्ञानवंत आपल्या ज्ञानाचा गर्व करतात; परंतु आमच्या आदिवासीला जे पिढीजात ज्ञान आहे त्याचा गर्व अजिबात नाही. कारण तो म्हणतो की 'हे आम्हाला आधीच माहीत आहे.' तुम्ही म्हणता आम्ही याचा आता शोध लावलाय. हा मूलभूत प्रश्न आहे. रेडियसच्या संघर्षाप्रमाणे आमच्याकडेही ५ हजार वर्षांपासून तसा संघर्ष सुरू आहे. इतिहास संक्षिप्त रूपानं सांगणं फार कठीण आहे. रामायणात, महाभारतात, अगदी पुराणातही आदिवासींचे वेगवेगळ्या नावांनी उल्लेख आहेत. हिडिंबा, एकलव्य, शबरी यांचा उल्लेख येतो. वेगवेगळ्या जातीसमूहांचा उल्लेख येतो. यावरून एक लक्षात येतं की, आमचे तथाकथित विचारवंत जे त्या महाकाव्यांबद्दल, पुराणांबद्दल सांगत असतात की ही मानवतेचा संदेश देणारी ही पुराणं आहेत, महाकाव्ये आहेत. तेव्हा आमच्या आदिवासी मानसाला यातून असं वाटतं की, या प्रेमाच्या नावाखाली द्वेष तर शिकवला जात नव्हता ना? कारण त्या पुराणांमधले सगळे बळी आमचेच आहेत. शत्रू आणि मित्र हे ठरवलेलं आहे. त्याची मापदंड आहेत.

मनुस्मृती तर एक निषिद्ध टाबूज आहे. त्या सत्ता संघर्षाच्या काळात ते महत्त्वाचं असेल. हे झालं इतिहासाच्या संदर्भात. सांस्कृतिक क्षेत्रात आम्ही पाहिलं तर त्यांनी आदिवासींचीच उसनारी फार केलेली आहे. आमचा महादेव घेतलाय, आमचा गणपती घेतलेला

आहे. आमच्या ज्या चांगल्या घेण्यासारख्या गोष्टी त्या घेतल्या आणि त्याच्या मात्र दुप्पट गोष्टी आमच्यावर लादल्या आहेत. एक साधं उदा. सांगतो, आमच्या ठाणे जिल्ह्यात दरवर्षी वनवासी कल्याण आश्रम तर्फे गणपती वाटपाचा एक कार्यक्रम होतो. तर शाळेतला एक मुलगा आपल्या घरी गणपती घेऊन गेला. ते पाहून त्याची आई ओरडली 'अरे हे काय आणल?' त्यावर तो म्हणाला, 'गुरूजींनी दिलं.' अरे आधीच दहा-पंधरा आहेत घरात. तुझ्या गुरूजींना सांग काळजात बसेल अशी एखादी गोष्ट दे. तर हा झाला त्या मुलाचा म्हणजे आजच्या मुलाचा प्रश्न. कलावंताचा प्रश्न.

वाहरूनी सांगितलं की आमचं आदिवासी साहित्य म्हणजे काय? कदाचित या वीस वर्षात अजूनही स्पष्टता आली नसेल आदिवासी साहित्य म्हणजे काय? याची ती कदाचित येणार सुद्धा नाही. प्रत्येक साहित्याबद्दल काही अनुत्तरीत प्रश्न राहतातच. मी आदिवासी साहित्याची व्याख्या करणार नाही. पण मी असं म्हणेन की आजपर्यंत जी-जी काही कलाकृती आलेली आहे, त्यामध्ये मला एक जाणवलं आहे की, आदिवासी साहित्य हे आमच्या जगण्याचं आणि आमच्या चळवळीचं बायोप्रोडक्ट आहे. याचं कारण असं आता अलिकडं बायोप्रोडक्ट म्हटलं की कान टवकारतात आमच्या विचारवंतांचे. कारण तुम्ही कमिटेड असता.

कमिटेड म्हटलं की फारच अवघडच होऊन जात. कारण कलेच्या क्षेत्रात कमिटेड असणं फार वाईट गोष्ट समजली जाते. मग हा मार्क्सवादी असावा किंवा कुठलातरी वादी असावा अशी चर्चा सुरू होते. तर जगणं हे कमिटेड आहे की नाही मला सांगा पाहू. जगणं हे कमिटेड असेल तर जी चळवळ आहे ती आमच्या जगण्यातून, आमच्या संघर्षातून आली आहे. संस्कृती क्षेत्रात आज जे सांस्कृतिक प्रदूषण आम्ही पाहतो, तेव्हा आमच्या चळवळीला असं लक्षात आलं की पर्यावरणाची चळवळ तर आत्ता आत्ता सुरू झाली आहे, जागतिक पातळीवर दहा वर्षे झाली असतील. परंतु आम्ही संस्कृतीच्या क्षेत्रात पर्यावरणाची चळवळ केव्हापासून चालवत आहोत. आमच्या बापजाद्यांपासून. ह्याला मौखिक परंपरा म्हणा किंवा आणखी काही म्हणा.

ह्या सगळ्या गोष्टी असताना आमचा दावा अजिबात नाही की आमच्याकडेच सगळं आहे तुमच्याकडं काही नाही किंवा आमचं तुमचं अशीही आमची भाषा नाही ती भाषा आम्हाला दुसऱ्यांनीच शिकवली आहे. आम्ही तुमच्यापेक्षाही वेगळं, तुम्ही आमच्यापेक्षा वेगळं. तर या आदिवासी साहित्याच्या एकूणच अस्तित्वाबद्दल आज फारसं दुमत राहिलेलं नाही, परंतु मराठी साहित्यात काय झालेलं आहे, अलिकडं मराठी साहित्याला उद्योगाचा दर्जा दिला की काय अशी शंका वाटू लागली आहे. कारण मराठी साहित्य हे सुपर मार्केटमध्ये आलेल आहे आत्ता. आणि मराठी साहित्यात आय.एस.आय.चे शिक्के मारणारे आमच्याकडे भरपूर विचारवंत महंत उपलब्ध आहेत. त्यामुळे त्या त्या नावाप्रमाणेच साहित्यिक कुठला ते ठरतं परंतु आम्ही साहित्याच्या मंजुरीसाठी कुठलाही लढा लढत नाही.

आमचा लढा आहे, पण तो आमच्या विरूद्ध सुद्धा असेल. मग तो संस्कृती विसरून जाण्याच्या विस्मृतीबद्दल असेल. इथं चाललेल्या प्रचंड संस्कृती संघर्षाबद्दल असेल. आणि जे जे चांगलं आहे, ते ते जपलं पाहिजे त्याबद्दलचा संघर्ष असेल. परंतु आदिवासी संस्कृती म्हणजे नेमकी काय आणि तिला तत्त्वज्ञानाचा कोणता आधार आहे. कारण आज कोणताही इझम किंवा वाद पश्चिमेकडे ठरवला जातो. आजचा गांधीवाद किंवा आंबेडकरवाद पश्चिमात्यांच्या मतानुसार वाद (इझम) नाहीये. म्हणजे तिकडे तो इझम आहे हे ठरलं की मग तो आमच्याकडे येतो. आणी विशिष्ट कालबाह्य

झाल्यावर येतो. आदिवासी जीवनावर लिहिणारे जगदीश गोडबोले, दीनानाथ मनोहर, विलास मनोहर जे आजही लिहिताहेत हे माझे बिगर आदिवासी मित्र या सगळ्यांच्याच समोर आज जी आव्हाने आहेत व एकूणच जो जागतिक पट आहे, विषयांतराचा पट. आपला जो काही शत्रू आहे तो विषयांतर करण्याच्या मागे लागलेला आहे. तुम्ही मूळ विषयापासून वेगळे, विचलीत व्हावेत असं काहीतरी वातावरण तयार केलं जातंय. जागतिक पातळी जागतिकीकरण, खाजगीकरणाची सरमिसळ गाठ चालू आहे. आपल्याकडेही धर्मवाद्यांची आणि मूलतत्त्ववाद्यांची पुरोगामी पद्धतीने अशी वाटचाल सुरू आहे. आणि या वातावरणात आमचा मित्र कोण भाऊ, शत्रू कोण हेच कळेनासं झालं आहे. या नातेसंबंधांचं विस्मरण आम्हाला होत आहे.

तेव्हा आम्ही अमूक-तमूक वादांचा मुद्दा काढून लढण्यापेक्षा आज आमच्यासमोर काय priorities आहेत याचा विचार केला पाहिजे. आदिवासी साहित्याचा मूळ प्रश्न 'ते काय असावे?' यावर गेल्या २० वर्षात प्रचंड चर्चा झालेली आहे. ज्येष्ठ विचारवंत शरदचंद्र गोखले म्हणाले होते की आदिवासींचे नि दलितांचे प्रश्न वेगळे आहेत. दलितांना अस्पृश्यतेमुळे अन्ववित अत्याचार सहन करावे लागले, पण आदिवासी हा अस्पृश्य नाही. अशा प्रकारची काही निरीक्षणे आहेत. आमच्या आदिवासींचा 'एकला चलो रे' असा प्रवास आहे.

परंतु मित्रांनो मी असं सांगतो की जिथे महारवाडा नाही, तिथे आमचा परधान माणूस कोतवाल असतो. त्या हिंदुकरणाचा परिणाम म्हणून आमच्यातही अस्पृश्यता आहे. गोंड, परधानांमध्ये, क.म. ठाकूरांमध्ये आहे. तडवी भिल्लांमध्ये आहे. ह्या झाल्या तपशीलाच्या गोष्टी; परंतु संस्कृतीकरणामुळे आणि हिंदुकरणामुळे आमची एवढी बरबादी झाली असताना, अर्थात मी हिंदुकरणाला अधिक दोष देतो असे अजिबात नाही. जे-जे काही हे झालेलं असते. कारण विकासाच्या नावाखाली, कॉलनी व वसाहतीच्या नावाखाली, नैसर्गिक साधन संपत्तीच्या नावाखाली हे आदिवासींना गुन्हेगार ठरविण्यात आलेलं आहे. ब्रिटीशांनी पहिल्यांदा लष्करी आरमारीचे तळ आदिवासींच्या वसाहतींनाच केलेलं आहे. आणि पर्यायाने तिथे असलेली खनिज संपत्ती, म्हणजे आदिवासींच्या वसाहतींना एकप्रकारे 'चलन वलनाचे एक भांडार' असे समजले गेले आहे. आणि त्या दृष्चक्रामधून आमचा आदिवासी आजही बाहेर पडला नाही. नर्मदेच्या नंतरचा उकाई धरणाचा प्रश्न घ्या किंवा इतर विस्थापित आदिवासींचा प्रश्न घ्या. बरेच प्रश्न आहेत. हे प्रश्न आमच्या साहित्याशी निगडीत आहेत का ते आमच्या जगण्याशी निगडीत आहेत? खाजगीतले मतभेद उघडपणे मांडू नयेत. वैयक्तिक मतभेद साहित्याला पूरक नसतात.

आमच्या बऱ्याच आदिवासी लेखकांचा आत्ता कुठे सुसंवाद सुरू झालेला आहे. आमची आज पन्नास ते शंभर पुस्तकं तयार आहे. आमची स्क्रीप्ट तयार आहे. परंतु आमच्या साहित्य क्षेत्रात साहित्य संस्कृती मंडळाची आणि अनुदान संस्कृतीची जी बोलवा आहे, त्यामुळे अजूनही आजचे लेखक त्या अनुदानाच्या प्रतिक्षेत असावेत असं दिसतंय. कारण ही पुस्तकं प्रकाशित करायची तर आज प्रकाशन व्यवसायाचा व इतर प्रश्न आहे. त्यामुळे या लेखकांसमोर जी आव्हाने आहेत, ती त्यांनीच सुरू करायची आहेत, आपणच छापायची आहेत. कुणीतरी उद्धार करील ही आशा बाळगणे चुकीचे आहे. सहकारी तत्त्वावर संस्था उभ्या राहाव्यात आणि प्रकाशन संस्था काढाव्यात, असा सल्ला आमच्या ज्येष्ठ विचारवंतांनी दिला आहे.

■■

*(डॉ. विनायक तुमराम व डॉ. गारे यांची भाषणे उपलब्ध झाली नाहीत. क्षमस्व)*

# आदिवासी व आरोग्य

**या चर्चासत्रात 'ॲनिमिया' या विषयावर डॉ. सु. ल. काटे यांनी आदिवासींमध्ये आढळलेल्या सिकलसेल ॲनिमिया'च्या अभ्यासातून ज्या गोष्टी अनुभवास आल्या त्यांची मांडणी केली, तर डॉ. धैर्यशील शिरोळे यांनी गडचिरोली या दुर्गम व आदिवासी भागात माडिया व गोंड या जमातींमध्ये राहून आरोग्याच्या बाबतीत त्यांना ज्या गोष्टी अनुभवायला मिळाल्या त्यांची काही उदाहरणांसहित मांडणी केली आहे.**

## डॉ. सु. ल. काटे

तांबड्या पेशी लवकर फुटायला लागल्या की त्या माणसाला ॲनिमिया होतो. हा ॲनिमिया न बरा होणारा आहे, अनुवंशिक आहे. आपण ॲनिमियाचे निरनिराळे प्रकार पाहतो. नेहमीप्रमाणे आपण डॉक्टरकडे गेलो आणि ॲनिमिया आहे असं सांगितलं की डॉक्टर आपल्याला गोळ्या देतात आणि चांगलं खायला सांगतात. मग तो ॲनिमिया बरा होतो. पण अनुवंशिक ॲनिमियावर कुठल्याही तऱ्हेची ट्रिटमेंट घेतली तरी तो बरा होत नाही. यावर काही उपाय योजना करता येईल का? यावर आम्ही विचार केलेला आहे. आणि आम्ही जो थोडासा प्रयत्न केला तो थोडक्यात तुम्हाला सांगतो. बरेच लोक असं म्हणतात की ॲनिमिया हा अनुवंशिक रोग आहे. त्यावर उपचार नाही, मग कशाला डॉक्टरकडे जाता?

खरेतर हा आजार ज्या घरात आहे त्या घरातील माणसं इतकी निराश झालेली असतात, की 'यावर डॉक्टर काही उपाय सांगा. आपण काहीतरी मिळून करूया' असा आग्रह सारखा करत असतात. किंवा हा अनुवंशिक आजार, यावर असलेले उपचार आणि त्यावर आपण काय करू शकतो यावर मी आपल्याला थोडक्यात माहिती सांगतो. महाराष्ट्राचा नकाशा पाहिला तर निरनिराळ्या भागात आदिवासी कुठेकुठे राहतात, तिथल्या जागेचा नकाशा आहे. इथे आपण रायगड मध्ये गेलो तर कातकरी आदिवासी भेटतात. थोडसं पुढे नाशिकमध्ये गेलो तर कोकणा आदिवासी आहेत. वरती नंदूरबार, धुळे आणि जळगाव जिल्ह्यांमध्ये गेलो तर साधारणपणे तुम्हाला भ्हील द पावरा हा प्रामुख्याने आदिवासी जमात दिसते. अमरावती भागात कोरकू आदिवासी आहेत. आणि चंद्रपूर, नागपूर, भंडारा, गडचिरोली भागात आलात तर इथे तुम्हाला परधान, गोंड, माडिया हे आदिवासी आढळतात. महाराष्ट्रात तशा एकूण ४८ आदिवासी जमाती आहेत. पण तसं पाहिल तर १७ आदिवासी जमातीच प्रामुख्याने आहेत.

बहुसंख्य आदिवासींचे डोंगर भागात वास्तव्य आहे. आम्ही जेव्हा आदिवासींच्या आरोग्याच्या समस्यांचा अभ्यास केला त्यावेळेला आम्हाला ज्या ज्या समस्या आढळून आल्या त्याचे एकत्रीकरण केले. या आदिवासींच्या समस्यांमध्ये आम्हाला हे आढळून आले की त्यांना चौरस, सकस आहार मिळत नाही. त्यामध्ये प्रोटीन एनर्जी कुपोषणाचे प्रमाण जास्त आहे. सगळ्यात महत्त्वाचा

आणि भयानक असलेला प्रश्न आहे तो म्हणजे सूक्ष्म कुपोषणाचं प्रमाण जास्त आहे. आयोडिन, जे सुईच्या टोकाएवढं आयोडिन एक दिवसाला लागतं, तेवढं सुद्धा त्यांच्या जेवणात येत नाही. त्यामुळे गॉयटर (गलगंड) फार मोठ्या प्रमाणात आदिवासी भागात आहे. तुम्ही आदिवासी आश्रम शाळेत गेलात आणि विद्यार्थ्यांची तपासणी केली तर शेकडा १५ ते २०% मुलांमध्ये 'ए' जीवनसत्त्वाची कमतरता असल्याचे दिसते. आणि ६० ते ७०% स्त्रियांमध्ये आय डेफिशियन्सी मोठ्या प्रमाणात आहे. तर हा मायक्रोडेफिशियन्सी हा एक भयानक प्रकार आहे. दुसरं असं 'वॉटर बॉर्न डिसीज' हा प्रकार त्यांच्यात आढळतो. त्यांना स्वच्छ हवा मिळते, सुंदर हवा मिळते पण पाणी मात्र अतिशय अस्वच्छ मिळतं. त्यामुळे पिण्याच्या पाण्यामुळे होणाऱ्या रोगांचं प्रमाण आदिवासी भागात जास्त आहे.

आदिवासींमध्ये सगळ्यात मोठ्या प्रमाणात सिकलसेल ॲनिमिया आहे. फॅलेस्मिया, बिटा फॅलेस्मियाचं प्रमाण आदिवासींमध्ये इतर समाजापेक्षा खूप बरं आहे. मात्र अल्फा फॅलेस्मिया मात्र आदिवासी भागात जास्त आहे, पण एवढा त्रासदायक नाही, जितका सिकलसेल ॲनिमिया आहे. मोहाची दारू अलिकडे कमी झाल्यामुळे इतर दारू त्यांनी वापरायला सुरूवात केलेली आहे. तेव्हा अल्कोहोल हा एक मोठा आदिवासींमध्ये दोष आहे. सगळ्यात मोठ्या प्रमाणात अंधश्रद्धा, आणि त्याही विशेष करून आरोग्यासंदर्भाच्या आहेत. त्यामुळे घरात मुलगा आजारी पडला तर डॉक्टर काही करू शकत नाही, आपण भगताकडे गेले पाहिजे.

सिकलसेल ॲनिमियाचे पेशंट ज्यावेळेस बोलत नाहीत, कडक होतात तेव्हा म्हणतात की, नाही ह्याला भूत लागलं आहे ह्याला भगताकडे न्यायला पाहिजे. आपण जर अंधश्रद्धा दूर करू शकलो तर निम्मे प्रश्न आदिवासींचे सुटू शकतात.

सगळ्यात मोठा आदिवासींचा शत्रू गरिबी आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे या सगळ्या आदिवासींच्या आरोग्याची समस्या गंभीर असून आरोग्य समस्या सोडवण्यासाठी आरोग्य खात्याकडे भरीव अशी योजना पाहिजे. लॅक ऑफ फॅसिलिटीमुळे आदिवासींचे प्रश्न आणखीन गुंतागुंतीचे झालेत. ह्या सगळ्या प्रश्नांमध्ये बाकीच्या प्रश्नांवर शिरोळेसर चर्चा करतील. मी फक्त सिकलसेल ॲनिमिया म्हणजे काय? त्या रोगाची लक्षणं काय? त्यावर औषधउपचार काय? आणि त्याच्यावर काऊन्सिलिंग काही करता येईल काय यावर बोलीन. या तांबड्या पेशी ज्या असतात त्या मायक्रोस्कोपखाली स्लाईडवर पाहिल्या तर त्या आपल्याला गोलाकार दिसतात. सिकलसेल ॲनिमियाच्या पेशंटचा रक्त नमुना जर घेऊन पाहिला तर त्या विळ्या-कोयत्याच्या आकाराच्या दिसतात, सुरूवातीला एका शास्त्रज्ञाने १९१० साली त्याला सापडला तेव्हा त्याने त्या पेशी मायक्रोस्कोपखाली पाहिल्या तेव्हा त्याला विळ्या कोयत्याच्या आकारासारख्या दिसल्या. त्याने त्याला सिकलसेल ॲनिमिया असं नाव दिलं.

'सिकलसेल ॲनिमिया' मध्ये ऑक्सीजन कमी झाल्यावर अशाप्रकारे सिकलसेलनेस रक्तात जास्त मोठ्या प्रमाणात येतो आणि त्यामुळे तांबड्या पेशी लवकर मरतात. शास्त्रज्ञांचे असे म्हणणे आहे की, ज्या ज्या भागामध्ये फॅल्सीपेरम मलेरियाचे प्रमाण जास्त आहे त्या त्या भागामध्ये सिकलसेलचे प्रमाण जास्त आहे. त्याच्याही पुढे त्यांनी संशोधन करून पाहिलं की ज्यामध्ये सिकलसेल हिमोग्लोबीन आहे तिथे मलेरियम पॅरासाईट आतमध्ये गेल्यावर वाढत नाहीत आणि वाढत नसल्यामुळे

त्या माणसाला मलेरियापासून त्रास होत नाही. तर एका दृष्टीने सिकलसेल हिमोग्लोबीन हे मलेरिया पासून संरक्षण आहे, असे कदाचित संशोधनाचा विशेष असेल.

भारताचा विचार केला तर भारतात सिकलसेल कुठे सापडतात हे पाहिले तर तो राजस्थानमध्ये काही प्रमाणात सापडतो. गुजरातमध्ये काही ठिकाणी सापडतो. मध्यप्रदेशामधल्या आदिवासी भागातही आहे. ओरिसामध्ये सापडतो. तामिळनाडूमध्ये गेलात तर तेथील आदिवासी भागात मोठ्या प्रमाणात सापडतो.

महाराष्ट्राचा विचार केला तर महाराष्ट्रात सिकलसेल हा सह्याद्रीच्या टप्प्यात सापडतो. पण इथे सिकलसेलचे प्रमाण कमी पडते. साधारण ५ ते १० % सिकलसेल सापडतो. तेच तुम्ही कोकण भागात गेलात तर तुम्हाला थोडसं जास्त प्रमाण आहे; पण सातपुड्याच्या अमरावती भागात गेलात तर २० ते २५ % सिकलसेल कॅरिअरचं प्रमाण आहे. तेच तुम्ही गडचिरोली भागात गेलात तर तिथे परधान जमातीत सिकलसेलचे प्रमाण ३५ % आहे. ओतकरमध्ये ४०% आहे. आणि माडियामध्ये २०% ते २२% आहे. म्हणजे महाराष्ट्राचा विचार करता सातपुडा विभागामध्ये नंदूरबार, जळगाव, आणि विदर्भातला चंद्रपूर जिल्हा व गडचिरोली जिल्हा हे सिकलसेलग्रस्त जिल्हे आहेत असं आपल्याला म्हणता येईल.

आम्ही महाराष्ट्रातल्या विविध जातींमध्ये सिकलसेल फॅटिअरचे प्रमाण किती आहे हे शोधून काढले आहे. गडचिरोलीमधील ओतकांमध्ये ते ३८% आहे. मग परधान जमातींमध्ये, पश्चिम महाराष्ट्रात ठाकर समाजामध्ये, महादेव कोळी समाजामध्ये हे प्रमाण कमी आहे. सिकलसेलची लक्षणे काय आहेत? सिकलसेल ॲनिमिया ओळखायचा कसा त्याची काही कॉमन लक्षण आहेत का? तर सिकलसेल ॲनिमिया मध्ये पहिल्यांदा ॲनिमिया होत असतो. त्याचं हिमोग्लोबिन जर घेतलं ५ ग्रॅम, एकतर जळगाव जिल्ह्यात आम्हाला सिकलसेल ॲनिमियाची मुलगी सापडली. तिचे हिमोग्लोबिन २.५ ग्रॅम होतं. म्हणजे ॲनिमिया हा प्रामुख्याने सिकलसेल रोगाचा घटक आहे. त्यामुळे कधीतरी कावीळ होऊ शकते. कावीळ झाल्यावर अगदी हळदीसारखे पिवळे दिसतात.

तिसरं लक्षण असं की त्याचे हातापायाचे सांधे इतके दुखतात की तो पेशंट म्हणतो की, 'डॉक्टर मरण द्या पण ते सांधे दुखी नको.' पावसाळ्याच्या सुरूवातीला जेव्हा ढगाळ वातावरण असते त्यावेळेला तर सांधे दुखी फार मोठ्या प्रमाणात होते. आफ्रिकेत अशाच प्रकारचा सिकलसेल आहे आणि आफ्रिकेत अशा सिझनमध्ये सांधे दुखायला लागले की माणसं समजतात, 'पाऊस येणार.' तर पावसाळ्याच्या पूर्वी सांधे दुखीचं प्रमाण अधिक असतं. आणि कुठल्याही तऱ्हेचा संसर्ग त्याला लवकर होतो. न्यूमोनिया सारखं इनफेक्शन तर फार झटक्यात होतं. तेव्हा न्यूमोनियापासून त्या पेशंटला खूप जपावं लागतं. साधारण वयाच्या ३ ते ४ वर्षापासून याची लक्षणं दिसायला लागतात आणि तो पेशंट जस जसा मोठा होत जाईल तस तशी ती लक्षणं वाढू लागतात. ह्या पेशंटला आयुष्य मर्यादित असते. ते इतकं दु:खदायक असतं की सतत त्याला काहीन् काही होत असते. आणि आदिवासी भागात तर ह्या सगळ्यांवर कुठेही त्याला औषधोपचार पद्धती उपलब्ध नाही.

एक कोकणाजमातीमध्ये दोघेही सिकलसेल ॲनिमियाचे पेशंट नवरा - बायको आमच्याकडे तपासायला आले. त्यांना आम्ही औषध दिलं आणि त्या माणसाला आम्ही सांगितलं की, तुझ्या बायकोला

सिकलसेल ॲनिमिया आहे. तेव्हा तो म्हणाला, 'डॉक्टर काय करावं लागेल?' मी सांगितले, तिला सतत औषधोपचार करावा लागेल. सतत डॉक्टरांना दाखवत राहावं लागेल. त्यावर त्याने विचारलं, औषध पाण्यासाठी किती खर्च येईल? आम्ही त्याला सांगितलं की, साधारण २००० रूपयापर्यंत खर्च येईल. तेव्हा तो म्हणाला २००० रूपये ह्या बायकोवर कसे खर्च करायचे. २००० रूपयात तर मला दुसरी बायको येईल. अशा तऱ्हेने ह्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केलं जातं.

महाराष्ट्रात अनुसूचित जाती व जमाती दोन्हींमध्ये या रोगाचं प्रमाण आहे. नागपूरमध्ये अनुसूचित जातींमध्ये सर्वाधिक आहे. मुस्लिम समाजातही काही टक्के प्रमाण आहे. २००१ चं सेन्सस बघितलं तर महाराष्ट्राची लोकसंख्या साधारण १० कोटी आहे. १० कोटी मध्ये ३ कोटी लोक सिकलसेल ॲनिमियाचे पेशंट आहे. कुठल्याही आदिवासी भागात सिकलसेलच्या पेशंटसाठी फॅसिलिटी उपलब्ध नाही. कुठल्याही जिल्हा हॉस्पिटलमध्ये सिकलसेलची टेस्ट केली जात नाही. आम्ही ही टेस्ट सगळ्यात सोपी करून दिली आहे. कमीतकमी खर्चात ही टेस्ट करता येईल, हे दाखवून दिलं आहे. या टेस्टमध्ये सिकलसेल निदान १००% खरं होतं आणि या टेस्टचा खर्च ५ रू. पेक्षा जास्त नाही.

अशातऱ्हेचं आम्ही आदिवासी भागात जाऊन डेमॉन्स्ट्रेशन केलं. आरोग्य खात्यातील लोकांना दाखवलं, मेडिकल ऑफिसरांना सांगितलं तुम्ही हे उपलब्ध करा अशा तऱ्हेची टेस्ट की, जेणे करून सिकलसेलचं रोगनिदान तरी होईल. ट्रीटमेंट जी काही असेल ती देऊ शकाल. किंवा ट्रीटमेंट नाही दिली तरी चुकीचं रोगनिदान होणार नाही. यावर प्रतिबंध काही करता येईल का? असा जेव्हा विचार आला, त्यावेळेला वाटलं की, आपण सिकलसेलची बेबी जन्मालाच येऊ दिली नाही तर! त्यासाठी आम्ही एक प्रयोग केला.

सरासरी बघितली तर साधारणत: ३० लाख लोक कॅरिअर आहेत सिकलसेलचे, आणि १॥ लाख लोक याचे शिकार झाले आहेत. अशा लोकांना निदानाच्या सोयी सुद्धा आपण देऊ शकत नाही. PHC मध्ये डॉक्टर त्याचं ॲनिमिया म्हणून निदान करतात आणि त्याला आयर्न दिलं जातं. सिकलसेलच्या पेशंटमध्ये आधीच रक्तात आयर्न जास्त असतं, म्हणून त्या पेशंटला आयर्न देऊ नये असं वैद्यकीय शास्त्रात सांगितलं जाते. पण तिथले डॉक्टर भरपूर आयर्न देतात आणि त्याचा फायदा तर सोडा तोटाच अधिक संभवतो. यावर औषधोपचार म्हणजे फॉलिक ॲसिड, काही टॉनिक्स आहेत. पण आयर्न मात्र नाही.

या प्रयोगामध्ये एक कम्युनिटी कंट्रोल प्रोग्राम आम्ही नंदूरबार व गडचिरोली या दोन जिल्ह्यांमध्ये राबविला. त्याच्यामध्ये आम्ही कम्युनिटी कंट्रोलवर माहिती घेऊन निदानाच्या सोयी उपलब्ध करून दिल्या, त्यामुळे कॅरिअर व सफरर शोधायला मदत होऊ शकते. सिकलसेल पेशंटचा फॉलोअप करत गेलो की यांना आजार कशा प्रकारचा आहे, यांना केव्हा कावीळ होते, केव्हा संसर्ग होतो, लिव्हर केव्हा वाढते, कुठल्या वयामध्ये ती वाढत जाते? लोकसंख्येनुसार सर्व्हे करून कॅरिअरचे पेशंट आम्ही शोधले. साधारण ५-५ हजार लोक दोन्ही जिल्ह्यांमध्ये आढळले, त्यांना कार्ड दिली की, तुम्ही कॅरिअर आहात तुम्ही सफरर आहात. अशा तऱ्हेची आणि त्यांना सिकलसेलबद्दल एवढी माहिती दिली, की ज्यामुळे त्याला या रोगाविषयी गैरसमज राहू नये.

आईच्या पोटामध्ये असणारा गर्भ सिकलसेल ॲनिमियाचा आहे की कॅरिअर आहे की नॉर्मल आहे हे शोधण्यासाठी काही साधनं आम्ही उपलब्ध करून

दिली. आम्ही कार्ड वाटली गडचिरोली जिल्ह्यामध्ये, तेव्हा बरेचसे पेशंट आमच्याकडे आले ते कावीळीने आजारी होते. त्यात काहींनी सांगितलं की, अधूनमधून डोळे पिवळे होतात. म्हणून मग आम्ही पिवळा रंग सिलेक्ट केला.

जे कॅरिअर आहेत त्यांना अर्धा पांढरा व अर्धा पिवळा, जे सफरर आहेत त्यांना पूर्ण पिवळा व नॉर्मल पेशंटना पूर्ण पांढरा कागद दिला. आणि प्रत्येक कागदाच्या मागे संदेश दिला की, जर कॅरिअर वडील असतील तर त्या त्यांनी लग्न करू नये. जर आई कॅरिअर असेल व वडील नॉर्मल असावेत किंवा वडील कॅरिअर असेल तर आई नॉर्मल असावी. अशा तऱ्हेची लग्न करायला काही हरकत नाही. अशातऱ्हेचा मॅरेज काऊन्सिलिंग संदेश त्या भागात दिला. मग त्यातून आम्हाला काय समजले की, सिकलसेल बद्दल लोकांना काही माहिती मिळाली का? त्यांच्यात काही जागृती झाली का? तर अशा तऱ्हेने लोकांमध्ये आम्ही जाणीव निर्माण करू शकलो.

गडचिरोली, अक्राणीमहाल मध्ये गेलात तर लोकांना सिकलसेल म्हणजे काय? त्याचा पेशंट कशाप्रकारे पाहायला मिळतो आणि तो कशामुळे होतो? याची माहिती तरी मिळाली. सगळ्यात वैद्यकीय व्यवसायात ही जाणीव जागृती करायला आम्हाला खूप त्रास पडला. काही लोक सांगायचे हा गुरांचं मांस खाल्ल्यामुळे होतो, तर काही आणखी काही सांगायचे. विशेषतः डॉक्टर मंडळी हे सांगायची. याच्यावर उपचारच नाही तर तुम्ही कशाला प्रयत्न करता? तेव्हा आम्हाला डॉक्टरांचं सुद्धा प्रशिक्षण करावं लागलं. आम्ही त्यांच्या निदान अंधश्रद्धा तरी कमी करू शकलो. या कार्यक्रमाला आम्हाला सर्वात जास्त साथ मिळाली पालकांची. सगळ्यांनी सिकलसेलची माहिती घेतली. आणि त्या लोकांनी हा आपला प्रश्न आहे असे समजून, खेडेगावात जे पालक होते तेच आता आमचे काऊन्सलर म्हणून काम करतात. ते विवाहाच्या बाबतीत व्यवस्थित काम करतात. म्हणून आपण तळमळीने काम केलं, त्या लोकांमध्ये जाऊन मिसळलं तर मला खात्री आहे, एक ना एक दिवस हा आमचा प्रोग्राम लोक मान्य करतील.

विदर्भामध्ये आम्हाला मानसिक तणावाचे प्रश्न सापडले. तिथे एक कुटुंब आम्हाला सापडले की ज्यात सगळ्यांमध्ये कॅरिअर आहे, आणि त्या सगळ्या बहिणींचे नवरे कॅरिअर आहेत. तसेच प्रत्येक घरामध्ये एकेक-दोन-दोन सिकलसेल ॲनिमियाचे पेशंट आहेत. हे कुटुंब इतके डिप्रेस आहे की त्यांना काय करावे हे सुचत नाही. सगळे डॉक्टर करून देवऋषी सुद्धा केले. नंदूरबारमध्येही तीन भाऊ अशाप्रकारे सापडले.

चंद्रपूरमध्ये एका जोडप्यापैकी बायकोने नवऱ्याला सांगितलं की तुम्ही कॅरिअर नसलेली बायको करा म्हणजे आपल्याला नॉर्मल मुलं होतील. नवऱ्याने ते ऐकलं नाही. पण येत्या काही वर्षात त्यांची आधीची मुलं राहणार नाहीत. आम्ही जे काम घेतलंय ते फार अवघड आहे. हे आहे खूप मोठं. आम्ही खूप छोटे आहोत पण तरी देखील हे काम घ्यायचं आम्ही ठरवलेले आहे. आपल्या सर्वांच्या सदिच्छेने व आशीर्वादाने हे काम करू, असे वाटते.

■

## डॉ. धैर्यशील शिरोळे

'आदिवासी म्हणजे कोण' हे सांगण्याची तुम्हाला गरज नाही. त्यांचं आयुष्य ते त्यांच्या पद्धतीने जगत असतात. त्यांना बाहेरच्या लोकांची गरज नसते. जंगलात, गुहेत राहतात. त्यांचं अन्न, त्यांचा निवारा, त्यांचं रोजचं जीवन सगळं अरण्यावर अवलंबून असतं.

त्यांच्यामध्ये खूप अंधश्रद्धा असते व अगदी कमी कपडे घालतात. हेमलकश्याला, इथून १२०० किमी आहे. इंद्रावती नदीच्या काठी आणि इथे कपडे जेव्हापासून वापरायला लागले तेव्हापासून आदिवासींना खरूज यायला लागली जो पर्यंत ते कपडे घालत नव्हते, तो पर्यंत खरजेचा प्रॉब्लेम नव्हता.

जेव्हा आपण एखादी नवीन गोष्ट करायला जातो तेव्हा कधीकधी गमतीदार घटना पण येऊ शकतात. ते हिंदू नाहीत, ख्रिश्चन नाहीत किंवा कुल्याही एका धर्माचे नाहीत. त्यांचा धर्म म्हणजे पंचमहाभूतांचा. आणि त्यांना भूतांखेतांची अतिशय भीती, तसेच पूर्वजांचीही. पूर्वजांच्या इच्छेविरूद्ध काही करत नाही. प्रत्येक गोष्टीत कौल लावतात. ज्या ज्या धर्माच्या संपर्कात ते आले, तो तो धर्म त्यांनी स्वीकारला. हा पक्का आदिवासी, अतिशय कणखर आमचा दवाखाना ४० खाटांचा आहे. बाबा आमटे यांनी ७५ साली स्थापलेला. तिथे डॉ. प्रकाश आमटे काम करतात. मी त्या दवाखान्यात काम करायला जातो आणि हे लोक ३० ते ४० किलोमीटर चालत येतात. तो भाग अतिशय सुंदर आहे. सपाटीवर जंगल आहे. आपल्याकडे कसे डोंगरावर झाडे असतात, सपाटीवर झाडे नसतात. खूप मोठी-मोठी झाडे आहेत सागाची, ऐन, अंजुम मोठेमोठे वृक्ष आहेत. आणि इंद्रावती नदी आहे, वैनगंगा-पैनगंगा आहे. आणि या सगळ्या नद्या गोदावरीला मिळतात. म्हणजे अतिशय देखणा असा हा भाग आहे.

माडिया आणि गोंड या इथल्या मुख्य जमाती. आपण काहीतरी उपाय काढावा म्हणून या स्लाईड दाखवतो आहे. हे त्यांचं खेडं आहे, हे त्यांचं कंपाऊंड, माडाचं झाड, हे शिंदीचं झाड. दोन्ही पासून दारू काढतात. मी ही स्लाईड दाखवली ती ह्यासाठी की हा हातपंप बसवलाय, परंतु कॉन्ट्रॅक्टर आणि सरकारी अधिकारी या लोकांनी संगनमत करून कोट्यावधी रूपयांचा या भागात अपहार केलाय. तो असा की, फक्त त्यांनी वरचं बसवलंय. त्याच्या खाली बोअर नाही. आणि प्रचंड प्रमाणात पैसे बोअर घेण्यासाठी जाहीर झाले होते, दिले गेले. ते त्यांनी एकमेकांत वाटून घेतले. त्यामुळे बऱ्याच खेड्यांत असे पंप नुसते दिखाव्यासाठी बसवलेत. इनस्पेक्शनला आले की, लांबून इनस्पेक्टरला दाखवतात. त्यालाही माहीत असतं. अशाप्रकारे आदिवासींची अतिशय पिळवणूक होते.

आहाराच्या बाबतीत फक्त ताजे खाद्यपदार्थ काय ते खात असतील तर पावट्यासारख्या शेंगा. भात आणि मोठे लाल भोपळे, त्याची चटणी. मुंगळ्यांची मोठमोठी घरटी झाडांवर लावतात आणि ते मुंगळे आपल्या शरीरातल्या द्रवपदार्थांना पानांना जोडून एका मोठा बाऊल तयार करतात आणि त्याच्यात मुंग्या त्यांची अंडी घालतात. ती अंडी यांना अतिशय आवडतात. मुंगळ्यांची चटणी करतात.

मोहाचं झाड, आदिवासींचं दैवत. त्याच्या पानांचे द्रोण, पत्रावळ्या करतात. मोहाची फुलं बहरली की अख्ख्या जंगलाला एक प्रकारचा मादक वास येतो. ही झाडं तिथले आदिवासी एकमेकांत वाटून घेतात. मोहाचा पांडलूम असतो. पांडूलूम म्हणजे एक उत्सव की जी भगत सांगेपर्यंत कोणीही मोहाचं फूल सुद्धा उचलत नाही. या झाडावर आदिवासी कधीही कुऱ्हाड लावणार नाही. शिवाय त्याच्या बियांपासून ते तेल काढतात. त्या तेलावर दिवे लावतात. मोहाची फुले वाळवून त्याच्यापासून पीठ करतात, भाकरी करतात. आणि मोहाची दारू करता आली नाही तर लग्न होत नाहीत. मोहाची फुले अतिशय छान असतात. म्हातारी बाई फुलं वाळवते. झाडावरून अजिबात भांडणं होत नाहीत. हे झाडं तुमचं, हे आमचं, कुणीही असं करणार नाही. जरी

भांडणे झाली तरी त्यांची पंचायत ते बरोबर सोडवतात. ॲल्युमिनियमचे दागिनेः परंतु त्यांना ते अतिशय आवडतात. आदिवासी जर का कुठल्या प्रकारे जायबंदी झाला, तर त्याला दुसरा आदिवासी काही पोसू शकत नाही. त्याच्याकडे एवढे रिसोर्सेस नसतात. त्यामुळे तो बिचारा मरतो. समजा त्याचे दोन्ही पाय फॅक्चर झाले तर किंवा काही कॉम्प्लिकेशन्स झालं तर तो काही पुढं जाऊ शकत नाही. आणि या अवस्थेत नागपूरला जायचं म्हणजे ३०० कि. मी. त्यांच्याकडे गाईचं दूध हे गायीच्या बछड्यासाठी, आपल्यासाठी नाही. अशी समजूत आहे. म्हणून त्यांचं आता एकप्रकारे ट्रेनिंग चालू आहे हे दूध बछड्याला पुरून शिल्लक राहिलं तर ते दूध तुमच्या मुलांना द्या. नाहीतर ते गायीच दूध काढत नव्हते. आता काढायला लागलेत.

शेती करायच्या बाबतीत त्यांची अशी एक ठाम समजूत, त्यामुळे वरवर शेती असते. नांगरून शेती करत नाहीत. कारण पृथ्वीला ते आई समजतात. आईच्या छातीत नांगर घालायचा म्हणजे सुरा घुपसल्यासारखं वाटतं. तर हळूहळू ह्या सगळ्या गोष्टी ते शिकू लागलेत. जिथे जागा असेल तिथे या स्त्रिया गोंदून घेतात. मला काळजी कशाची आहे तर गोंदवण्याची. कारण एड्समध्ये वगैरे हा प्रॉब्लेम अतिशय आपल्याला भेडसावणारा आहे.

या सगळ्या आदिवासी लोकांना गोंदवण्याचा भयंकर नाद आहे. आणि गोंदवणारे लोक येतात त्यांच्या सुया स्टरलाईज्ड नसतात. एखाद्या एड्सच्या पेशंटची सुई दुसऱ्या पेशंटला वापरली, तर त्या पेशंटला इनफेक्शनच्या रूपाने जो एड्स होतो तो होऊ शकेल. त्यामुळे याच्यावर आम्ही चर्चा केली होती, पण त्यावर कोणी काय उपाय सांगायला तयार नाही. म्हणून या गोंदवणाऱ्यांना मार्गदर्शन करावे लागेल. तेव्हा हा प्रश्न आपल्याला सोडवायला लागणार आहे. एड्स जर का आला आणि तो १००% येणार ! आदिवासींचं एक मला फार आवडतं, की गोंड आणि माडिया स्त्रियांना खूप स्वातंत्र्य आहे. त्यांना हुंडा मिळतो. त्यांना घटस्फोटाचा अधिकार आहे. नवऱ्यांनी नीट वागवल नाही तर तो तिला बाहेर काढून टाकू शकत नाही. घरघुशी प्रकार आहे. फक्त पहिल्या नवऱ्यानी जो काही हुंडा दिला असेल तो त्या मुलाला परत करावा लागतो.

आणि त्या स्वतंत्र व  अतिशय शूर स्त्रिया आहेत. स्वतःची डिलिव्हरी स्वतः करतात. नाळ कापताना मुलगा असेल तर बाणाने व मुलगी असेल तर ब्लेडने कापतात. स्वतः आंघोळ करणार. स्वतः वार पुसणार, त्यांची स्पेशल खोली. ती चार दिवस तिथेच झोपते. कशाला हात लावत नाही. नवरा तिला खायला करून घालतो. बाळंत झाल्यावर दहा दिवस नवरा तिला खायला घालतो. नवऱ्याला त्याचे मित्र खायला आणून देतात, तेव्हा ही पद्धत. प्रत्येक घरासमोर एक झोपडी दिसेल. डिलिव्हरी बाहेर होते. जमिनीवर होते. एखादी म्हातारी आजी तिला सांगते, आता जेवून घे. विश्रांती घे. आता उभी रहा. आता बस. त्याप्रमाणे ती फॉलो करते. आणि लहान लहान आया असतात, १६, १७ वर्षांच्या.

आदिवासींत रोग भरपूर आहेत. डॉ. कार्टेनी सिकलसेल ॲनिमिया सांगितला आहेच. त्याच्याबद्दल आपण बोलणार नाही. पण सगळ्याचं कारण कुपोषण. त्यांच्याकडे त्वचेशी संबंधित, लैंगिक संसर्गाने झालेले, कुष्ठरोग, अतिसार, मलेरिया, थामलेरिया, न्यूमोनिया, रातांधळेपणा इत्यादी सगळ्या प्रकारचे आजार आहेत. सातपुड्यात प्रचंड प्रमाणात गॉयटर गालगंडी आहे. या सगळ्याचं कारण कुपोषण. आणि कुपोषणाचं कारण गरिबी (दारिद्र्य), दुर्लक्ष, संसर्ग, अंधश्रद्धा इत्यादी.

आणि या सगळ्या गोष्टींना एकच उपाय म्हणजे शिक्षण देणं. आज धारणी, अमरावती, नंदूरबार यांसारख्या ठिकाणी कुपोषणाने मृत्यू असं सांगितलं जातं. पण ते वर्षानुवर्षे चालूच आहे. कुपोषणामुळे त्यांची प्रतिकारशक्ती कमी होऊन त्यांना इतर रोग जडतात आणि त्यात ते मरतात. पण कारण कुपोषणच सांगितलं जातं. पण त्यांचं कुपोषणाचं प्रमाण वाढले ते त्यांचे खरे अन्नाचे स्त्रोत होते ते जंगलाच्या, जमिनीच्या कमतरतेमुळे कमी झाले. त्यामुळे ते अधिक हवालदिल झालेत.

आपण एकदा या गोंड आणि माडिया ह्या आदिवासी भागात जाऊन या. हे पक्के आदिवासी आहेत. आता कपडे घालायला लागलेत. नाहीतर ते पानेच गुंडाळायचे, वल्कले घालायचे. मध्यप्रदेशातल्या बस्तर जिल्ह्यापर्यंत यांची सीमा. आदिवासींचा सगळ्यात महत्त्वाचा गुण म्हणजे सामूहिक जीवन. एकमेकांना सांभाळून कसं घ्यायचं, मदत कशी करायची आपल्या सगळ्यांना त्यांच्याकडून हे शिकण्यासारखं आहे. एकमेकांपैकी कोणी आजारी असलं तर त्यांचं 'कम्युनिटी लाईफ' बघण्यासारखं असतं. दुसरं एक सामूहिक जीवन व्यवहाराचं उदाहरण म्हणजे शिकारीचं. एखाद्या दिवशी डुक्कर मिळालं की, त्याचे वाटे करतात. आणि शिकारीत ज्यांनी भाग घेतला त्यांच्या घरातल्यांना त्याचा वाटा मिळतो. त्याच्यामध्येही जी स्त्री गरोदर असेल तिला दुप्पट वाटा मिळतो. अतिशय मनाला बरं वाटेल असा हा विचार असतो.

त्या डुकरावर ज्याने पहिला भाला मारला असेल त्याला डबल हिस्सा मिळतो. त्यांच्यात समंजसपणा असतो. इथे मराठीचा अजिबात गंध नाही. त्यामुळे काम करताना अडचणी येतात. डॉ. प्रकाश आमटे, वगैरे डॉक्टर हे जवळ जवळ २० वर्ष तिथे राहिल्यामुळे त्यांना ती भाषा येते. त्यामुळे आपल्याला सारखं निरीक्षण करावं लागतं. मी जरी स्पेशालिस्ट असलो तरी पेशंटला काय होतं हे जर कळलं नाही तर आपण करणार काय? औषध लिहिताना अतिशय काळजीपूर्वक कोणाला तरी समजावून सांगायला लागतं. कडू औषध दिलं तर ते खाऊन टाकतात. आठवड्याच्या गोळ्या एका दमात गिळून टाकतात. जंताच्या गोळ्या किंवा औषध आपल्या हातानी पाजायचं. नाहीतर फार प्रॉब्लेम येतो. हे सगळ्या गोळ्या खावून टाकतात आणि त्यामुळे फार गोंधळ होण्याचा संभव असतो. सरकारी रूग्णालयांमध्ये प्रचंड प्रमाणात गैरव्यवहार होतो. कारण त्यांना माहीत आहे की, मुंबईहून गडचिरोलीला कोण येतंय तपासायला. आदिवासींना हॉस्पिटलमध्ये झोपायला आवडत नाही. ते जरा ठीक असेल तर झाडाखाली जावून झोपतात. त्यामुळे रोज आमचा राउंड असा असायचा. ह्या झाडापासून त्या झाडापाशी. तिथून त्या झाडापाशी. असं २० ते ३० झाडांपाशी आमचा राऊंड संपतो. तिथं आपली स्पेशालिटी विसरून जायचं. सगळं विसरून जमिनीवर बसायचं. त्यांच्याशी बोलायचं. तपासायचं. मलं मोठी गोड असतात, सगळीकडेच कुठेही जा. कोणाची मुले असेनात का?

ट्युबरक्युलॉसीस (टी.बी.) हा सगळीकडे आढळणारा रोग. इथेही याचं प्रमाण अधिक आहे. सगळ्याप्रकारचे पेशंट आढळतात. साप चावण्याचे प्रमाणही खूप आहे Antivenum इथे सतत लागतं. डिसेंबर - जानेवारीत अस्वलांचा विणीचा काळ असतो. तुम्ही जर का तिथे चूकून गेलात तर हल्ला करून ते तुम्हाला जखमी करणार. अस्वलाच्या हल्ल्यातून बचावणं म्हणजे नशिबच पाहिजे, बाकी काही. त्याच्याही ५-६ केसेस असतात. भाजण्याचे प्रकार थंडीत जास्त. शेकोटीभोवती आदिवासी झोपतात. याही केसेस काही प्रमाणात आहेत. ■■

# आदिवासी स्त्री व आरोग्य

नॅन्सी गायकवाड

आपल्याला इथे आदिवासी स्त्री आणि तिच्या आरोग्याची सामाजिक बाजू, हे मांडणं या सत्राचं मूळ उद्दिष्ट आहे. तर सर्वांना अशी विनंती आहे की त्यांनी त्यावर लक्ष केंद्रित करावं. मी या मांडणीपासून सुरू करीन आणि असं नाही की प्रत्येकांचे अनुभव विशेष असतात. मी खूप मोठ्या प्रकारे संशोधन किंवा अभ्यास केला असा नाही, पण नक्कीच जे आपल्या अनुभवातून, व्यवहारातून दिसते ते महत्त्वाचं आहे आणि त्याला चळवळीची जोड राहिलेली आहे ह्या आधारावर इथं मांडण्याचा प्रयत्न करतेय.

जागतिक आरोग्य संघटनेमध्ये आरोग्याची व्याख्या मांडत असताना असं म्हटलेलं आहे, 'आरोग्य म्हणजे अशी स्थिती ज्याच्यात शारीरिक, मानसिक आणि सामाजिक याचं चांगलं स्वास्थ असणं म्हणजे आरोग्य. ना की नुसतं रोग नसणं म्हणजे आरोग्य. हा मुद्दा मला असं वाटतं की फार महत्त्वाचा आहे, आपल्याला आजच्या सत्राला सुरूवात करण्याच्या दृष्टीने. दुसरं मला असं वाटतं की, ते म्हणजे जेंडर आणि सेक्स या ज्या दोन गोष्टी आहेत, अनेक वेळा आपल्या कार्यामध्ये याला एकच असल्यासारखं मानलं जातं आणि इथं मला वाटतं की त्याची स्पष्टता आणि वेगळेपण सांगणं गरजेचं आहे. लिंग किंवा सेक्स हे नैसर्गिक आहे. Physical aspect ज्याला आम्ही स्त्री आणि पुरूष असं म्हणतो. म्हणजे नैसर्गिक म्हटलं तर स्त्रीच जन्म देऊ शकते. स्त्री दूध पाजू शकते, हा जो भाग आहे हे नैसर्गिक आहे. दुसऱ्या बाजूला आपण जेंडर आणि विशेष करून गेल्या पाच वर्षामध्ये सरकारी पातळीवर सुद्धा विशेष आंतरराष्ट्रीय पातळीवर काही घडामोडी झाल्या. गेल्या ५-१० वर्षांपासून जेंडर हा शब्द सातत्याने पुढे येतो. जेंडर जास्त करून 'स्त्री' असंच म्हणून पुढे टाकलं जातं. म्हणजे स्त्रियांचे प्रश्न जेंडर इश्यूज. परंतु तसं न पाहता या सत्राला याची स्पष्टता करण्याची गरज वाटते मला की जेंडर म्हणजे सामाजिक लिंगभाव. अजूनही त्याची व्याख्या वादग्रस्त आहे. मुख्य म्हणजे आपण साध्या आणि सोप्या शब्दांत ते समजणे गरजेचे आहे की, समाजाने दिलेली दृष्टी, स्त्रीला आणि पुरूषाला, म्हणजे स्त्रीकडे बघण्याची सामाजिक दृष्टी पुरूषाकडे बघण्याची सामाजिक दृष्टी याच्या आंतरभूत म्हणजे या दृष्टिकोनातून स्त्रियांकडून अपेक्षित कामे, पुरूषांकडून अपेक्षित कामे, स्त्रियांकडची भूमिका, पुरूषांकडची भूमिका. याला अजून स्पष्ट करण्याचं म्हटलं तर आत्ताच आपण म्हटलं की जन्म देणं हे नैसर्गिक आहे व ते स्त्रीच करू शकते.

पण त्या बाळाचं संगोपन करणं, त्याचं नाक पुसणं, त्याची शी काढणं हे सामाजिक आहे आणि हे स्त्री पण करू शकते, पुरूष पण करू शकतो; पण आपल्या समाजात ही कामे स्त्रीचीच मानली गेलीत. 'जेंडर'च्या दृष्टिकोनातून स्त्रीवर काय परिणाम झालेत हे या सत्राचा मूलभूत भाग आहे. तर या 'जेंडर' वर प्रभावित करणारी काही व्यवस्था आपल्या समाजात आहे. त्यामधली एक ही विषमता स्त्री व पुरूषांमधील केलेली आहे, त्यातील व्यवस्था आहे, पुरूष प्रधान व्यवस्था ही जास्त करून पुढे येत आहे. आणि या व्यवस्थेमध्ये महत्त्वाचे पाच भाग आहे, की पुरूष हा प्रमुख आहे. पुरूष हा निर्णय घेणारा आहे. पुरूषांचं पूर्णपणे तिच्या वागण्यावर, तिच्या मोकळीकतेवर नियंत्रण

आहे. तिच्या लैंगिकतेवर पुरूषाचं नियंत्रण आहे. तिच्या पुनःउत्पादनावरच्या पातळीवर निर्णयावर सुद्धा पुरूषाचं वर्चस्व आहे. तर एका बाजूला ही व्यवस्था प्रभावित करते. दुसऱ्या बाजूला अजून व्यवस्था आमच्या समाजाला प्रभावित करतात. त्या म्हणजे १) बांडगुळी अर्थ प्रणाली ही आहेच २) जातीयता-याबद्दल बोलत असताना मला डॉ. आंबेडकरांचा उल्लेख करावासा वाटतो. डॉ. आंबेडकर यांनी जातीयतेची चळवळ पुढे रेटताना यात स्पष्ट केलं होतं की जातीयता ही एक उतरंड आहे समाजाची. आणि या उतरंडीमध्ये जाती विभागल्या गेलेल्या आहेत. पण या प्रत्येक उतरंडीमध्ये, प्रत्येक घटकात जातीच्यात पुन्हा विभाजन दिसते. पुरूष वरती स्त्री खालती. तसेच बांडगुळी अर्थप्रणाली म्हणजे विषमता म्हणजे जी आर्थिक विषमता निर्माण झाली ती गरीब व श्रीमंत अशी. तिथे सुद्धा आम्हाला ही विषमता दिसते - की पुरूष वरती स्त्री खाली.

याचा अर्थ आपल्याला संपूर्ण घटक बघितले तर ही एक अशा पद्धतीची व्यवस्था आहे, जी आम्हाला गरिबीत व श्रीमंतीत सुद्धा सापडते. ती मध्यमवर्गीय व कुठल्याही जातीय घटकातही सापडते आणि तसं पाहिलं तर आदिवासींत सुद्धा सापडते, आणि ही म्हणण्याची वेळ आता आली आहे. ही स्पष्टता करीत असताना, आपल्याला या व्यवस्थेचा हा पगडा आहे, समाजाच्या प्रत्येक जीवनाच्या घटकात त्याचा प्रवेश आहे. म्हणजे एक अंगानी आपली जी भाषा आपण वापरतो, त्यात सुद्धा या पुरूष प्रधान व्यवस्थेचा प्रभाव आपल्याला दिसून येतो. आपली जी काही मूल्ये आपण अगदी फार महत्त्वाची वाटतात, खाजगी वाटतात त्या मूल्यांत तो दिसून येतो. आपल्या व्यवहारामध्ये दिसून येतो. समाजाच्या प्रत्येक व्यवस्थेमध्ये आम्हाला आज ही व्यवस्था दिसून येते. म्हणजे एका बाजूला सामाजिक व्यवस्थेत आहेतच - म्हणजे धर्म, कुटुंब, शाळा; तर दुसऱ्या बाजूला आर्थिक व्यवस्थेत जिथे कुठे आपण बघतो तिथे, बाजारपेठ म्हणा, आपल्या व्यवहाराचं ठिकाण जी बँक, म्हणजे संपूर्ण अर्थव्यवस्था जिथे जिथे आहे तिथे आम्हाला हेच दिसतं. तेवढंच नाही, राज्य व्यवसथेमध्ये कुठल्याही सरकारी यंत्रणेत बघा, कुठल्याही धोरणात बघा आम्हाला याचाच प्रभाव असल्याचा दिसतो. आणि त्याच पातळीवर आपण जिथे राहतो गाव, समाज, वस्ती तिथे पण आम्हाला दिसतो. म्हणजे आम्हाला ह्या व्यवस्थेचा एकंदरीत प्रभाव त्या दृष्टिकोनातून अगदी ठामपणे दिसतो. आदिवासी समाजाबरोबरचे आतापर्यंतचे आपले जे अनुभव राहिलेले आहेत ते पाहता, आपण घर हे सुरक्षिततेचं ठिकाण म्हणतो. त्यातही अगदी व्यापक अर्थाने कौटुंबिक हिंसा आता पुढे आली आहे.

नवरा-बायकोच्या भांडणाकडे कोणी ढुंकून पाहू नये असं म्हटलं जातं. व्यापक समाजाकडे पाहता आता कौटुंबिक हिंसा ही राजकीय विषयांमध्ये चळवळीतूनच आणली गेलीय. त्याला अजून किती आधार मिळतो तो दुसरा मुद्दा आहे. किमान आज महिला धोरणामध्ये हा आलेला आहे. आपण घर जरी सुरक्षितेसाठी ठिकाण म्हटलं तरी तुलनात्मक पातळीवर पाहता आदिवासी समाजात म्हटलं जातं की स्त्री-पुरूषात समानता आहे. व्यापक समाजाकडे पाहता नक्कीच सोबत राहतात. कामं करतात. बाजारपेठेत जातात. हे सगळं खरं असलं तरी, आज कर्जतसारख्या ठिकाणी आदिवासी पातळीवर घरात मोठ्या प्रमाणात मारहाणीचे प्रकार आता पुढे आले आहेत. मारहाणी, पिऊन मारहाण करणं हा प्रकार डोकेफोडीपर्यंत जातो. मग आपल्या घरात असो, जंगलात असो अशा पद्धतीचे मारहाणीचे प्रमाण हा प्रश्न आमच्या समोर आलेला आहे नवरा-बायकोच्या संबंधात. आपण जर बघितलं जन्मतःच मुलीबद्दल तर आदिवासी समाजात हा जो भक्कम पुरूष प्रधान व्यवस्थेचा प्रभाव आहे. नक्कीच त्यांना

वाटतं की मुलगा व्हावा. मुलगी झाली तर फारच तिचा धिक्कार वगैरे होणार नाही, पण तरी सुद्धा ती काही आपली नाही, तिला शिकवलं पाहिजे असं काही नाही. व्यापक नसलं, तरी मुलगा व मुलगीची तुलना आपण पाहता आजही मुलीकडे त्या पातळीवर दुर्लक्ष करणे वगैरे तर होतेच; तेवढंच नसून आरोग्याच्या दृष्टीने सुद्धा मुलगी आजारी पडली तर फार तिच्याकडे लक्ष देत नाही. आणि जेवणाच्या पातळीवर सुद्धा ती थोडी चार- पाच वर्षांची झाली की तिला बाळगी आणि इतर जबाबदाऱ्या पडतातच. अगदी पाणी आणण्यापासूनच. त्यामुळे तिची एकंदरीत वाढ हा जो प्रकार आहे, त्या पातळीवर ती खुंटते आणि अलिकडच्या काळात आदिवासी मुलींचे आश्रमशाळेत मुलींना पाठविण्याचं प्रमाण हे वाढल होतं.

पण गेल्या पाच वर्षात इतक्या मोठ्या पातळीवर कुमारी मातांचं प्रमाण आदिवासी मुलींत निर्माण झाल्यामुळे आज जर पाहिलं तर गेल्या दोन वर्षात मोठ्या प्रमाणात आदिवासी मुलींचे ८ वी नंतर गळतीचं प्रमाण आहे. ७ वी नंतर मुलींना काढून घेतल जातं. मग घरात ठेवून तिचं काय करायचं म्हणून सर्रास तिचा विवाह केला जातो. म्हणजे आदिवासी मुलींचा विवाह मोठ्या पातळीवर चौदा-पंधरा वर्षात आता सुरूवात झाली आहे. आणि त्याचा परिणाम फार जवळून पाहिला आहे. अनेक बाळंतपणाच्या काळात मृत्यूचे प्रमाण वाढलं आहे. तीस-पस्तीस वयोगट झाला की अगदी शारीरिकदृष्ट्या तिची कुवत कमी होत चालली आहे, ही एक आमच्यासमोर फार मोठी गोष्ट दिसून आली. दुसऱ्या बाजूला घराच्या पातळीवर पाहता अलीकडच्या काळात अशा पद्धत्तीच्या केसेस आलेल्या आहेत की क्रूर हत्यांचा प्रकार हा आदिवासींच्या घरात, विशेष करून आम्हाला कातकरी आणि ठाकरांमध्ये सापडला. एके काळात कातकरी समाजामध्ये खूप समानता होती. पण अलिकडे कातकरी महिलांचे खून कुटुंबाच्या पातळीवर होणं सर्रास झालं आहे. एक केस अशी होती की, नवरा ५० वर्षांचा व बायको ४५ वर्षांची होती. त्यांचं दिवसभर भांडण झालं आणि संध्याकाळी त्याने पूर्णतः तिला चेचून खलास केलं. योनीमार्गाला चेचलं गेलं. तिच्या बांगड्या होत्या त्या चेचून चूर चूर करून त्या योनीमार्गात भरल्या. म्हणजे अशा पद्धतीची क्रूर हत्या. आणि तिला जंगलात फेकलं गेलं होतं.

अशा पद्धतीच्या हत्या एका तालुक्यात, सहा महिन्याच्या काळात आम्हाला तीन-चार केसेस सापडल्या. अशा पद्धतीची दुसरी केस अशी होती की दीर-भाऊ-नवरा सगळ्यांनी मिळून तिला इतकी मारहाण केली ती तिचा हा जबडा पूर्णपणे डिस्लोकेट झाला होता. नाक पूर्णपणे स्लॅश झालं होतं. तिचे हातपाय सगळे मोडले होते. ती फक्त एकच दिवस जगली. अशा पद्धतीनी क्रूर हत्या करणे हे सुद्धा आरोग्याच्या पातळीवर प्रश्न पुढे येत आहे. त्याचप्रमाणे आदिवासी समाजामध्ये मोठ्या पातळीवर कमी आहेच, पण तरीसुद्धा आदिवासी स्त्रीचं जास्ती प्रमाणात कुपोषण, म्हणजे शिळं पाकं खाणं, कमी अन्न मिळणं, शेवटी जेवणं हा प्रकार सुद्धा आदिवासी समाजात आहेच.

अजून एक भाग आहे, जो मोठा प्रश्न म्हणून पुढे येतोय, तो म्हणजे आदिवासी समाजामध्ये मूल न होणं, वांझपणा. आरोग्य सेवेची परिस्थिती आपण पहिली की आरोग्य सेवाच तिथे काही राहिलेली नाही, सरकारी पातळीवर. पारंपरिक पातळीवर काही प्रयत्न आहेत ते अपुरे आहेत. त्यामुळे सुद्धा कुठल्याही परिस्थितीत तिला पर्याय नाही. परिस्थितीची ती बळी पडते. सामाजिक दृष्ट्याही तिला कुठल्याही प्रकारचं सुख नाही. वांझ राहण्यामुळे तिला कुंचबना आणि टोमणे हे आदिवासी समाजात सुद्धा आहे. असं म्हणून चालणार नाही की, सगळं काही ठीकठाक चालू आहे, तर ते आहेच आहे.

तेवढंच नसून दुसरी बायको करणं, मग तणाव निर्माण होणं. आणि मग त्यातून तिला एकटेपणा वगैरे पुढं येणं त्या पद्धतीचे प्रॉब्लेम आमच्या आदिवासी समाजात सुद्धा आम्हाला मोठ्या प्रमाणात मिळतात.

एकंदरीत आरोग्याच्या पातळीत पाहता प्रोटीन आणि कॅल्शियम डेफिशियन्सी ही मोठ्या प्रमाणात आहे. कुटुंब नियोजन हे तरूण व आत्ताच्या जोडप्यांमध्ये थोडं बहुत प्रचलित होत चाललं आहे. म्हणजे २०-२५ वयोगटाच्या मुलींमध्ये स्वतःहून एक-दोन बस, अशा पद्धतीचे आणि स्वतःहूनच, कोणी बोलायची गरज नाही प्रचाराची गरज नाही. पण थोडी त्यापेक्षा पलिकडच्या मोठ्या काळात रीपीटेड प्रेगनन्सीज सतत मिस कॅरिजेस होणं हा प्रकार तर आहेच. आदिवासी समाजात स्त्रीचं सगळं अंगावर घेण्यातच जातं. कारण परिस्थितीच तशी आहे.

आर्थिक दारिद्र्य आहेच, आरोग्य सेवा नाही, आणि मग ती एक स्त्री आहे, व्यापक समाजाचा प्रभाव होतोच. कारण आज तिच्या मुलांवर व्यापक हिंदू संस्कृतीचा प्रभाव आहे. तिथे इतर समाजाचे शिक्षक आले आहेत. आज तिची मुलं शिक्षक होतात. सरकार दरबारी जातात व्यवहार करतात. त्यामुळे त्यांना वाटतं की अमूक कपडे घालू नयेत, असं वागू नये अशा पद्धतीचा देखील प्रभाव तिथे पडत असताना ती एकंदरीत स्त्री त्यागी याप्रकारचं मूल्य फार महत्त्वाचं आहे आणि ते ती परिस्थितीच असल्यामुळे सगळं सहन करीत असते. या परिस्थितीमध्ये प्रोटीन व कॅल्शियम डेफिशिअन्सीबरोबरच दुसरा जो प्रश्न आहे, तो म्हणजे 'ॲनिमिया'. हा मोठ्या प्रमाणात आहे. तो फक्त गरोदर स्त्रिया, बाळंतपणातल्या स्त्रिया एवढ्यापुरताच नसून अगदी जन्मापासून म्हातारपणापर्यंतच्या आदिवासी स्त्रियांमध्ये 'ॲनिमिया' प्रकर्षाने मोठ्या प्रमाणात दिसून येतो. त्यांची नखे उलटी होणे, चमच्यासारख्या त्यांचा आकार होणं हे आदिवासी स्त्रियांमध्ये अधिक प्रमाणात सापडतात. दुसरं म्हणजे ही आदिवासी स्त्री कामाच्या निमित्ताने बाहेर पडते, म्हणजे ती स्थलांतर होते, विशेषकरून कातकरी, ठाकर समाजातल्या स्त्रिया मोठ्या प्रमाणात वीट भट्टीवर, बांधकामाच्या ठिकाणी जात असतात. आपल्याला सर्वांना माहीत आहे की, जास्तीत जास्त त्रास या स्त्रियांना होत असतो. एका बाजूला मानसिक कुचंबणा तिची मोठ्या प्रमाणात होते.

कारण स्थलांतराच्या ज्या ठिकाणी ते राहतात, तिथे त्यांना इतर समाजाकडून त्या स्त्रीला मोठ्या प्रमाणात तोंड द्यावं लागतं. स्थलांतराच्या ठिकाणी पाणी, फाटी आणण्यासाठी भयंकर त्रास सहन करावा लागतो. याशिवाय वीटभट्टी मालकांकडून किंवा कामाच्या ठिकाणी असणाऱ्या मालकांकडून बलात्काराचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. अशा केसेस आढळून आल्या आहेत. एक स्त्री तर रत्नागिरीच्या शेवटी उरण येथून रात्रभर पळत ती निघून आल्याचे उदाहरण आहे. कारण तिला ती कुचंबना सहन झाली नाही.

आणखी एक प्रश्न मजुरीच्या पातळीवरचा. आदिवासींना मोठ्या प्रमाणात मजुरी करावी लागते. आदिवासी भागात विशेष करून रायगडच्या, ठाण्याच्या आदिवासी भागात पाहिले, तर farm house निर्माण झालेले आहेत. शहरातले उच्च मध्यम वर्गीय, श्रीमंत वर्गातले काही लोक शनिवार रविवार च्या मौजमजेसाठी त्यांनी फॉर्महाऊस बनवले आहेत. अशा ठिकाणी आपल्या आदिवासी स्त्रिया मोठ्या प्रमाणात मजुरी करतात. काही ठिकाणी केअर टेकर म्हणून त्या नवऱ्याबरोबर राहतात. आणि काही ठिकाणी मजुरीला पण असतात, मजुरीला असणाऱ्यांना तेवढा मोठा परिणाम नाही. पण जास्त करून ज्या सोबत राहून आहेत त्या स्त्रियांना मोठ्या प्रमाणात त्रास आहे. आणि अलिकडे त्याचा पद्धतशीरपणे अभ्यास झालेला नाही. पण AIDS च्या

प्रकाराच्या केसेस पुढे आलेल्या आहेत. याच्यातून आणखी एक प्रश्न निर्माण होतो, तो म्हणजे सरकारचे विकास प्रकल्प. त्यातून विस्थापित आदिवासींची संख्या वाढली आहे. व त्यात मुख्यतः आदिवासी स्त्रीच अधिक भरडली जातेय. पाण्यासाठी तिची व्यवस्थित सोय नाही. पुनर्वसनाच्या वसाहतींमध्ये फार वाईट परिस्थिती आहे. गरोदर स्त्रिया, ओल्या बाळंतीणी चिखल तुडवताना दिसतात, हे आर्थिक दारिद्र्याचं उदाहरण. अशावेळी शारीरिक कष्टाचं काम असेल तर ते स्त्रीकडे दिले जाते, असे प्रकार आम्हाला वीटभट्टीच्या कामात दिसतात.

सरकारी धोरणाच्या पातळीवर, जंगलांच्या विस्थापनामुळे काही प्रश्न निर्माण झालेत. जंगल जेव्हा अफाट होतं तेव्हा १३-१४ प्रकारचा भाज्या आम्हाला मिळायच्या. सहजतेनं खायला मिळायचं. वर्षभर काही ना काही फळे असायची. आता करवंद, जांभळं आणायला बरोबर भाकर घेऊन जावं लागतं. कारण ती झाडे, जाळ्या खूप लांब गेलेलं आहे. तिथपर्यंत जाणं, शिड्या लावणं, मग ते बाजारपेठेला नेणं यात बराच वेळ व कष्ट करावे लागतात. दुसरं म्हणजे वनखात्यांनी विनाकारण त्रास देणं ही वृत्ती आदिवासी स्त्रीला त्रासदायक ठरते. तिथे पुरूषांना फार वाईट वागणूक मिळते म्हणून त्यांना तोंड देण्याचं काम स्त्रियांना करावं लागतंय. एकीकडे वनखात्याने ग्रामवने हडप केली आहेत. त्यामुळे लांब जंगलात गेलेल्या स्त्रियांना वनकर्मचाऱ्यांकडून लैंगिक छळ सहन करावा लागतो. जिथे संघटित ताकद आहे तिथे ते घाबरून आहेत. म्हणजे कामाच्या ठिकाणी व विविध सरकारी यंत्रणेच्या पातळीवर सुद्धा, मग पोलिस, जंगलखाते, औषधी वनस्पती, ग्रामसेवक पातळीवर सुद्धा आदिवासी स्त्रीला लैंगिक छळाचे प्रकार अधिक आहेत. त्यात ती गरीब, वांझ, विधवा स्त्री असेल तर अधिकच त्रास होतो. शासकीय यंत्रणेचे आणखी एक उदाहरण म्हणजे ग्रामीण रूग्णालयाची सोय व सर्व सुविधा असून सुद्धा व गर्भपाताचा कायदा असूनही सरकारी डॉक्टर गर्भपात करून देत नाही. उलट तीच यंत्रणा वापरून तो खाजगीत गर्भपात करून देईल. तो त्या स्त्रीवर सामाजिक दबाव आणून असे प्रकार घडतात. अशा प्रकारांमुळे आज कुमारी माता दगावल्यांची उदाहरणे आमच्याकडे आलेली आहेत. तेवढेच नाही, तर विधवा गरोदर झाल्या किंवा कुमारी माता झाल्या तर आदिवासी जातपंचायत त्यांची गय करत नाही. अशा स्त्रियांना या गोष्टी ४-५ महिन्यांनी कळायला लागतात. कारण पाळी दरमहिन्याला येईलच याची काही खात्री नसते. आणि अचानक माहीत पडले तर जवळपास कुठल्याही प्रकारच्या आरोग्याच्या सोयीसुविधा नसतात.

अशावेळी समाज तिचा विचार करत नाही आणि ती सुद्धा मानसिकदृष्ट्या स्वतःचा छळ करून घेत असते. यातूनच आत्महत्येचे प्रमाण पुढे येत आहे. किंवा मग मिरची योनीमार्गात टाकणे, लांबट वांगी घेऊन ट्रीक करण्याचा प्रयत्न करणं अशा वेगवेगळ्या क्रूर पद्धतीने त्या ते पाडण्याचा प्रयत्न करतात. कच्च्या पपया खाणं हे आपल्या सर्वांना माहीत आहे, पण मोठ्या पातळीवर ते अगदी Direct attact कसा करता येईल ते त्या पाहतात. याची चळवळ कशी उभारता येईल हे आपल्याला पाहता येईल. कारण यात एकट्या स्त्रीलाच जबाबदार धरलं जातं. तिच्या आईबापाला दंड लावला जातो. जातपंचायतीच्या दहशतीमुळे १४-१५ वर्षांच्या मुली आत्महत्या करताना दिसतात.

दुसरं असं की बिगर आदिवासी समाजाचा आदिवासी स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन खूपच वाईट आहे. विशेष करून त्या ठिकाणी राहणारे आग्री, मराठा व इतर व्यापारी वर्ग आहेच. पण इथल्या पातळीवर सुद्धा अत्यंत क्रूर पद्धतीने सामूहिक बलात्कार करणे, विशेषतः ३५-४० शीच्या स्त्रीवर सामूहिक

बलात्कार करून तिचा खून करणे, व उलट त्या गावावर दडपण आणणे असले प्रकार चालू आहेत. यात पोलिस, कोर्टकेस वगैरे दडपल्या जातात. तिचे भाऊ मुकाटपणे तिचा क्रियाकर्म करतात. इतर समाजाला आदिवासी स्त्री आपलीच मालमत्ता वाटत असते. ही परिस्थिती अधिक फोफावत चाललीय. फार्म हाऊसेसमध्ये या मुलींना आकर्षित केलं जातं. कारण आर्थिक परिस्थिती फार बिघडत चालली आहे.

जातीच्या पंचायतीमध्ये आदिवासी स्त्रीची अस्मिता बिल्कुल बघितली जात नाही. उलट तिचा लिलाव केला जातो, तिची धिंड काढली जाते. तिची मानहानी केली जाते, विशेषतः ती विधवा आणि गरोदर असेल, कुमारी गरोदर असेल तर. आता तर आदिवासी जातपंचायतीमध्ये आग्री न्यायनिवाडे करायला लागलेत. पुरूषाला पैसे भरून बाहेर पडता येतं पण स्त्रीला शिक्षा सहन करावी लागते. यात कोणीही मध्ये बोलत नाही. सरकार यात काही हस्तक्षेप करत नाही. भुताळी किंवा चेटकिणीच्या नावाखाली भयंकर वातावरण तयार करून स्त्रियांना मजबूत मारण्याचे प्रकारही व्हायला लागलेत.

इथे मी आदिवासी समाज, बाहेरचा समाज आदिवासी स्त्रीकडे कोणत्या दृष्टिकोनातून पाहतो. सरकारी यंत्रणा कशी पाहाते व स्वतः आदिवासी स्त्रीला स्वतःविषयीचा दृष्टिकोन काय आहे हे इथे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. यातून आरोग्याचा विचार करत असताना आदिवासी समाजाच्या आरोग्याचा मुख्य आधार आम्हाला आदिवासी स्त्रीच दिसते. कारण तिला व्यवस्थित प्रशिक्षित केलं की पूर्णपणे ते पचविण्याची तिच्यात ताकद आहे. ती अतिशय मजबूत स्त्री आहे. आणि दुसरं म्हणजे केवळ आजारी स्त्रियांना ॲनिमियाचे औषधोपचार न करता बाकीच्या स्त्रियांना देखील असे उपचार केले पाहिजेत.

पुरूष समाजाची मानसिकता ही व्यवस्थेतून तयार झालेली आहे आणि ती स्त्रीमध्ये सुद्धा आहे. म्हणून स्त्रीच स्त्रीची शत्रू असे म्हटले जाते, ते खरे नसून ती एक मानसिकता आहे आणि सगळ्या व्यवस्थेत ती पसरलेली आहे. म्हणून आम्ही जातपंचायतीतले सदस्य, पोलिस, महसूलयंत्रणा, वैद्यकीय क्षेत्राला देखील बरोबर घेऊन ही मानसिकता बदलण्याचा प्रयत्न चालू आहे. ■■

## लेखकांसाठी

'हाकारा' त्रैमासिक गेली २२ वर्षे अखंडपणे काढण्यात येत आहे. कै. प्रा. गं. बा. सरदार यांच्या प्रेरणेने सुरू झालेले 'हाकारा' हे मराठी भाषेतील आदिवासी व वंचित समूहांच्या प्रश्नांना वाहिलेले एकमेव नियतकालिक आहे.

हाकारामधून आदिवासी, वंचित समुहांचे जीवन, संस्कृती, साहित्य, सण, उत्सव, कला, विकासाचे प्रश्न तसेच आदिवासी व वंचित समुहांमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे अनुभव, संशोधन सेवाभावी व्यक्तींची व्यक्तीचित्रणे याशिवाय आदिवासींसंबंधीच्या कथा, कविता वगैरे सर्व प्रकारच्या लेखनांस प्रसिध्दी दिली जाईल. आदिवासी विचारवंत व साहित्यिकांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून द्यावे हेच आमचे ध्येय आहे. आपण आपले साहित्य अवश्य पाठवावे त्याचे स्वागतच होईल.

# भटक्या विमुक्तांचे प्रश्न

## चर्चासत्राचा अहवाल

**या चर्चासत्रासाठी श्री. व्यंकटराव अवधूत हे अध्यक्ष होते. श्री. बाळकृष्ण रेणके आणि श्री. गिरीश प्रभुणे हे प्रमुख वक्ते या विषयावरील चर्चेत सहभागी झाले होते. अध्यक्षीय भाषणात भटक्या आणि विमुक्त समाजाचे सामाजिक प्रश्न विचारात घेण्यात आले.**

भटके आणि विमुक्त मुळात स्थिर नाहीत. त्यामुळे त्यांचे घर नसते. मुलांना शाळेत घालायचे असले तरी नक्की कोठे आणि कोणत्या शाळेत घालायचे हा प्रश्न असतो. त्यांचे पुनर्वसन करायचे तरी ते कसे करावे? शासनाच्या योजना या आदिवासींसाठी आहेत; पण भटक्यांना त्या लागू पडत नाहीत. जनगणना करतानाही त्यांच्या लोकसंख्येचा नक्की अंदाज करता येत नाही. अशा परिस्थितीत निधीबाबतही समस्या निर्माण होतात. एस.सी., एस.टी., ओ.बी.सी. यांच्यासाठी असलेल्या योजना, मंडल आयोगाच्या शिफारशी तसेच शैक्षणिक विकासाच्या योजना भटक्यांसाठी उपयोगी पडत नाहीत. एखादे गाव विकासासाठी ठरवून घ्यावे तर अमूक एका भटक्या जमातीसाठी एखादे गाव तरी नक्की कसे काय करणार?

इतकेच कशाला तर या भटक्या आणि विमुक्त समाजातही परत जाती-जमाती, पोटजाती आहेत. पारधी म्हटले तरी फासे पारधी, गाय पारधी शिवाय डोंबारी, जोशी, पोपटवाले, नंदीवाला गोंधळी आणि अशा कितीतरी जमाती आहेत. या जमाती संघटित नाहीत. यांच्यामध्ये कार्यकर्त्यांचे गट नाहीत. एखाद्या योजनेतून सहाय्य मिळवायचे असेल तर अगदी प्राथमिक गोष्ट म्हणजे जातीचा दाखला हवा; परंतु यांच्या राहण्याचे ठिकाण ठरलेले नाही. यांच्या नावाची नोंद नाही, तर जातीचा दाखला मिळणार कोठून? एखाद्या गुन्ह्यामध्ये पकडलेली व्यक्ती तुरूंगातून सुटल्यावर आपल्या कुटुंबापर्यंत पोहोचणेही अवघड असते. या सर्व पार्श्वभूमीवर या लोकांना संघटित करून काही प्रयत्न करणे, चळवळ उभारणे दुरापस्त आहे. महिलांवर अत्याचार झाल्यास मेडिकल रिपोर्ट किंवा वैद्यकिय तपासणीसाठीही महिला पुढे येत नाहीत. यासाठी भटक्या-विमुक्तांचे पुनर्वसन होणे गरजेचे आहे. पुनर्वसन करण्यासाठी मुख्यमंत्र्यांचे लेखी आदेश असूनही प्रत्यक्ष पुनर्वसन होऊ शकलेले नाही. भटक्या विमुक्त समाजाचे पुनर्वसन करण्यासाठी जे विविध कार्यक्रम राबविले आहेत, त्याचीही माहिती या ठिकाणी श्री. प्रभुणे यांनी दिली.

रोजगाराभिमुख कामाचे प्रशिक्षण देऊन समाजोन्नती करता यावी म्हणून दररोज एक तासाचे प्रशिक्षण देण्याचा उपक्रम या समाजात सलग तीन महिने राबविण्यात आला. त्याप्रमाणे या समाजातील स्त्रियांना कडुलिंबाच्या लिंबोळ्या जमवून त्या बाजारात विकण्याचे प्रतिकिलो दोन रूपये प्रमाणे पैसे देऊन त्यांना आर्थिक आधार देण्यात आला. तसेच काही ठिकाणी महिला विकास गट, बचत गट स्थापन करून त्यांचे पुनर्वसन करण्याचा प्रयत्न करण्यात आला. दुसऱ्या एका प्रयत्नात भटक्या आणि विमुक्त जमातींची दारिद्र्य रेषेखाली नोंद करून, त्यांच्या कुटुंबांची रोजगार हमी योजनेसाठी नावे काढली, कामेही मिळवून दिली; परंतु आतील काही कामे दीडशे किमी अंतरावर मिळाली,

त्यामुळे सहभाग मिळण्यात अडचणी येतात. यातील काही समाजांचा व्यवसाय दारू गाळण्याचा आहे. याला प्रतिष्ठा नाही; परंतु या कामासाठी निदान ही मंडळी स्थिर होत आहेत म्हणून त्यांना दारू गाळण्याचा परवाना मिळवून देण्यात आला. मुलांना शाळेत जाता यावे यासाठी शाळेजवळच वसतिगृहांची सोय केली. महिलांना उत्पन्नाचे साधन मिळावे म्हणून त्यांना गोधडी शिवण्याची कला शिकवली, तयार होणाऱ्या गोधड्या बाजारात नेऊन विकून दिल्या. पन्नास प्रकारच्या शबनमचे प्रकार तयार करून घेतले. अशाप्रकारे भटक्या समाजांनी स्थिर होऊन त्यांच्या पुनर्वसनासाठी आणि आर्थिक स्थैर्यासाठी करण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती देण्यात आली.

यानंतर श्री. बाळकृष्ण रेणके यांनी भटक्या विमुक्तांच्या समस्यांचा परामर्श घेतला. त्यांच्या मते भटक्या विमुक्तांच्या दोन शाखा आहेत. यातील पहिला गट हा करमणूक करणाऱ्या भटक्यांचा आहे. ज्यात नंदीवाला, पोपटवाला, जोशी ही मंडळी येतात. समोरच्या माणसांकडून पैसे काढण्याची कला यांना चांगली अवगत असते; परंतु हे लोक स्वभावतः लाजाळू आहेत आणि लाचारी त्यांच्या अंगात भिनली आहे. याउलट काही विमुक्त समाज हे बेडर, रागीट आणि ताकदवान आहेत. ते लोक नाईलाजाने, परिस्थितीमुळे किंवा परंपरेने गुन्हे करतात. यांचे गुन्हेही किरकोळ स्वरूपाचे असतात; परंतु गुन्हेगारी समाजाचा शिक्का त्यांच्यावर कायमस्वरूपी बसलेला असतो. त्यापासून दूर करून त्यांना काही मदत करावी तर दारिद्र्यरेषेचा मुद्दा महत्वाचा ठरतो. शिवाय सलग तीन वर्षे या रेषेखाली उत्पन्न राहिले तरच दारिद्र्य रेषेखालील यादीत नाव येते. या सर्वांवर व्यापक चर्चा झाली असली तरी प्रश्नांचे स्वरूपही गुंतादायक आहे. शेतीचा विकास आणि पाणी-पुरवठा योजनांसाठी देशात मोठ्या प्रमाणावर धरणे बांधली गेली. धरणांमुळे नदीचे पाणी साठले, पाणी पुरवठ्यात सुधारणा झाली हे ठीक झाले; परंतु त्याचा दुष्परिणाम भटक्यांच्या उत्पन्नावर झाला. कारण धरणातील पाणीपुरवठा, त्यातील मच्छीमारी यासाठी परवाना पद्धत आली. सरकारी मंडळांचे नियंत्रण आले. साहजिकच नदीच्या नैसर्गिक पाण्यातील मासे पकडून उपजिविका करण्यावरच निर्बंध आले. तसेच सामाजिक वनीकरण, अभयारण्य, संरक्षित जंगले यासारख्या उपाययोजना सुद्धा भटक्याविमुक्तांसाठी हानीकारकच आहेत.

कारण जंगलातून संपत्ती जमा करून उदरनिर्वाह करणाऱ्या समाजांच्या पारंपरिक अधिकारावर नवीन जंगलविषयक कायद्यामुळे गदा आली. विकासाच्या योजना सरकार राबवते; परंतु त्यात माणसाचा विचार होत नसल्याची खंत श्री. रेणके यांनी बोलून दाखवली. त्यांच्यामते या गरीब समाजाचे सरपण कायद्याने हिरावून घेतले. गायी-म्हशींचा चारा सामाजिक वनीकरणाने काढून घेतला. त्यामुळे चोरीमारी किंवा भिक्षा मागणे याशिवाय या मंडळींना पर्यायच नाही. आणि या सर्व कुचंबणेला कारण आजची कायदे व्यवस्था आहे. यासाठी नव्या शतकात जाताना पाणी, चारा, अन्न, निवारा यासाठी जोरदार धोरण राबवायला हवे. शिक्षण-प्रसार व्हायला हवा; परंतु बेकार आणि नोकर बनविणारे शिक्षण नसावे. त्यांची मानसिकता बदलायला हवी. या समाजाला त्यांच्या हक्काची जाणीव व्हायला हवी. यांना नोकरी अथवा उद्योग झाला तरी तो स्थिरच असावा. त्यांना निवाऱ्यासाठी किमान एक गुंठा तरी जमीन हवी. आसपासच्या जंगलातून सरपण आणि उपजीविकेचे साधन मिळायलाच हवे. जर विकास विकास म्हणून त्यांचा उद्धार व्हायलाच हवा असेल तर त्यांच्या पारंपरिक हक्कांवर गदा यायला नको, नाहीतर पाणलोट विकास, फळबागा विकास हे सर्व प्रकल्प खोटे आहेत.

(पृष्ठ ५६ वर)

# ‘अस्मिता व विकास’
# चर्चासत्रांचा आढावा व समारोप

मिलिंद बोकील

**आदिवासी व उपेक्षित समाजाचं अस्तित्वच मुळात टिकणार आहे की नाही? म्हणजे हा बाकीचा समाज आणि ही विकासाची प्रक्रिया जिवंत राहूच देणार आहे की नाही हा सगळ्यात पहिला मूलभूत प्रश्न.**

अस्मितेचे दोन भाग - सांस्कृतिक व लौकिक. लोकिक म्हणजे प्रत्यक्षातला अस्तित्वाशी संबंधित भाग. ज्या भूमीवर आज आदिवासी उभे आहेत ती भूमीच त्यांच्या पायाखालून काढून घेण्याचा उद्योग सध्या चालू आहे. याचे दोन प्रकार आहेत. पहिला म्हणजे आदिवासींच्या जमिनींचे न सुटलेले प्रश्न. उदा. दळी जमीन, एक साली जमीन, कुळकायद्याखालची जमीन, कमाल जमीन हक्का खालची हे सर्व प्रश्न आज प्रलंबित आहेत. आणि दुसरा प्रकार, जी जमीन त्यांच्याकडे आहे, ज्या जमिनीवर ते आज उभे आहेत ती जमीन सुद्धा निरनिराळ्या विकास कामांकरिता काढून घेतली जात आहे. याबाबतीत सरकारची भूमिका मात्र अत्यंत निर्दयी, बेफिकीर व उर्मट अशी राहिलेली आहे. म्हणजे जे हक्काचं आहे ते सुद्धा त्यांना मिळत नाही आणि नवीन हक्क देत नाहीत. या सगळ्या प्रश्नांवर लढता-लढता सर्व कार्यकर्ते पिचून गेलेत.

हा जमिनीचा प्रश्न भटक्या - विमुक्तांच्या बाबतीत तर आणखीन गंभीर आहे. त्यांची मागणी केवळ एक गुंठा जमिनीची आहे, जी त्यांना घरासाठी हवी आहे. आणि भटक्या-विमुक्तांची संख्या पाहता ती मागणी पूर्ण करणे सरकारला अजिबात अवघड नाही. पण ती सुद्धा सरकारच्या नवीन धोरणात पूर्ण होत नाही.

जमिनीच्या प्रश्नामुळेच जमिनीवर आधारीत तंत्रज्ञानाचे प्रश्न निर्माण होतात. आज आदिवासींकडे सर्व प्रकारचं कौशल्य आहे. ते फळबागा पिकवतील, भाजीपाला लावतील, पण हे सगळं करण्याकरिता जमीन आपल्या मालकीची, हक्काची पाहिजे. (एककल्पवृक्ष - हाकारा विशेषांक पहा) जोपर्यंत त्या मालकीच्या होत नाहीत तोपर्यंत सगळ्या तंत्रज्ञानाला मर्यादीतच अर्थ आहे. याचा अर्थ अशातऱ्हेचे उत्पादन करायचं नाही असा होत नाही. ज्यांच्याकडे जमीन आहे, साधनं आहेत त्यांनी ते अधिक उपजावू कसे करता येतील याचे प्रयोग अनेक होताहेत. आणि बायफ' ने अतिशय व्यापक क्षेत्रावर ते करून दाखवलं आहे. ते समजून घ्यावंच, त्याचबरोबर जमीन आपल्या मालकीची झाली तरच हे प्रयोग अधिक यशस्वी होतील हेही लक्षात घ्यावे.

हाच प्रश्न जैविक विविधता आणि औषधी वनस्पती यांच्या बाबतीत येतो. जैविक विविधता जपायची म्हटली तरी जमीन वनखात्याच्या मालकीची. त्या जमिनीतून काहीही घेण्याची परवानगी आदिवासींना नाही. त्यामुळे तो कसा जपणार ही जैविक विविधता. याच्यातून इतर प्रश्न तयार होतात. औषधी वनस्पती ज्या क्षेत्रावर आहे त्या सर्व साधनसंपत्तीवर आदिवासींची मालकी नाहीये. त्यामुळे वैश्विक, बौद्धीक किंवा स्वामित्वाचे प्रश्न सोडविण्याचे मार्ग अधिकाधिक बिकट होत जातात. हे प्रश्न म्हणून मान्य आहेत. पण ते सोडविण्याचे मार्ग बंद आहेत.

या सर्वांतून जी दिशा दिसती आहे आपल्या सर्वांना, ती अशी की जंगल, जमीन, पाणी, झाडे या संसाधनांच्या मालकी संदर्भात कार्यकर्ते आणि अभ्यासक यांच्यासमोर दोन दिशा दिसतात. कार्यकर्त्यांसमोर अशी दिशा दिसते आहे की, जे जे काही जुने हक्क आहेत ते सोडायचे नाही, ही पहिली मुख्य दिशा. दुसरं म्हणजे नवीन हक्क मिळवत राहायचे आणि तिसरे, त्याची उत्पादकता वाढवत राहायची. म्हणजेच जुन्या हक्कांसाठी संघर्ष करायचा, जे पदरात पडतंय ते मिळवून आणखीन मिळविण्यासाठी झगडत राहायचं आणि त्या साधनांची उत्पादकता वाढवत राहायची.

पण अभ्यासकांच्या पातळीवरचे प्रश्न अधिक गंभीर व मूलभूत स्वरूपाचे आहेत. ते असे आहेत की, ही जी प्रक्रिया चालू आहे, ती प्रक्रिया चालविण्याचा अधिकारच मुळात कोणी दिला? म्हणजे सरकार माझी जमीन घेतं, तर ती घेण्याचा अधिकारच सरकारला कोणी दिला. सरकार असं समजतं की तुमची जमीन घेण्याचा अधिकार आम्हाला जन्मजात आहे. आणि तो अधिकार आम्ही मान्य केलाय. पण खरोखरच जरूरी आहे का असं? मग सरकार श्रेष्ठ का लोक श्रेष्ठ आहेत हा मूलभूत प्रश्न आहे. या प्रश्नाचा उलगडा अभ्यासकांनी करायला पाहिजे. आणि त्या अनुषंगाने बनलेल्या कायद्यांची चिकित्सा करायला पुन्हा एकदा त्यांनी घेतली पाहिजे. याचं कारण, ही लढाई अत्यंत विषम प्रमाणाची आहे. सगळे जगाचे लोक यात उतरले आहेत.

आणि यामुळे सांस्कृतिक अस्मितेचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा होऊन बसला आहे. तो का असा झाला आहे, तर एका बाजूला आपण पूर्णपणे नाहीसे होऊ ही भीती आहे आणि दुसऱ्या बाजूला आपण आदिवासी किंवा एक उपेक्षित घटक म्हणून तसंच राहणे श्रेयस्कर आहे का? हा दुसरा प्रश्न. आज गोंड व भिल्ल हे दोन मोठे समाज आहेत, त्यांच्या दृष्टीने अस्मितेचा प्रश्न वेगळा आहे. ते ताठ मानेने सांगू शकतात की आम्हाला उज्ज्वल इतिहास होता, आमची लोकसंख्या एवढी आहे आणि आमच्या नावातच आमची अस्मिता आहे. पण जे कातकरी आहेत, जे दुबळा, माकडवाले, नंदी, बेलदार आहेत, असे जे छोटे-छोटे समाज आहेत त्यांचं काय? मग त्यांच्यापुढे एकच पर्याय राहतो एखाद्या मोठ्या समाजात मिसळून जाणं. त्यामुळे त्यांना आपली जात कोणती हे सांगण्याची गरज पडत नाही. तिथे मी एक नागरीक असतो. तिथे मला कोणी मसणजोगी, महारडाचा अशा जातीवाचक शिव्या देत नाही. आणि हाच अस्मितेचा खरा प्रश्न आहे. म्हणजे मी एका विशिष्ट गटाचा म्हणून जगायचं का या देशाचा नागरिक म्हणून? हा खरा अस्मितेचा प्रश्न आहे. आणि याचा उलगडा कार्यकर्त्यांनी करायचा आहे.

येथे आपण आंबेडकरांचे विचार लक्षात घेत नाही. त्यांनी सांगितल होतं की, तुम्हाला गावातली जी उपेक्षित स्वरूपाची बांधून टाकणारी कामे दिलेली आहेत, ती सोडा. आणि जोपर्यंत तुम्ही ती सोडत नाही, तोपर्यंत तुमचा उद्धार होऊ शकत नाही. तेव्हा, आंबेडकर असं का म्हणाले होते याचा विचार अस्मितेचा प्रश्न ज्यांना भेडसावतोय त्यांच्यासमोर ही दिशा उभी राहिलेली आहे.

अस्मितेशी संबंधितच भाषेचा प्रश्न आहे. आपल्या ज्या बोलीभाषा आहेत त्या कशा टिकवायच्या? याचं साधं सोपं उत्तर म्हणजे त्या भाषेच्या टेप्स काढायच्या, त्या लिहून ठेवायच्या वगैरे. याच्यापेक्षाही गहन प्रश्न असा आहे की, मराठीसारखी जी ८-९ कोटी लोकांची भाषा आहे, ती सुद्धा टिकते की नाही असा प्रश्न निर्माण झालाय. म्हणजे मराठीत बोलायला कोणी उभं राहिलं तर ५०% इंग्रजी शब्द बोलल्याशिवाय ते भाषण पुरे होत नाही. ही वस्तुस्थिती आहे. मग बोलीभाषा

बोलणाऱ्यांनी काय करावं? हा प्रश्न आहे. बोलीभाषा ही आपली स्वत्वाची भाषा आहे, तेव्हा ती टिकवून ठेवून आपण मराठी, इंग्रजी किंवा इतर कोणतीही भाषा कशी शिकत जाणार आहोत, ही दिशा आज आपल्यासमोर आहे. हा गुंतागुंतीचा प्रश्न असल्याने त्याला तितक्याच गंभीरपणे भिडायला पाहिजे.

आणि मग त्या अनुषंगाने भाषेशी संबंधित साहित्याचे प्रश्न निर्माण होतात. आदिवासी साहित्यासमोर केवळ साहित्याचे प्रश्न नाहीत, तर अस्मितेचे जे काही प्रश्न आहेत ते सुद्धा साहित्याशी संबंधित आहेत. याचं कारण असं की आदिवासी साहित्य स्वतःचे विशिष्ट दर्शन, विशिष्ट अविष्कार घेऊन पुढे येत आहे. पण तो अविष्कार समजून घेण्याची एक विशिष्ट पद्धती बाकीच्या समाजाने विकसीत केली पाहिजे. त्याचबरोबर अतिशय उच्च दर्जाचं साहित्य निर्माण करणं ही सुद्धा एक जबाबदारी आहे. आणि ते केवळ कविता, कथा यांमध्ये गुरफटून न राहता ते सर्वसमावेशक असावं. त्यासाठी त्यात वैचारिक व संशोधकीय साहित्याची भर पडायला पाहिजे.

म्हणजे मग त्यात आदिवासी लेखक, कवींनी शिक्षण पद्धतीबद्दल सुद्धा लिहिणे गरजेचे होते. आपल्या समाजाचा इतिहास ज्याचा त्यानेच लिहायला पाहिजे. अशा तऱ्हेचे प्रश्न जे साहित्याच्या माध्यमातून स्वतःला व्यक्त करताहेत त्यांच्यासाठी आहेत. हे साहित्य फुले - आंबेडकरांची प्रेरणा घेऊन आलेलं असलं तरी त्याचा खास 'आदिवासी' असा तोंडवळा आहे. साहित्य हे जीवनाला अधिक उदात्त, अधिक चांगलं बनवतं म्हणून ते बंधुभावाचं साहित्य आहे. म्हणून काही क्षुद्र वादविवादाचे अंतर्गत मतभेद बाजूला ठेवून सर्वांनी एकत्र येणं गरजेचं आहे. इतरांच्या समोर आपण जेव्हा आपल्यातल्या वादविवादांचं प्रदर्शन करतो तेव्हा आपण आपल्या साहित्याचीच अधिक हानी करतो हे त्यांनी लक्षात घ्यावं. एका बाजूने आपलं साहित्य उंच करत जाणं, दुसऱ्या भाषेशी आपलं नातं जोडत जाणं आणि बंधुभावाचा, मानवतेचा नवीन मार्ग त्यात दाखवणं अशी दिशा या साहित्याच्या माध्यमातून दिसते. आणि हे उद्दिष्ट साध्य करण्याकरिता शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही.

शिक्षणाच्या बाबतीत आज महाराष्ट्रातली ५० टक्के मुलं सातवीच्या पुढे जातच नाहीत. पुढे त्यांची गळतीच चालू होते. दहावी-बारावीचा निकाल फक्त ५०-५२ टक्केच लागतो. म्हणजे फारच थोडी मुले शिकतात हा शिक्षणाचा मूलभूत प्रश्न आहे. पण आदिवासी समाजात तो अधिक गंभीर बनत जातो. आणि तो सोडवण्यासाठी तो प्रश्न नाजूकपणे हाताळला पाहिजे. मुख्य मुद्दा असा आहे की, हे शिक्षण आदिवासी, वंचित किंवा उपेक्षित समाजाची ताकद वाढवणारं नाहीये. उलट ते त्या समाजाचं स्वत्व, आत्मभिमान खच्ची करणारे आहे. त्या समाजाला दुर्बल बनवणारं शिक्षण आहे. हिणकस पद्धतीच्या या शिक्षणामुळे समाजाचं शोषण आणखीनच वाढत आहे. त्यामुळे या समाजातल्या बेकार तरूणांची फौज अधिक हृदयद्रावक बनते.

मग यातून दिशा काय दिसते आहे, तर आता हे शिक्षण आपण आपल्या ताब्यात घेतलं पाहिजे. इतके दिवस दुसरे लोक देत होते. आणि त्यातूनच हे सगळे प्रश्न निर्माण झाले. याबाबतीत बाळ कोळेकरांचे प्रयत्न लक्षात घ्यावेत. आपला परिसर, आपली भूमी, आपली भाषा, आपला इतिहास हे समजून घेत घेत जेव्हा ते मूल वाढतं तेव्हा ते खऱ्या अर्थाने सामर्थ्यशाली होतं. म्हणून गावाने आपली शाळा आपल्या ताब्यात घेऊन आपल्याला पाहिजे तसं शिक्षण देणं, वेगवेगळे प्रयोग करणं ही शिक्षणासंबंधीची दिशा आपल्यासमोर आहे. खरेतर कार्यकर्ते इतर कार्यात गुंतल्यामुळे, संघर्षामुळे शिक्षणाकडे लक्ष देऊ शकले नाहीत. पण ही शिक्षण प्रक्रिया आपल्या ताब्यात घेण्यावाचून गत्यंतर नाही.

विशेषतः उपेक्षित समाजाने. आणि कार्यकर्ते व संस्थांनी वेगवेगळे प्रयोग, जे झालेले आहेत ते आत्मसात करावेत अशी दिशा या शिक्षणाच्या संबंधाने दिसते आहे. शिक्षणासोबतचा प्रश्न आरोग्याचा आहे. झालेल्या चर्चांतून असे दिसते की, आरोग्याचा कुठलाही प्रश्न हा शारीरिक निरोगीपणाचा नाही. हा मुद्दा सगळ्यांच्याच बाबतीत खरा आहे, पण आदिवासींच्या व उपेक्षितांच्या बाबतीत तो अधिक जास्त खरा आहे. याचं कारण असं की, त्यांचे आरोग्य त्यांच्या सभोवतालच्या परिस्थितीत गुंतलेलं आहे. म्हणजे जंगलतोड होणं, जमिनीची धूप होणं, पिण्याच्या पाण्याची टंचाई या गोष्टींमुळे आदिवासींच्या सबंध जीवनावर आणि पर्यायाने त्यांच्या आरोग्यावर परिणाम झालेला आहे. यावर केवळ डोस घेऊन किंवा औषधपाणी करून तो प्रश्न सुटणारा नाही. वरील सर्व प्रश्नच त्यांच्या सामाजिक परिस्थितीशी जोडलेले आहेत. स्त्री आणि आरोग्याच्या बाबतीतले प्रश्न हे लिंगभावाशी संबंधित आहेत. सुदैवाने आदिवासी समाजात स्त्रीचा दर्जा हा इतर समाजाच्या तुलनेने बरा आहे. अगदी उत्तम आहे असे नाही. पण तरीही त्या समाजातले लिंगभाव विषयक प्रश्न सोडवत सोडवत या आरोग्याच्या प्रश्नाकडे बघावे लागणार आहे. ■■

## 'हाकारा'च्या वाचक व लेखकांसाठी

इ. स. २००४ हे हाकारा'चे रौप्य-महोत्सवी वर्ष आहे. या वर्षातले सर्व अंक 'विशेषांक' स्वरूपाचे असणार आहेत. त्यादृष्टीने तयारी करून आपले अभ्यासपूर्ण लेखन 'हाकारा'साठी पाठवण्याची तसदी घ्यावी, ही विनंती.

संपादक

(पृष्ठ ५२ वरून)

यानंतर आपल्या अध्यक्षीय समारोपात श्री. व्यंकटराव अवधूत यांनी भटक्यांच्या प्रश्नांचा धांढावा घेताना, घटनेमध्येच भटक्या-विमुक्तांच्यासाठी योजना हव्यात हे नमूद केले. नियोजनाच्या क्षेत्रामध्ये या लोकांचा सहभाग हवा. यांच्या प्रश्नांची सोडवणूक होण्यासाठी नुसती महामंडळे करून भागणार नाही. महामंडळे तर आहेतच, पण निधीत वाढ व्हायला पाहिजे. लोकसंख्येच्या प्रमाणात निधी हवा. त्यांनी सांगितले की, या समाजाला नोकरीची संधी द्या म्हणजे चोऱ्या थांबतील. गुन्हेगारीचा बसलेला शिक्का काढून टाका. नुसते आरक्षण देऊन काम होणार नाही, तर गरज असल्यास घटनेत योग्य ती दुरूस्ती करण्याची मागणी त्यांनी केली.

दीर्घकाळ झालेल्या वक्त्यांच्या अनुभव कथनानंतर याविषयावर चर्चा सुरू झाली. प्रा. रा. के. मुटाटकर यांनी चर्चेला सुरूवात करताना सर्व उपस्थितांनी प्रथम एकत्र येण्याची गरज दाखवून दिली. सरकारी पातळीवर काम करताना निर्माण होणाऱ्या समस्या कशा असतात ते त्यांनी सांगितले. कमिशनच्या अहवालाशी राज्यसरकार सहमत हवे, त्यात पक्षीय राजकारण नको. अहवाल न्यायप्रविष्ट झाल्यास त्याचा गुंता कित्येक वर्षे तसाच राहतो, असे सांगताना खत्री कमिटी आणि हलबा आणि हलबा कोष्टी या आदिवासी कमिटीवर काम करताना आलेले अनुभव त्यांनी सांगितले. यानंतर प्रा. शरद कुलकर्णी यांनी जातीच्या दाखल्याचे महत्त्व सांगून ते मिळवण्यातील अडचणी दूर होण्याबद्दल सांगितले. प्रा.बोधनकर यांनी निधींच्या वापराबद्दल आणि सवलतींबद्दल सांगितले. अशाप्रकारे बऱ्याच विस्तृत प्रमाणावर या चर्चासत्रात चर्चा होऊन समारोप करण्यात आला.

■■

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे रौप्यमहोत्सवी संमेलन

**'दिशा २००१'**

## 'आदिवासी व उपेक्षित समाज : अस्मिता आणि विकास'

## उपस्थितांची यादी

सदानंद कारभारी एखांडे, नाशिक
यशवंत बाभरे, नाशिक
शांताराम भगत, वसई
डोंगर बागुल, नंदुरबार
शांतीलाल बनसोडे, नाशिक
मंगलदास महादू भवारी, अहमदनगर
चुनिलाल ब्राह्मणे, नंदुरबार
राजाराम चिकणे, सातारा
कृष्णकुमार चांदेकर, अमरावती
सक्रु जैतु दिघा, नाशिक
मारूती सखाराम डगले, नाशिक
लक्ष्मण जाधव, नाशिक
वसंत सोमा मौले, नाशिक
ढवळू लक्ष्मण महाले, नाशिक
अजाबराव अर्जुन मोरे, यवतमाळ
श्याम मुडे, बुलढाणा
रामकृष्ण माने, सोलापूर
शशीधर मुरकुटे, नागपूर
विरेंद्र मेश्राम, चंद्रपूर
ॲड. माधव बंडु मोरे, शिंदखेडा, धुळे
शिरीष माधवराव मोरे, शिंदखेडा, धुळे
यशवंत नेताम, चंद्रपूर
मधुकर शिवराम पाटील, रायगड
नारायण सिताराम पाटील, नाशिक
राजू पांढरा, वसई
पांडुरंग पारधी, वसई
वीरसिंग पाडवी, नंदूरबार
सी. के. पाडवी, नंदूरबार
चुन्नीलाल पावरा, नंदूरबार
पांडुरंग भैरू परड, नाशिक
मोहन रिंजड, वसई
चामुलाल राठवा, धुळे
भरतसिंग जान्या राहसे, धुळे
चंद्रकांत सखाराम राऊत, नाशिक
संतु सदगीर, नाशिक
दिलीप मुरलीधर सहाणे, नाशिक
गणेश सोनावण, नंदूरबार
कृ. रा. साबळे, जुन्नर
शंकर राजाराम शिरसाठ, धुळे
रायसिंग सोनावणे, धुळे
श्रीनिवास शेलगावकर, नागपूर
काशिनाथ नागू साबळे, अहमदनगर
नटवरलाल सिडाम, गडचिरोली
रमेश ठाकरे, नंदुरबार
दामु ठाकरे, नंदुरबार
दत्ता तुमवाड, नांदेड
सुन्हेरसिंग ताराम, नागपूर
राजेंद्र ठाकरे, जळगाव
रायसिंग ठाकरे, नंदुरबार
लक्ष्मण ठाकरे, ठाणे
रमेश वसावे, नंदूरबार
भीमसिंग नुन्या वळवी, नंदूरबार
कुवरसिंग फुलजी वळवी, नंदूरबार
के.के.वळवी, जळगाव
सिंगा रूबजी वळवी, नंदूरबार
जालमसिंग सुन्या वळवी, नंदूरबार
लालसिंग दिप्त्या वळवी, नंदुरबार
एकजुट संघटना, मंचर

शाश्वत संघटना, मंचर
अजय डोळके, पांढरकवडा
पी. एम. खोसे, नाशिक
विठ्ठल कदम, धडगाव
जयंत पाडवी, नंदूरबार
रमेश पाटील, धडगाव
कांतीलाल टाटीया, शहादा
आर. जी. विशे, नाशिक
एस. एम. वागळे, नाशिक
अनंत गोगटे, पुणे
मारूतराव खुटवड, पुणे
विलास किरोते, पुणे
प्रमोद नाईक, पुणे

## स्त्री-प्रतिनिधी

श्रीमती मुक्ता पवार, रायगड
श्रीमती निरा मधे, रायगड
श्रीमती स्मिता नारायण कांबळे, रायगड
श्रीमती पुष्पाताई अत्राम, यवतमाळ
श्रीमती छायाताई सुरतवंती, नंदुरबार
श्रीमती जिजा रेरे, रायगड
श्रीमती लिला सुर्वे, रायगड
श्रीमती कमल वसावे, नंदुरबार
श्रीमती ठगीबाई वसावे, नंदुरबार
श्रीमती सुगंधा सोनु गोविंद, ठाणे
श्रीमती शोभा कोठाखार, चंद्रपूर
श्रीमती रेखा पाडवी, नंदुरबार
सौ. कोडापे, गडचिरोली
सौ. मनोरमा श्याम मुडे, बुलढाणा
सौ. संघजा मेश्राम, अंबरनाथ
प्रा. सुलभा गावंडे, चंद्रपूर
प्रा. अर्चना हातेकर, धुळे
प्रा. जयश्री गावीत, धुळे
प्रा. पुष्पा गावीत, धुळे
सौ. मीना शेलगावकर, नागपूर
सौ. शिला कृष्णकुमार चांदेकर, अमरावती
सौ. वनिता पद्मसिंग पटेल, नंदुरबार
सौ. जमुना भावसिंग भंडारी , नंदुरबार
सौ. हिरकणा वाहरू सोनावणे , नंदुरबार
श्रीमती निकिता साळुंके, मुंबई
श्रीमती कुसुम आलाम, गडचिरोली
सौ. मेधा सुरेश जगताप, नगर

## निमंत्रित मान्यवर

डॉ. जयंत पाटील
प्रा. देवदत्त दाभोळकर
डॉ. गिरीश सोहोनी
श्री. जनार्दन महाराज वळवी
श्री. वि. गो. पेंढारकर
डॉ. अ. रा. कुलकर्णी
प्रा. शरद कुलकर्णी
श्री. अनंतराव बोधनकर
डॉ. सु. ल. काटे
डॉ. धैर्यशील शिरोळे
डॉ. न.श. देवधर
डॉ. अनंत फडके
डॉ. गोविंद गारे
श्री. मुकुंदराव किर्लोस्कर
श्री. गिरीश प्रभुणे
श्री. व्यंकटराव अवधूत
श्री. बाळकृष्ण रेणके
श्रीमती नॅन्सी गायकवाड
श्रीमती उषाकिरण अत्राम
श्री. रमेश पानसे
श्री. बाळ कोळेकर
श्री. दत्ता सावळे
श्री. रा. वि. भुस्कुटे

श्रीमती सुरेखा दळवी
श्री. वाहरू सोनवणे
श्री. काळुराम दोधडे
डॉ. विनायक तुमराम
श्री. भुजंग मेश्राम
श्री. विलासराव साळुंखे
प्रा. राम बापट
डॉ. पी. एम. फुलमाळी
डॉ. दीपक फाल्गुने
डॉ. सदानंद मोरे
डॉ. अभय शुक्ला
डॉ. सुभाष वाळिंबे
श्रीमती बेदी
डॉ. निशी सूर्यवंशी
श्रीमती अनिता कुलकर्णी
राजेश देशमुख
श्रीमती विद्या आपटे
श्रीमती कुसुम कर्णिक
डॉ. हेमंत आपटे
श्री. संजय राऊत
श्री. विलास चाफेकर
डॉ. शौनक कुलकर्णी

## परिषदेचे प्रतिनिधी

प्रा. रा. के. मुटाटकर
डॉ. विजय भानू
डॉ. मिलिंद बोकील
श्री. गणपत पंडित
श्री. पुरूषोत्तम आगाशे
श्री. श्रीनिवास इंदापूरकर
श्री. सजय जुवेकर
श्री. जयवंत मंत्री
श्री. अभय कुदळे
श्री. संदीप रसलपूरकर
प्रा. आरती कोलगेकर
कु. भूपाली माटे
लोकेश गुजरप्पा
शिल्पा खळदकर
सौ. अनुप्रिता दिक्षित
कु. अपर्णा जोशी
श्रीकृष्ण वैध (काका)
पार्वती जाधव
सौ. अपूर्वा पंडित
श्री. नथू सावंत


**(फॉर्म ४, नियम ८ नुसार निवेदन)**

१. प्रकाशन स्थळ : ६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७.
२. प्रकाशन काळ : त्रैमासिक
३. मुद्रक, प्रकाशक व संपादक : रामचंद्र केशव मुटाटकर
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : ६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७.
४. स्वामित्व : महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद ६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७.

मी, रा. के. मुटाटकर जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीनुसार व समजुतीनुसार खरा आहे.

**जानेवारी २००२** **रा. के. मुटाटकर**
प्रकाशक

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

## मंडळाची नवीन प्रकाशने

**१) महाराष्ट्राचा इतिहास**
(प्रागैतिहासिक महाराष्ट्र खंड पहिला भाग १)
लेखक - शां. भा. देव
पाषाणयुगापासून ते लोहयुगापर्यंतचा महाराष्ट्राचा इतिहास शब्दबद्ध करणारा ग्रंथ
पृष्ठसंख्या : १८५ मूल्य रू. १२७/-

**२) महाराष्ट्राचा इतिहास**
(मध्ययुगीन कालखंड भाग १)
संपादक - गो. त्र्यं. कुलकर्णी
इ.स. १२९६ ते १६३६ पर्यंतचा महाराष्ट्राचा इतिहास शब्दबद्ध करणारा ग्रंथ
पृष्ठसंख्या : १८८ किंमत रू. १४५/-

**३) समाजशास्त्रीय विचारातील प्रमुख प्रवाह :**
भाग पहिला
अनुवादक - हेमकांत बळकुंदी
मूळ फ्रेंच लेखक - रेमंड ऑरो
इंग्रजी भाषांतर - रीचर्ड हॉवर्ड आणि हेलन रीव्हर
पृष्ठसंख्या : २४४ किंमत रू. २९५ /-

**४) प्रासादमंडन**
लेखक - डॉ. र. पु. कुलकर्णी
प्रासादाच्या (प्राचीन मंदिराच्या) वास्तुसंबंधी माहिती देणारा) अनुवादित ग्रंथ
पृष्ठसंख्या : १५४ किंमत रू. ११४

**५) एक होता गंधर्व**
लेखक - डॉ. राम म्हैसाळकर
बालगंधर्वांच्या आयुष्यातील चढउतार शब्दबद्ध करणारी ललितरम्य, जीवनकथा
पृष्ठसंख्या : ११२ किंमत रू. ९३/-

**६) गजाआडच्या कविता**
संपादक - श्री. उत्तम कांबळे
महाराष्ट्रातील वेगवेगळ्या तुरूंगात सध्या शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांनी लिहिलेल्या कवितांचा संग्रह
पृष्ठसंख्या : ४७ किंमत रू. ३०/-

**७) महाराष्ट्राचे शिल्पकार या चरित्रमालेअंतर्गत प्रसिद्ध चरित्रग्रंथ**

१) **साने गुरूजी** - श्री. राजा मंगळवेढेकर
पृष्ठसंख्या १०२ किंमत रू. ४०/-

२) **दादा धर्माधिकारी**
श्रीमती तारा धर्माधिकारी
पृष्ठसंख्या १०० किंमत रू. ४०/-

३) **डॉ. विठ्ठलराव विखेपाटील**
श्री. शिवाजी सावंत - पृष्ठसंख्या ७८
किंमत रू. ३५/-

४) **क्रांतिसिंह नाना पाटील**
श्री. भारत पाटणकर
पृष्ठसंख्या ९४ किंमत रू. ३५/-

५) **एस. एम. जोशी** - श्री. ग. प्र. प्रधान
पृष्ठसंख्या ११० किं. रू. ४०/-

६) **शंकरराव किर्लोस्कर**
श्रीमती शांता किर्लोस्कर
पृष्ठसंख्या १०४ किंमत रू. ४०/-

**मंडळाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे**

सर्व शासकीय ग्रंथ भांडार तसेच मुंबई/पुणे/नागपुर/औरंगाबाद व महाराष्ट्रातील प्रमुख ग्रंथविक्रेते

**अधिक माहिती /चौकशीसाठी**

सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत, तिसरा मजला, दादर (पूर्व), मुंबई १४ दूरध्वनी ४१४४०२१, ४१४६००५

## हाकारा अंक-सूची

१) जानेवारी - मार्च १९८० : जबरन जोत जंगल जमीन
२) एप्रिल - जून १९८० : आदिवासी व शिक्षण
३) जुलै - सप्टेंबर १९८० : आदिवासी व वनसंवर्धन
४) ऑक्टोबर - डिसेंबर १९८० : आदिवासी साहित्य व कला
५) जानेवारी-मार्च १९८१ः दलितांना सवलती व राखीव जागा
६) एप्रिल - जून १९८१ : आदिवासी व आरोग्य
७) जुलै - सप्टेंबर १९८१ : वनशेती व संवर्धन
८) ऑक्टोबर - डिसेंबर १९८१ : रोजगार हमी योजना
९) जानेवारी - मार्च १९८२ : धरणे व विकास
१०) एप्रिल - जून १९८२ : धरणे व विकास
११ - १२) जुलै - डिसेंबर १९८२ : जंगल व्यवस्थापन
१३) जानेवारी - मार्च १९८३ : आदिवासी व दारू
१४) एप्रिल - जून १९८३ : आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी
१५) जुलै-सप्टेंबर १९८३ : प्रा.सरदार गौरव अंक
१६) ऑक्टोबर - डिसेंबर १९८३ : आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न
१७-१८) जानेवारी-जून १९८४ : आदिवासींमधील स्वयंसेवी कार्य
१९) जुलै - सप्टेंबर १९८४ : आदिवासी स्त्री
२०) ऑक्टोबर-डिसेंबर १९८४ : आदिवासी आरोग्य व शिक्षण
२१) जानेवारी - मार्च १९८५ : आदिवासी संघटन
२२) एप्रिल - जून १९८५ : जमीन हस्तांतर
२३) जुलै - सप्टेंबर १९८५ : आदिवासी महिला
२४) ऑक्टोबर - डिसेंबर १९८५ : आदिवासी व सरकार
२५) जानेवारी - मार्च १९८६ : जंगल व धरण
२६) एप्रिल - जून १९८६ : आदिवासी कला
२७) जुलै - सप्टेंबर १९८६ : आदिवासी व वेठबिगारी
२८) ऑक्टोबर - डिसेंबर १९८६ : आदिवासीविषयक ग्रंथ मानवशास्त्र परिचय
२९) जानेवारी - मार्च १९८७ : भटक्याविमुक्त जमातींचे प्रश्न
३०) एप्रिल-जून १९८७ : आदिवासी आणि सांस्कृतिक बदल
३१-३२) जुलै-डिसेंबर १९८७ : राष्ट्रीय वननीतीचा प्रश्न
३३) जानेवारी - मार्च १९८८ : सवलती अपहरणाची समस्या
३४) एप्रिल - जून १९८८ : आदिवासी साहित्य
३५-३६) जुलै - डिसेंबर : आदिवासी समाज व संस्कृती
३७-३८) जानेवारी -जून १९८९ : डॉ. वेरीअर एल्विन विशेषांक
३९-४०) जुलै-डिसेंबर १९८९ : व्यवसाय मार्गदर्शन
४१-४२) जाने.-जून १९९० : महाराष्ट्रातील आदिवासींची परिस्थिती
४३) जुलै - सप्टेंबर १९९० : जागतिक आदिवासी
४४) ऑक्टोबर-डिसेंबर १९९० : गं. बा. सरदार स्मृति विशेषांक
४५-४६) जानेवारी-जून १९९१ : आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक
४७) जुलै - सप्टेंबर १९९१ : आदिवासींच्या विकासात्मक व सांस्कृतिक समस्या
४८) ऑक्टोबर-डिसेंबर १९९१ : आदिवारी जीवन व संस्कृती
४९-५०) जानेवारी-जून १९९२ : सर्वसाधारण आदिवासी
५१-५२) जुलै-डिसेंबर १९८२ : अनुताई वाघ विशेषांक
५३-५४) जानेवारी-जून१९९३ : आदिवासी धर्म, सण व उत्सव
५५-५६) जुलै-डिसेंबर १९९३ : धरण - विस्थापन व पुनर्वसन
५७) जानेवारी-मार्च १९९४ : सर्वसाधारण आदिवासी
५८) एप्रिल-जून १९९४ : आदिवासी एकता परिषद
५९) जुलै-सप्टेंबर १९९४ : आदिवासी विकासाची सैध्दान्तिक भूमिका
६०) ऑक्टोबर - डिसेंबर १९९४ : आदिवासी जमाती
६१-६२) जानेवारी - जून १९९५ : राणीपूर अभ्यास विशेषांक
६३) जुलै - सप्टेंबर १९९५ : कुपोषण विशेषांक
६४) ऑक्टोबर - डिसेंबर १९९५ : पर्यावरण विशेषांक
६५) जानेवारी - मार्च १९९६ : आदिवासी जमाती
६६) एप्रिल - जून १९९६ : महाराष्ट्र, ओरिसा अभ्यास दौरा
६७) जुलै - सप्टेंबर १९९६ : आदिवासी जमाती
६८) ऑक्टोबर - डिसेंबर १९९६ : आदिवासी शिक्षण
६९-७०) जानेवारी-जून १९९७ : वारली लोकगीते व बोलीभाषा
७१) जुलै - सप्टेंबर १९९७ : पंचायत राज विशेषांक
७२) ऑक्टोबर-डिसेंबर १९९७ : साहित्य संमेलन विशेषांक
७३) जानेवारी-मार्च १९९८ : वृक्ष लागवड व संवर्धन विशेषांक
७४) एप्रिल-जून १९९८ : सर्वसाधारण आदिवासी
७५ - ७६) जुलै - डिसेंबर १९९८ : आदिवासी समाज व संस्कृती
७७) जानेवारी-मार्च १९९९ : आदिवासी व आर्थिक धोरण
७८) एप्रिल-जून १९९९ : आदिवासी विकास व संस्कृती
७९-८०) जुलै - डिसेंबर १९९९ : बोर्डी परिसर अभ्यास
८१) जानेवारी-मार्च २००० : आदिवासी जीवन, कला व मराठी साहित्य
८२) एप्रिल - जून २००० : स्त्रिया आणि आरोग्य
८३) जुलै-सप्टें. २००० : पाणी टंचाई आणि पाणलोट विकास
८४) ऑक्टोबर-डिसें. २००० : आदिवासी जीवन आणि संस्कृती
८५-८६) जानेवारी - जून २००१ : अस्मिता व विकास विशेषांक
८७) जुलै-सप्टेंबर २००१ : आदिवासी सर्वसाधारण
८८) ऑक्टोबर-डिसेंबर २००१ : संमेलन वृत्तांत भाग - १

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन, कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण. शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकत्र व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिक शास्त्र यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यतः आदिवासींबाबत अभ्यासकांना एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाचे मूर्त स्वरूप म्हणून 'हाकारा' त्रैमासिक सुरू करण्यात आले आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे. (संस्थांना 'हाकारा' चे केवळ वार्षिक सदस्यत्व मिळेल.)

## महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

- आजीव सभासद ६०० रूपये (फक्त व्यक्तींसाठी)
- 'हाकारा' वार्षिक सभासद ६० रूपये (व्यक्तींसाठी)
- 'हाकारा' वार्षिक सभासद १०० रूपये (संस्थांसाठी)

परिषदेच्या आजीव सभासदांना **'हाकारा'** विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (दि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ॲन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट अथवा मनीऑर्डरने पाठवावी. मनीऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

## पत्रव्यवहाराचा पत्ता

## सचिव

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद**
**६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७**

आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा !

**हाकारा त्रैमासिक खंड २३, अंक १, जानेवारी - मार्च २००२ मूल्य : २० रूपये**

Prnited by Monarch Print Arts, Pune 30